Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

66 म



मराठी

गद्य वैभव

66 म
5

NATAK PUBLISHING HOUSE
OUSE BOMBAY 2

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

किंमत १४ आणे

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

॥ ओ३म् ॥

पुस्तक-संख्या 66 म/ए

पंजिका-संख्या 20205

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई महाशय १५ दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठी

गद्यवैभव

भाग पहिला

संपादक

प्रो. श्रीधर बाळकृष्ण रानडे,
बी. ए., एम्. एस्‌सी.

गंगाधर देवराव खानोलकर

GURUKULA LIBRARY KANGRI
CHECKED 1973
Initial
66 प
20205
5.1.2009

KARNATAK PUBLISHING HOUSE
BOMBAY 2

First Edition September 1935
Reprinted August 1936
Reprinted June 1939
Reprinted April 1943

Price 14 Annas
किंमत १४ आणे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(सर्व हक्क स्वाधीन)

Printed by M. N. Kulkarni at the Karnatak Printing
Press, Chira Bazar, Bombay, and Published
by him at the Karnatak Publishing House,
Chira Bazar, Bombay 2.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिक्षकांशीं दोन शब्द

असा एक काळ होता कीं शिक्षणक्षेत्रामध्यें मराठी भाषेला–किंबहुना सर्व प्रांतिक भाषांना–फार कमी प्रतीचें स्थान होतें. प्राथमिक शाळांत मराठी भाषेला स्वतंत्र असा दर्जा नव्हता. भाषाविषयाच्या पुस्तकांकडे 'इतिहास, भूगोल, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान' इत्यादि अभ्यासक्रमांतील नाना विषयांसंबंधीं उपयुक्त माहिती देणारीं पुस्तकें, या दृष्टीनेंच पाहण्यांत येई. या 'उपयुक्त माहिती' ऐवजीं एखाद्या लेखकानें निर्भेळ वाङ्मयिक आनंद देण्याचें धाडस केलें, तर त्या पुस्तकाचें धोरण चुकलें असें समजण्यांत येई. नाना शास्त्रांची माहिती पुरवावयाची एवढीच कामगिरी मराठीकडे दिल्यावर तिच्यांतील जिवंत वाङ्मयाकडे पाहण्याचें कांहींच कारण नव्हतें. त्या त्या विषयांवरील इंग्रजी लेख निवडले किंवा नवीन तयार करून घेतले व त्यांचीं मराठी, गुजराथी किंवा कानडींत भाषांतरें करून घेतलीं कीं भाषाविषयक पुस्तकांचें काम संपलें अशा प्रकारची वृत्ति होती.

तो काळ अद्यापि अगदीं नाहींसा झाला नसला तरी तो बदलत चालला आहे. मराठी शिकवायचें म्हणजे इतिहास, भूगोल, पदार्थविज्ञान शिकविणें नव्हे. मराठी शिकवायचें म्हणजे मराठी लेखकांनीं गेल्या सातआठ शतकांमध्यें जें कांहीं गद्यपद्यात्मक वाङ्मय तयार केलें आहे त्याचे सुंदर नमुने मुलांपुढें ठेवावयाचे, त्याचा पद्धतशीर रीतीनें परिचय करून द्यावयाचा, त्यांच्याविषयीं मुलांच्या मनांत गोडी उत्पन्न करावयाची व शाळा सोडल्यावर तीं मुलें आपल्या फुरसतीच्या वेळीं चांगल्या प्रतीचें मराठी वाङ्मय वाचतील अशा प्रकारची त्यांच्या मनाची तयारी करून द्यावयाची.

आम्ही वरील हेतूंनीं प्रेरित होऊनच गेल्या वर्षीं 'महाराष्ट्र-रसवंती'चा व यंदा हा 'गद्यवैभवा'चा प्रपंच केला आहे. 'गद्यवैभव' या मालेंतील लेखांची निवड करितांना मुलांना मराठी वाङ्मयाचा परिचय करून द्यावयाचा हेंच आम्ही धोरण ठेविलें आहे. वाङ्मय हा शब्द लहान परंतु त्याच्या अर्थाची व्याप्ति फार मोठी आहे. त्यांतून मराठीसारख्या जुन्या व कसलेल्या भाषेंतील वाङ्मयाचा प्रपंच कितीतरी अफाट ! या नानाविध वाङ्मयाचा मुलांना परिचय व्हावयाला हवा. बडोद्याचा लक्ष्मीविलास नांवाचा सुंदर राजवाडा मुलांना दाखवावयाचा झाला तर नुसता दरबार हॉल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दाखवून भागावयाचें नाहीं, किंवा रविवर्म्यानें काढलेल्या सुंदर व भव्य चित्रांनीं शृंगारलेला नुसता दिवाणखाना दाखवून भागावयाचें नाहीं.

तो दरबार हॉल किंवा दिवाणखाना हे कितीहि सुंदर असले तरी ते लक्ष्मीविलास राजवाडा नव्हत, राजवाड्याचे ते एक एक भाग आहेत. 'लक्ष्मीविलास' नीट बघा-यचा म्हणजे त्यांतील सर्व दालनें, लहान मोठ्या खोल्या, गच्च्या पाहिल्या पाहिजेत; वगीचा, लहानमोठे रस्ते, कृत्रिम जपानी पूल, ठिकठिकाणीं उभे केलेले पुतळे सर्व कांहीं पाहिलें पाहिजे. मराठीचा 'लक्ष्मीविलास'—'सरस्वतिविलास' म्हणा हवें तर—असाच पाहिला पाहिजे. नुसते पंडितांचे निबंध वाचून चालावयाचें नाहीं किंवा पटकन् लघुकथा वाचून भागणार नाहीं. निबंध, नाटकें, चरित्रें, कथा, नाट्यछटा, लघुकथा, पत्रें, शब्दचित्रें, गद्यपद्याच्या सीमेवर अलीकडे वाढत्या प्रमाणावर होणारीं अद्भुत रमणीय गद्यकाव्यें किंवा काव्यमय गद्य-साऱ्या वाङ्मयप्रकारांतील थोडेंथोडें वाचून त्या त्या प्रकाराची ओळख करून घेतली पाहिजे.

गद्यवैभवांत या नानाविध प्रकारांचा विद्यार्थ्यांना परिचय घडेल; शिवाय या तीन पुस्तकांत लेख इतस्ततः न देतां विचार व भाषा यांच्या बाबतींत पद्धतशीर क्रम साधिला असून त्या त्या प्रकारांचा वेगवेगळ्या भूमिकांवर, मुलांना परिचय होईल अशी व्यवस्था केली आहे.

याशिवाय 'गद्यवैभवा'चा दुसरा महत्त्वाचा विशेष म्हटला म्हणजे उतारे देण्या-पूर्वी मुलांना त्यांचा थोडक्यांत पण स्पष्टपणें करून दिलेला परिचय. शिक्षकानें आम्ही केलेल्या प्रस्तावनांचा योग्य उपयोग केल्यास विद्यार्थ्यांस त्या त्या वाङ्मय-प्रकाराबद्दल यथार्थ कल्पना होऊन लेख समजणें सोपें जाईल.

परंतु आमचा सर्वांत महत्त्वाचा विशेष म्हणजे आम्ही प्रत्येक पाठाच्या शेवटीं नेमून दिलेले अभ्यास (Textual Study) व स्वाध्याय (General Study) आणि सुचविलेलें पुरवणीवाचन होय. डाल्टन पद्धत प्रचारांत आल्यापासून पाठसंविकासाचें (assignments) महत्त्व सर्व शिक्षकांस कळून चुकलें आहे; परंतु पाठसंविकास किती वेगवेगळ्या प्रकारचे असूं शकतात, त्यांना किती वेगवेगळ्या प्रकारचीं कार्यें करावयाचीं असतात, याची कल्पना फार थोड्यांना असते. पाठसंविकास दिलेच पाहिजेत म्हणून अलीकडे कांहीं पुस्तकांत व ट्रेन्ड शिक्षकांच्या पाठांतहि पाठ-संविकासांचा उपयोग केलेला आढळतो ! परंतु ते बहुधा एकाच स्वरूपाचे व एकाच कार्यकारणाचे असतात. धडा वाचल्यावर त्यांत जी माहिती दिली असेल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तीच प्रश्नरूपानें विचारलेली असते. यांत विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्तीची व फार तर ग्रहणशक्तीची पारख होते. वास्तविक धडा वाचल्यावर पाठसंविकासानें मुलांना विचार करण्याला लावलें पाहिजे, पृथक्करण (analysis) व समन्वय (synthesis) करावयाला लावलें पाहिजे. त्या धड्याचा त्यांच्या बुद्धीवर व भावनांवर जो परिणाम घडला आहे त्याचा ठाव घेतला पाहिजे; शिवाय पाठसंविकासानें सुंदर सुंदर वाङ्मयिक स्थळांकडे विद्यार्थ्यांचें लक्ष्य वेधिलें पाहिजे, त्यांतील भाषेच्या, विचारांच्या व कल्पनांच्या खुब्या उलगडण्यास त्यांना मदत केली पाहिजे.

अशा प्रकारचे पाठसंविकास देण्याचा या पुस्तकमालेंत प्रयत्न केला आहे. आमचे पाठसंविकास भाषिक व वाङ्मयिक आहेत. त्यांत निवडक शब्दांचा अभ्यास आहे, अलंकारांचा प्रपंच आहे, आणि कल्पनांचा परिपोष आहे. शेवटच्या पुस्तकांत, ज्याला पाठटीका (Textual criticism) म्हणतात तो प्रकार योजिला आहे. जें लिहिलें आहे व छापलें आहे तें खरेंच असलें पाहिजे, तें आपण फक्त ध्यानांत ठेवायचें, त्याच्या बरेवाईटपणावर विचार करणें आपलें काम नाहीं, अशा प्रकारची, विद्यार्थ्यांत पाठ्यपुस्तकें वाचतांना आंधळी परावलंबी मनोवृत्ति उत्पन्न होण्याचा संभव फार असतो; म्हणून आम्ही गद्यवैभवाच्या तिसऱ्या भागांत लेखकांचीं मतें, त्यांनीं केलेलीं विधानें, त्यांची लिहिण्याची पद्धत इत्यादि गोष्टींविषयीं विद्यार्थ्यांनीं सर्व बाजूंनीं विचार करावा व त्यांच्या बरेवाईटपणाविषयीं मोकळेपणानें शिक्षकांशीं चर्चा करावी, अशी योजना केली आहे.

शिक्षणशास्त्रांत एक इंग्रजी म्हण आहे : First experience, then expression' वाङ्मयांत किंवा ललितकलांत जें कांहीं सुंदर आहे त्याचा प्रथम उपभोग-अनुभव घ्यावयाचा व मग तो व्यक्त करावयाचा, किंबहुना व्यक्त केल्याखेरीज त्या अनुभवाची –वाङ्मयानंदाची–पूर्तीच होत नाहीं. म्हणून आधुनिक अध्यापनकलेंत विद्यार्थ्यांनीं आपले अनुभव, आपले विचार व भावना लिहून किंवा बोलून सुंदर रीतीनें व्यक्त (written or oral expression) केल्या पाहिजेत या गोष्टीकडे विशेष लक्ष्य पुरविलें जातें. गद्यवैभवाच्या पाठसंविकासामध्यें वाङ्मयांतील सुंदर उतारे वाचून जे विचार व भावना उद्भवल्या असतील त्या मुलांनीं व्यक्त करण्याची योजना आहे.

आम्हीं नेमून दिलेले 'स्वाध्याय' व 'अभ्यास' यांचा वर्गांत हीं पुस्तकें शिकवितांना, पुष्कळच उपयोग होईल. तथापि हीं पुस्तकें कशीं शिकवावीं याविषयीं कांहीं सामान्य स्वरूपाच्या सूचना देणें अयोग्य होणार नाहीं असें वाटतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१. कोणत्याहि एका ठराविक पद्धतीला चिकटून बसूं नका. शिकवावयाचा पाठ आधीं नीट वाचा, त्यावर मनन करा व मग कोणत्या पद्धतीचा अवलंब करावयाचा तें ठरवा.

२. पद्धतींत मधून मधून बदल करीत जा. नुसतें 'मूकवाचन'च (silent reading) घेऊन बसूं नका किंवा 'मुखवाचनाला' (oral reading) अधिक महत्त्व देऊं नका. निबंधादि बुद्धिप्रधान लेखांसाठीं मूकवाचन बरें. गद्यकाव्य, नाट्यछटा, नाटकांतील संवाद इत्यादि ज्या वाङ्मयप्रकारांत भावना आणि कृति यांस प्राधान्य आहे तेथें मुखवाचनाचा अवलंब करा.

नाट्यछटा, नाट्यसंवाद, गद्यकाव्य (उ. विंझण) हीं मुलांकडून म्हणवून घ्या. मुलांनीं ते उतारे पाठ केलेच पाहिजेत असें नाहीं. मधून मधून वर्गाला स्वतः परिणामकारक रीतीनें वाचून दाखवा.

३. लेखांतील डौल, विनोद, विचारांची व भावनांची गुंतागुंत या गोष्टी लेख परिणामकारक रीतीनें वाचल्यावर किंवा ऐकल्यावर मुलांना चटकन् समजतात; मग स्पष्टीकरणाची व अन्य विशदीकरणाची जरूरी रहात नाहीं. हें वाचण्याचें काम शिक्षकानेंच केलें पाहिजे किंवा ज्या मुलांना अर्थ समजून सुंदर रीतीनें वाचतां येतें अशांकडून करविलें पाहिजे. वाचन ही एक कला आहे. तिचा परामर्ष सुंदर रीतीनेंच घेतला पाहिजे. **नीट वाचतां येत नाहीं अशा मुलांना एकादा सुंदर लेख वर्गांत वाचावयास सांगावयाचें** म्हणजे वर्गाचा त्या **लेखाविषयीं एक प्रकारें प्रतिकूल पूर्वग्रह उत्पन्न करणें होय.** या वरच्या वर्गांत मुलें कशीं वाचतात याची आपल्याला चांचणी घ्यावयाची नसून, मुखवाचनाचा उपयोग केवळ रसास्वादासाठीं करावयाचा आहे हें ध्यानांत असूं द्यावें.

४. योग्य रीतीनें शिकविल्यास सबंध पुस्तक वर्षांत संपविणें कठीण नाहीं. परंतु तें अशक्य वाटल्यास आमची शिक्षकांना अशी विनंति आहे कीं, त्यांनीं आम्ही वाङ्मयप्रकारांचे जे वर्ग केले आहेत, त्या प्रत्येक वर्गांतून धडे निवडून घ्यावे; पण **कोणताहि वाङ्मयप्रकार गाळूं नये.** 'साहित्यपरिचयाच्या' तिन्ही भागांतील निवडक धडे पुन्हां वर्गीकरणाच्या दृष्टीनें वाचून घ्या.

५. आम्ही जे पाठसंविकास दिले आहेत ते सर्व सारख्याच दर्जाचे नाहींत; कांहीं सोपे आहेत तर कांहीं कठीण–बरेच कठीण आहेत. या धर्तीवर नवे पाठसंविकास तयार करण्यास मुबलक वाव आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्गांत जीं विशेष हुशार मुलें आहेत त्यांना व ट्रेनिंग संस्थांतील प्रौढ विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना यांचा उपयोग होईल.

आम्ही निवडलेले उतारे व दिलेल्या पाठसंविकासांबद्दल शिक्षकबंधूंनीं आम्हांला विधायक सूचना केल्यास आम्ही फार आभारी होऊं.

दुसऱ्या आणखी एका गोष्टीकडे आम्ही आपलें लक्ष वेधूं इच्छितों. पुस्तकाच्या शेवटीं विद्यार्थ्यांत कलादृष्टि यावी या हेतूनें प्रसिद्ध कलावंतांच्या कृती व त्यांवरील विवेचन दिलें आहे. मराठी पाठ्यपुस्तकांत हा प्रकार पहिलाच, तसाच नवीन आहे.

बखरी व कविता यांच्या सभोंवतीची वेलबुट्टी, पोथ्यापुराणांतलीं चित्रें यापेक्षां चित्रकलेची वाङ्मयास जास्त उपयुक्त मदत होते हें सर्वांना पटूं लागल्यापासून नाटकें, कादंबऱ्या, कथासंग्रह, दैनिकें व मासिकें यांत भरपूर रेखाचित्रें व छायाचित्रें येऊं लागलीं. शब्दांच्या आवडंबरापेक्षां चित्रानें मनावर परिणाम होतो हें तत्त्व पटल्यावर शिक्षणशास्त्रज्ञांनीं क्रमिक पुस्तकांतहि त्याचा अवलंब केला, एवढेंच नव्हे तर अक्षर-ओळख करून देण्यास, प्रत्यक्षपद्धति (Direct method) मध्येंही चित्रांचें महत्त्व जास्त समजण्यांत येऊं लागलें. पण क्रमिक पुस्तकांत दिलेलीं चित्रें किंवा इतर नाणावलेलीं चित्रें यांतील मर्म समजून घेणें, वाङ्मयास चित्रकला उपकारक होत असल्यामुळें वाङ्मयप्रकाराच्या रसास्वादाबरोबर चित्रांचें रहस्य समजून आनंद प्राप्त करून घेणें, किंवा तो घेण्यास शिकविणें याकडे, परदेशस्थ क्रमिक पुस्तकें लिहि-णाऱ्या लोकांप्रमाणें, आपल्या लोकांचें तितकेंसें लक्ष्य वेधलें नव्हतें. कै. शि. म. परांजपे यांनीं 'रत्नाकर' मासिकांत या प्रकारची टीका प्रथम लिहिली. या पुस्तकांतील आमचाहि उपक्रम तशाच तऱ्हेचा आहे. त्यावर विचार करून इतर चित्रांच्या साह्यानें शिक्षकांनीं ही दृष्टि मुलांना आणून द्यावी अशी आमची सूचना आहे. चित्रांतील रस समजून स्वतःच्या भाषेंत सांगण्याची व लिहिण्याची मुलांना संवय झाली म्हणजे कादंबरी, क़था, नाट्य व शब्दचित्रें यांतील खरें स्वारस्य त्यांना कळण्यास मदत होईल. या पुस्तकांची सजावट कर-ण्यास येथील जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्मधील कलाशिक्षक श्री. धोपेश्वरकर व शांतिनिकेतनांतील प्रसिद्ध चित्रकार श्री. नंदलाल बोस यांचे विद्यार्थी श्री. विनायक मसोजी, मिस् नवलकर वगैरे चित्रकारांची बहुमोल मदत झाली आहे.

ता. १ सप्टेंबर १९३५
मुंबई.

श्री. बा. रानडे
गं. दे. खानोलकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रमणिका

—:०:—

१ वर्णनात्मक

१. दिवाळी . . . वि. मो. महाजनी . १
२. थोरल्या बाजीरावांची छावणी ना. वि. बापट . . ८
३. माझे मित्र . . . सुभद्रा जाधव . . १४

२ बहादुरीचीं व धाडसाचीं वर्णनें

४. क्रिकेटच्या सामन्यांतील हिंदूंचा पहिला विजय २०
५. एका स्वारींत दोन वाघ . 'शिकारी' . . २८

३ उपदेशात्मक निबंध

६. विद्वान् कोणास म्हणावें ? . लोकहितवादी . . ४०
७. द्रव्य देणारी विद्या शिका . म. शि. गोळे . . ४४
८. सभ्यता . . . ह. ना. आपटे . . ५३

४ पत्रें

९. विनायकरावांची ग्रामसुधारणा प्रो. वा. म. जोशी . ६७
१०. विलायतेच्या वाटेवर . न. चिं. केळकर . . ७१

५ आत्मनिवेदन

११. ज्ञानाचा वर्षाव . . डॉ. रवींद्रनाथ टागोर . ७६
१२. माझा पहिला बळी . . आनंदराव बर्वे . . ८४

६ पेशवाईच्या अखेरच्या काळांतील गद्याचा नमुना

१३. स्वामिनिष्ठ सेवक . . मल्हार रामराव चिटणीस ९३

७ चरित्रात्मक

१४. गोपाळराव गोखले . . बा. गं. टिळक . . ९७

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८ कादंबरींतील वर्णन

१५. अग्नीच्या मुखांतून . . ह. ना. आपटे . . १०४

९ कथा

१६. अंगणांतील पोपट . . दिवाकर कृष्ण . . ११३
१७. कोवळी कळी . . न. रा. पारसनीस . . १२२
१८. चुरगाळलेला पतंग . प्र. के. अत्रे . . १२९
१९. अप्पांची बैलांची जोडी . कुमार रघुवीर . . १३३

१० विनोद

२०. आमचे बैठे खेळ . . श्री. कृ. कोल्हटकर . १४४

११ नाट्यसंवाद व नाट्यछटा

२१. वसंतबागेंतील मसलत . कृ. प्र. खाडिलकर . १५०
२२. एका हलवायाचें दुकान . दिवाकर . . . १५६

१२ सौंदर्यपूजा

२३. सौंदर्यपूजा . . . श्री. बा. रानडे . . १६१

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१

वर्णनात्मक

१. दिवाळी

विष्णु मोरेश्वर महाजनि

या निबंधाचे लेखक वि. मो. महाजनि (जन्म १८५१, मृत्यु १९२३.) हे जुन्या पिढींतील एक सुलभनिबंधकार, समतोल वृत्तीचे टीकाकार व कवि म्हणून प्रसिद्ध आहेत. यांच्या लेखनामध्यें सरळपणा व प्रसाद हे गुण विशेषें-करून दिसतात. प्रस्तुत उतारा हें त्याचें एक उत्कृष्ट उदाहरण होय. या उताऱ्याचें सुरस वर्णन, सद्विचारप्रवर्तन व सदुपदेश असे तीन विशेष आहेत.

शरदृतूचा एक महिना बहुतेक संपत आला आहे. श्रावणाची झड कधींच मागें पडली. भाद्रपदांतल्या हस्ताच्या जोरदार पण घटकेच्या सरीहि गेल्या. त्यांबरोबर काळेभोर ढग व त्यांत संचरणारी व डोळ्यांस दिपविणारी सोन-सळी वीज व तिचा अनुचर मेघनाद हेहि लुप्तप्राय झाले. चार महिन्यांच्या पावसानें धूळ बसवून टाकल्यानें आकाश आपली सहजनीलकांति धारण करीत आहे; ती एखाद दुसऱ्या पिंजरलेल्या पांढऱ्या ढगानें जास्तच खुलत आहे. पावसाळ्यांत फुगलेल्या विध्वंस करणाऱ्या नद्या आतां आपल्या कक्षांत परत येऊन प्रसन्न होत्सात्या मंद मंद चालल्या

वि. मो. महाजनि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहेत. मैदानांतील शेतें पिकांनीं पूर्ण आच्छादिलीं आहेत. त्यांवर दृष्टि ठरत नाहीं. इकडे पिंवळीं ज्वारीचीं कणसें वाऱ्यानें डुलत आहेत, तर तिकडे कपाशीच्या डहाळ्या त्रिपुटी बोंडांनीं अगदीं भारावल्या आहेत; कांहीं बोंडें तर हास्य करीत आहेत! मधून मधून तुरीचे वाफे चमकत आहेत. तिळानें आपला खुळखुळा वाजविण्यास आरंभ केला आहे. कोठें कोठें बाजरी आपलें हिरवें गार लहान लहान कांट्यांचें कणीस दाखवून डोळ्यांला रिझवीत आहेत. तळ्याच्या कांठच्या सखल व पाणथळ शेतांत पिवळें भात शाल्योदनाची आशा उपजवीत आहे. रबीच्या शेतांतील भूभाग कोमल गव्हांच्या रोपांनीं हिरवागार झाला आहे. क्वचित् हरभरा आपल्या पर्णांवर आम्लरस धरीत आहे. वनांतील पुष्पांनीं व फलांनीं लादलेले वृक्ष व लता डोळ्यांस व नाकांस आनंद देत आहेत. त्यांच्या नानाविध आकृति जाती, नांवें, रंग, रानांत संचरणारा भिल्ल, वनरक्षक किंवा उद्भिज्जशास्त्र-वेत्ताच ओळखूं व सांगूं शकेल. वनांतून वाहणारे स्वच्छोदकाचे ओहोळ व त्यांच्या कांठीं असलेल्या वृक्षांवर बसलेले पक्षी आपल्या मधुर रवांनीं कानांस कितीतरी रंजवीत आहेत! एका झाडावरून दुसऱ्या झाडावर, एका फुलावरून दुसऱ्या फुलावर उड्या मारणारे पतंग हेहि आपल्या चित्रविचित्र पंखांनीं डोळ्यांना किती तरी तृप्ति देत आहेत! रानांतून हरणांचे कळप आनंदानें उड्या फेंकीत चालले आहेत, त्यांवर नजरहि ठरत नाहीं; कुरणांत ताजें गवत खाऊन पुष्ट बनलेले वृषभ एकमेकांशीं टक्कर मारीत आहेत, कांहीं शिंगांनीं शेतांतील वारुळें व कांहीं वरोळ्या हुंदडीत आहेत. त्यांचे रक्षक गोपाल झाडाखालीं कांबळीवर पडून स्वस्थपणें त्यांकडे पाहात आहेत अथवा झोंप घेत आहेत. मैदानाच्या पर्यंकभागीं असलेल्या टेकड्याहि यावेळीं आपलें सौम्य रूपच दाखवीत आहेत असें हें शांत भुवनाचें चित्र किती तरी मनोहारि आहे!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परंतु आतां या वनश्रीचा दाता भगवान् सूर्यनारायण आपल्या औदार्याचें कौतुक करीत करीत व डुलत डुलत आपल्या साम्राज्याचा दुसरा भाग पहाण्याच्या उद्देशानें तिकडे निघून गेला! त्याशीं नित्य वैर करणारी रजनी पुढें ठाकली! सूर्यानें नटविलेल्या मनोहर वर्णांचा एकसहा लोप करून टाकण्याचा तिनें डाव घातला; पण तो सर्वांशीं सिद्धीस गेला नाहीं. कारण त्याचा अति लांबचा आप्तगण ज्या तारका त्यांनीं आपल्या करांनीं त्या वर्णांस थोडेंसें सावरून धरिलें. नाहीं तर रजनीनें जाई, नेवाळी, कुंद, पारिजातक यांचीं पांढरीं शुभ्र फुलें काळीं करून टाकिलीं असतीं. या काळीं चंद्रमा अगदीं उत्तर रात्रीं उगवत असल्यानें व तशांत विपन्न स्थितींत असल्यानें त्याला वनश्रीला फारसें उजळितां येत नाहीं. त्याचें मिणमिणीत तेज रजनीच्या भीतिप्रद अभावरूप अंधकारास दृश्य व उग्रतरच स्वरूप देतें.

अशा रात्रीं पक्षी आपापल्या नीडाच्या आश्रयानें पंखांत चोंची खुपसून स्वस्थ निजले आहेत. दिवसाचा जीवन-कलह कांहीं घटका विराम पावला आहे. गरीब शेतकरी आपल्या खोपटांत कृतश्रमांचें चीज दयाळु परमेश्वर कैक वर्षांनीं करीत आहे, असा धन्यवाद गाऊन मुला-बाळांसह खाटल्यावर पडला आहे. सावकार पीकपाणी चांगलें येणार, सुबत्ता होणार, तेव्हां आपली थकलेली बाकी वसूल होईल अशा सुखकर स्वप्नांचा अनुभव घेत पलंगावर पडला आहे. आगगाडीहून लांब असलेल्या खेड्यांतील वाणी, उदमी, आतां रस्ते खुले झाले, प्रांताप्रांतांत जावयाला हरकत नाहीं, असें समजून पावसाळ्यांत उकलून ठेवलेली गाडी सज्ज करून भावी फलाच्या आशेनें स्वस्थ निजला आहे.

अशा रमणीय व शांत ऋतूंत दिवाळी सण ज्या महात्म्यांनीं घातला त्यांच्या दूरदृष्टीचें कौतुक करावें तितकें थोडेंच! बाह्य सृष्टींत व मनुष्येतर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जीवसृष्टींत प्रसन्नता व शांति नांदते, तेव्हां मनुष्यानेंहि आपल्या चित्तांत प्रसन्नता व शांति धरावी, असा त्यांचा उदात्त विचार असावा असें सहज दिसतें. शांति राहाण्याला स्वच्छता पाहिजे, लक्ष्मी पाहिजे, म्हणून पडलीं झडलेलीं घरें दुरुस्त करावीं, भिंती लिंपाव्या, सारवाव्या व रंगवाव्या, आंगण पाणी शिंपून स्वच्छ करावें, व त्यांत चित्रविचित्र रांगोळ्या घालून त्या रंगांनीं भराव्या, दारापुढें लाकडाचे खांब रोवून त्यांवर बांधलेल्या आडव्या फळ्यांवर व उभारलेल्या कमानींवर, किंवा घराच्या ओट्यावर व सज्जावर, रात्रीं दिवेच दिवे हारीनें लावावे, घरांतील कोणताहि भाग, कोणतीहि अडोशाची जागा, कोणतीहि खोली अंधारांत राहूं देऊं नका, कोठेंहि केरकचरा असूं देऊं नका, अशी आज्ञापरंपरा घातली. इचा हेतु हाच कीं, अशाच घरांत लक्ष्मी चिरकाळ नांदते, हा समज दृढ करावा; 'केर-सुणीला पाय लागूं देऊं नये, कारण ती लक्ष्मी आहे,' असें बायका म्हणतात, यांतील इंगित हेंच. 'हात फिरे तेथें लक्ष्मी ठरे (वसे),' अशी दुसरीहि म्हण याच अर्थाची आहे. धनतेरस आणि लक्ष्मीपूजन हीं या निमित्तेंच प्रचारांत आलीं.

घरांत जशी स्वच्छता असावी, तशीच देहांतहि स्वच्छता असावी म्हणून नरकचतुर्दशी आली. अंगाचा सर्व मल जावा, दुर्गंधि जावी, एवढेंच नाहीं, तर अंगाचा सुवास आपणांला व इतरांस सुखकर व्हावा, म्हणून सुगंधी उटणें, तेलें व अभ्यंगस्नान यांचा प्रघात पडला. व्यवसा-यांत अश्रांत श्रम होतात. त्यांचा परिहार व्हावा म्हणून चार दिवस खेळी-मेळींत घालवावे, असें योजिलें. सण म्हटला म्हणजे गोड पदार्थ आलेच; व नानाप्रकारचे गोड पदार्थ करण्यांत सुगरणपणा दाखविण्याची संधी स्त्रियांना दिली. पुरुषांनीं, त्या त्या पदार्थांची वाखाणणी केली असतां कोणती घरधनीण धन्य मानून घेत नसेल? गोड पदार्थांनीं मुलांची हौस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुरी होत नसेल, म्हणून त्यांना नाचायाला बागडायाला व खिदळायाला लावावें, व तीं तशीं पाहून त्यांच्या आईबापांनीं आनंद मानून घ्यावा, म्हणून फटाक्यांची व निरनिराळ्या प्रकाराच्या दारूकामाची योजना झाली. पन्नास वर्षांपूर्वीं मुलांकरितां लंकेचा किल्ला करण्याचा व त्यावर तोफा, बंदुकीचे स्वार, वगैरे चढविण्याचा प्रघात फार असे; पण अलीकडे तो नष्टप्रायच झाला आहे. त्या वेळीं उर्वरित वीरश्रीचा तो द्योतक असे.

पुरुषांना व मुलांना दिवाळीचा सण आनंददायक तसाच स्त्रियांनाहि आहे. दसऱ्याच्या दिवशीं शमीच्या लगडी व आपट्याच्या पत्रांच्या पुतळ्या 'सोनें' म्हणून देऊन कशाबशा समजूत घातलेल्या मुलीबाळी, गृहपत्न्या, बहिणी, या दिवाळींत खऱ्याखुऱ्या सोन्याच्या पुतळ्यांची, निदान त्यांच्या अभावीं रौप्य मुद्रकांची ओवाळणी घेतल्यावांचून राहावयाच्या नाहींत. ही ओवाळणी नव्या वर्षाची त्यांची बोहनी (भवानी) होय! दर वर्षांच्या ओवाळणीचा कुणगा प्रत्येक स्त्री जिवापलीकडे ठेविते, त्याला ती कोणाला हात लावूं देत नाहीं! ज्याला बहीण नाहीं, तो पुरुष अभागी असें समजतात; म्हणून असा अभागी पुरुष आपल्या ओळखीच्या मुलीस अथवा स्त्रीस भाऊबिजेपुरती कृत्रिम बहीण समजून तिजकडून ओवाळून घेऊन तिला ओवाळणी घालितो! भाऊबिजेचें माहात्म्य आपल्या महाराष्ट्रांत विशेष आहे.

भाऊ लांबलांबून आपल्या विवाहित बहिणीच्या भेटीस जातो, अथवा तिला आपल्या घरीं आणवितो. फार वर्षांनीं कडकडून भेटलेल्या बहीणभावंडांच्या आनंदाची कल्पना बहिणभावंडांसच होणारी आहे!

अशा तऱ्हेनें हा सण कुटुंबांतील माणसांचें सहज प्रेम वृद्धिंगत करितो; पण येवढ्यावरच तो थांबत नाहीं. या सणांत रुजत घातलेल्या प्रेमाला पहिला अंकुर फुटतो तो जामाताच्या कुळापर्यंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जातो. दिवाळसणानिमित्त नूतन विवाहित झालेल्या कन्येच्या पतीस ऊर्फ जांवयास, व त्याच्या आईबापांस, बहिणभावंडांस, बापानें आपल्या घरीं बोलवावें अशी वहिवाट आपल्या देशांत चालू आहे. या सणांत जांवयाच्या कुळाचा सत्कार 'रत्नहारांनीं' नसो, पण 'बहुमूल्य दुकूलांनीं' श्वशुराच्या ऐपतीप्रमाणें होत असतो; ह्यांत जांवयाचा व विहीणीचा रुसवा व त्यांची समजावणी, हा थोडाबहुत भाग असतोच; पण जांवयाच्या रुसव्याला श्यालकाच्या रुसण्याची पकड पडून दोन्ही समतोल होतात! विवाहप्रसंगीं चार ठायींचे चार सोरट व साळकाया माळकाया एके ठिकाणीं जमून त्यांनीं उपस्थित केलेला जो अकल्पित तंटा अजून धुमसत असतो तो या चार दिवसांतल्या दोन्ही कुटुंबांतल्या निकट आप्तांच्या एकत्र व दृढ संघट्टनानें मिटून जातो, असा पुष्कळ कुटुंबांचा अनुभव आहे व या दिवाळीच्या सणापासून सोयरे सोयऱ्यांची सोय पाहूं लागतात अशी त्याची ख्याति आहे.

या सणाचें हें प्रेम आप्तांना पुरून उरून बाहेर जातें, असें म्हणावयाला हरकत नाहीं. कारण कीं, हा सण त्या त्या खेड्यांतील अथवा शहरांतील सर्व ज्ञातींना आपल्या प्रेमपाशानें गोवून टाकतो. सावकाराच्या वही-(सरस्वती) पूजनाच्या अथवा लक्ष्मीपूजनाच्या दिवशीं बहुतेक जातींच्या लोकांस पानसुपारीचें आमंत्रण असतें. निदान त्या वेळीं कोणालाहि अटकाव नसतो. या प्रसंगीं लाह्याबत्ताश्यांच्या वाटीचा प्रसाद सर्वांस सारखा लाभतो. बाजारांतील दिवाळीचा दीपोत्सव, हा लहानथोर, श्रीमंत-गरीब, स्त्रीपुरुष, बालवृद्ध, या सर्वांस एकवटून सारखा आनंद देतो. सेवक, हीन, निकृष्ट, व अंत्यज यांचाहि हा सण अव्हेर करीत नाहीं. श्रीमंत कुळांतील व व्यापाऱ्यांच्या चाकरनोकरांस कपडालत्ता किंवा पैसा या रूपानें वेतनाबाहेर बक्षीस मिळण्याची वहिवाट आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुराख्यांचीं मुलें '**गाई रानांत गेल्या रे, त्यांवर नजर ठेवा रे,**' अशीं स्वयंस्फूर्तीचीं गाणीं गात गात हरएक मालकाच्या घरीं ओवाळणी मागावयाला येतात; नेहमींचा न्हावी नरकचतुर्दशीचे दिवशीं अंगाला लावितो, व ओवाळणीच्या वेळीं आरसा दाखवितो; परिटीण दिवा घेऊन येते; भंगीणहि येते; कुंभार पणत्या आणून देतो. या सर्वांचा ओवाळणी घेण्याचा हक्क ठरलेला आहे, तो अझून सर्वांशीं लुप्त झाला नाहीं. तो न होवो, उलट अधिक अधिक वाढो, व तो पुरविण्याची इच्छाहि अधिकाऱ्यांत वाढो.

हा सण एका विक्रम संवत्सराच्या अंतीं व दुसऱ्या संवत्सराच्या आरंभीं तीन व दोन दिवस असा पांच दिवसांचा आहे. हा जुन्या संवत्सरांस 'सुखानें जा' म्हणतो; नवीन संवत्सरास 'सुखानें ये' म्हणतो. जुन्या संवत्सराच्या कृष्णपक्षाला रजा देतो, नव्या संवत्सराच्या शुक्लपक्षाचें स्वागत करितो; चिंतेला मागें सारतो, आशेला पुढें करतो. खरीपाचें पीक पदरीं पडेल अशी जेव्हां हा सण खातरी देतो, तेव्हां तो स्वतः फारच रमणीय असतो, व इतरांचाहि स्वभाव रमणीय करितो. त्याच्या प्रभावानें म्हातारा तरुण होतो, कंजूष उदार होतो, रडका हंसतो, गलित उत्साहवंत होतो व कंटक प्रेमळ होतो. असा हा सण वर्षानुवर्ष पाहण्यास मिळावा असें कोण इच्छिणार नाहीं ?

अभ्यास

१. यांतील कोणतें वर्णन तुम्हांला सर्वांत अधिक आवडलें ?
२. लेखकानें कोणते सद्विचार यांत प्रगट केले आहेत ? त्यानें यांत कोणता सदुपदेश केला आहे ?
३. या धड्याच्या दुसऱ्या परिच्छेदांतील कल्पनेचें व रूपकाचें स्पष्टीकरण करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. या धड्यांत 'होत्सात्या'सारखे जुने मराठी शब्द व 'शाल्योदन' 'सहजनीलकांति,' 'लुप्तप्राय,' 'उर्वरित' असे संस्कृत शब्द सांपडतील, त्यांतील संधि व समास सोडवा.

५. वाक्यांत, अर्धविरामाचा उपयोग केव्हां व कुठें केला जातो ?

स्वाध्याय

१. "अशा रमणीय व शांत ऋतूंत दिवाळी सण ज्या महात्म्यांनीं घातला त्यांच्या दूरदृष्टीचें कौतुक करावें तितकें थोडेंच," हें लेखकाचें म्हणणें तुमच्या शब्दांत सिद्ध करा.

२. दिवाळीचा सण शेतकरी, सावकार, आई, बहीण, व धाकटीं भावंडें यांना कोणकोणत्या कारणाकरितां आनंददायक वाटतो ? यांसंबंधींचे तुमचे विचार लिहा.

३. दिवाळीप्रमाणेंच, इंग्रजी पुस्तकांतून ख्रिस्तमस्, (नाताळ) सणाविषयीं वर्णनें आलीं आहेत. इंग्रज कादंबरीकार डिकन्स याची 'ख्रिस्तमस् कॅरोल' नांवाची एक सुंदर छोटी कादंबरी आहे. ती वाचून नाताळचें वर्णन लिहा.

पुरवणीवाचन

१. डिकन्सकृत 'ख्रिस्तमस् कॅरोल.'

२. थोरल्या बाजीरावांची छावणी

नागेश विनायक बापट

एकोणिसाव्या शतकांतील उत्कृष्ट कादंबरीकारांत बापट (जन्म ?—मृत्यु १९०२) यांची गणना होते. हे वांई येथील राहणारे. यांनीं ब्रिटिश मुलखांत शिक्षणखात्यांत कांहीं वर्षें नोकरी केली व पुढें श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या आग्रहावरून त्यांच्या पदरीं राहिले. यांनीं लिहिलेली 'पानिपतची मोहीम' ही कादंबरी त्या काळीं अतिशय लोकप्रिय झाली होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपलें कोणतेंहि पुस्तक प्रसिद्ध होण्यापूर्वी त्यांतील कांहीं भागांचें जाहीर वाचन करण्याची यांची पद्धत असे. यांचें बोलणें व लिहिणें रसाळ असल्या-मुळें अशा प्रसंगीं श्रोत्यांची चांगलीच गर्दी जमे. यांची वर्णनशैली अप्रतिम आहे. एखाद्या स्थळाचें किंवा प्रसंगाचें वर्णन करूं लागले कीं, अगदीं तपशी-लवार, पानेंच्या पानें तें चाललेलें असावयाचें, पण त्यांत रुक्षता कुठेंहि आढळावयाची नाहीं. सारें अगदीं रसाळ आणि झोंकदार! येथें 'बाजीराव बल्लाळ पेशवे' या त्यांनीं लिहिलेल्या पुस्तकांतून घेतलेलें बाजीरावाच्या छावणीचेंच वर्णन पहा. किती सूक्ष्म व सुंदर आहे! हें वाचीत असतांना बाजीरावाबरोबर आपणहि त्या छावणींतून हिंडत असून, तीं तीं दृश्यें पहात आहोंत असा क्षणभर भास होतो. हुबेहूब चित्र डोळ्यांपुढें उभें करणें हेंच या लेखाचें वैशिष्ट्य.

ना. वि. बापट

ते गुलाबी थंडीचे दिवस होते. आंब्यांच्या झाडांवर पाचेसारखे हिरवेगार राघू चिंवचिंव करीत होते, व इतर पक्ष्यांचा किलबिल शब्दहि मधून मधून चालला होता. जिकडे तिकडे हिरवेंचार गवत व दूर्वांचीं बेटें वाढलीं होतीं. झाडांखालीं पानांच्या फटींतून उन्हाचे लहान लहान असंख्य कवडसे पडले होते. त्या जणूं वाटोळ्या लांबोळ्या व बदामी वगैरे घाटाच्या आरशाच पसरून ठेविल्या आहेत असा भास झाला. दरबारच्या तंबूंवर विस्तारयुक्त पांच वडांची दाट छाया होती. त्यांच्यावर अनेक रंगांचे व अनेक जातींचे पक्षी बसून शब्द करीत होते. वारा सोसाट्यानें भणभण वाही, व खालीं जमिनीवर उन्हाचे कवडसे पडले होते ते झराझर मागेंपुढें हेलकावे खात. त्या समयीं ती पांचवडची गजबजलेली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जमीनच थरारत आहे कीं काय असा भास होई. पलीकडे कांहीं अंतरावर शाळूचीं शेतें वाढलीं होतीं. त्यांत तीळ व करडई पेरली होती. त्यांजवर पिंवळीं व तांबुस वर्णाचीं फुलें फुललीं होतीं. त्याच्यापुढें कांहीं अंतरावर कृष्णानदीचें स्वच्छ काळेंभोर पाणी संथ वाहत होतें. पलीकडे पांडवगड व दुसरे डोंगर हिरवेगार दिसत होते. त्यांच्या आसपासची सर्व जमीन हिरव्या रंगानें रंगभूमीसारखी चमकत होती. गांवाच्या पाणवठ्याजवळ एक चिमणबाग होता. तेथें लिंबांच्या झाडांवर कांहीं हिरवीं, कांहीं पाडास आलेलीं, व कांहीं पिंवळीं जर्द कागदी लिंबें लटकलीं होतीं. गाजरें, रताळीं, भुयमूग व हुरडा खाऊन गुराख्यांचीं पोरें गाजरासारखीं लाल पडलीं होतीं. तीं आपल्या गुरांस पाणी पाजून घराकडे हांकीत चाललीं, तेव्हां वांसरांच्या ओढीनें शेपट्या चंवरीसारख्या वर धरून चौखुरी उड्या टाकीत गाई गांवाकडे धांवत चालल्या होत्या. मस्त झालेले पोळ, गुराख्यांचे टोणपे खात, तरी नीट न जातां आडवे तिडवे पळत, यामुळें त्यांच्यामागून धांवतां धांवतां गुराख्यांचें सर्वांग घामानें पाघळत होतें. एक पोर म्हशीला बदाबद काठीनें झोडपूं लागलें, तेव्हां ती रागानें उलटून त्याच्या अंगावर धांवली; तेव्हां तें भितरें पोर घाबरून कुंपणांत पडलें. कांटे लागून त्याच्या आंगाचे लोचके निघाले. हें पाहून त्याला बाजीरावानें काढवून आपल्या आंगावरचें धोतर देऊन त्यास घरीं लावून दिलें. एक शिपाई भाकरी सोडून चटणीकांद्याशीं खात बसला होता, इतक्यांत तेथें एक भिकारी म्हातारी बाई काठी टेंकीत टेंकीत येऊन गयावया करून तुकडा मागूं लागली. तो शिपाई भुकेनें अगदीं व्याकुळ झाला होता, म्हणून तिला त्यानें बरेंच झिडकारिलें, व तिची काठी हिसकावून घेतली तरी ती जाईना, तेव्हां तो इतका संतापला कीं, या सटवीला येथें उभी चिरावी असें मनांत आणून त्यानें आपल्या तलवारीला हात घातला,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इतक्यांत बाजीरावाची तिकडे नजर गेली. मग तिला त्यानें जवळ बोलावून तिच्या हातावर दोन रुपये दिले. तेव्हां ती त्याच्या पायां पडून त्याला आशीर्वाद देऊन चालती झाली.

साध्या वनभोजनांत जी गम्मत आहे, ती राजवाड्यांतील पंचपक्वान्नी मेजवानींतहि नाहीं. कोठें चपाती-भात, कोठें खीर-पुरी, कोठें चटणी-भाकर, कोठें कांदाभाकर, कोठें नुसती बाजरीची गोड भाकर, तिला झुणका आहे आहे, नाहीं नाहीं, कोठें नाचण्याची लाल भाकर, हुलग्यांची तांबडी उसळ, तांदुळजाची रानभाजी, आणि कुळीथांचें पातळसें कळण, असा त्या लष्करांत जिकडे तिकडे जेवणाचा थाट उडाला होता. भूक चरचरीत लागून पोटांत कावळे कोरूं लागले म्हणजे नुसता कोंडा मांड्यापेक्षांहि गोड लागतो. ओलीकोरडी भाकर खाऊन वर कृष्णेचें गोड पाणी घटाघट प्याले तेव्हां कित्येकांच्या नानानाकांत पाणी शिरून ते फडाफड शिंकले. कांहीं लोक न्याहरी करून नदीच्या कांठीं घाईघाईनें पाणी पिण्यास चालले. तेव्हां घोड्यांच्या पायबंदांत व तंबूंच्या तणावाच्या दोरांत पाय अडखळून ते सपशेल पडले. हा तमाशा पाहून भोंवतालचे लोक खदखदा हंसूं लागले. आजारी होते त्यांस बाजीरावानें जवळ उभा राहून अळेंबळें लिंबाइतका भात चारविला. बिनीवरच्या लोकांस रात्रीं आलोचन जागरण झाल्यामुळें ते झाडांच्या बुंध्याशीं घोंगड्या टाकून घोरत पडले होते त्यांपैकीं एकाच्या पायास कांहीं इजा झाली होती. तेथें माशा घोंगावत होत्या. त्या जखमेवर आपल्या हातानें हळूच झांकण टाकून बाजीराव पुढें चालला. पुढें एकजण हातावर हुरडा चोळून फक्या मारीत बसला होता, त्याच्या खाण्यापिण्याची बाजीरावानें चौकशी केली. तेव्हां तो म्हणाला, "सरकार, ओलें कोरडें जसें मिळेल तसें खाऊन धन्याची निमकहलाल चाकरी करावयाची एवढें आम्हांला ठाऊक.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हे पाय काय ते आम्ही जाणतों. दुसरें तिसरें कांहीं आम्ही जाणत नाहीं."

असा समाचार घेत घेत जेथें त्याचे खासगी बसावयाचे घोडे ठाणबंदी केले होते तेथें तो आला. घोड्यांनीं लगेच आपल्या धन्यास ओळखून, खाणें टाकून, कान टवकारून व शिडे वर धरून ते प्रेमानें खिंकाळूं लागले. जवळ येऊन त्यानें आपल्या आंगावरून हात फिरवावा, पुठ्यावर थापटावें व चुचकारावें म्हणून ते जमिनीवर टापा मारूं लागले. खुरांनीं जमीन खणूं लागले. मग जवळच हिरवीगार कोंवळी हरळी दाट उगवली होती ती बाजीरावानें आपल्या हातानें उपटून पदरांत घेऊन दिलप्यारा, लालप्यारा, सारंगा, जरदानट, अशीं नांवें घेऊन त्यांच्या तोंडांत एक एक मूठ हरळी देऊन, त्यांच्या पाठी थोपटून, त्यांच्या तोंडा-वरून हात फिरवून, त्यांचे प्रेमानें मुके घेऊन तो निघाला. तेव्हां त्या मुक्या पण शहाण्या जनावरांचें समाधान होऊन ते फुरफुरूं लागले.

पुढें जरा चालला तों समोरून एक मोठा मस्त रेडा नाक फेंदारून सों सों करीत बाजीरावाच्या अंगावर धांवून येत आहे असें होळकरानें पाहून त्याच्या नाकाड्यावर त्यानें आपल्या सोट्याचा असा जोरानें रट्टा मारिला कीं, त्याबरोबर तो कोलमडून खालीं पडला. त्यावेळेस कांहीं लोक तेथें विस्तव पेटविण्याकरितां काटक्या गोळा करीत होते ते सूं पळाले, व कांहीं शिपाई आपल्यापुढें आरशा ठेवून कंगणीदार पागोटीं बांधीत होते त्यांची धांदल उडाली. पुढें कांहीं ठिकाणीं बोथाटी फिरविणें, निशाण मारणें, घोड्यास मंडळावर धरणें, व कुस्त्या खेळणें, हीं कामें चाललीं होतीं, तींहि त्यानें क्षणभर उभा राहून पाहिलीं.

त्या दिवशीं गोविंदा शागीर्दास बराच वेळ सांपडल्यामुळें त्यानें जेवणाचे चार पदार्थ जास्ती केले. केळीच्या लांबलांब आगोतल्या मांडून, त्यांवर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोन भाज्या, दोन चटण्या, कोशिंबिरी, आमटी, वरण, भात, लोणकडें तूप, चपाती, ताकतव वगैरे पदार्थ केलेले वाढले. अशा थाटानें कांहीं सरदारांस पंक्तीस घेऊन बाजीरावानें पांचवडास भोजन केलें. भोजनोत्तर बाजीराव व आपा हे बुदबळांचे दोनचार डाव खेळले. त्या वेळेस एका बाजूस शिंदा व दुसरे बाजूस होळकर बसून त्यांनीं आपापल्या पक्षास डाव सांगितला. करमणुकीकरितां घटकाभर त्यांची ही लुटुपुटीची लढाई झाली.

अ भ्या स

१. या धड्यांतील कांहीं प्रसंगांचीं, चित्रकाराकडून चित्रें काढून घ्यावयाचीं आहेत असें समजा, तर त्यासाठीं यांतील कोणकोणते प्रसंग तुम्हीं निवडून द्याल ?

२. बाजीरावाचा आपले शिपाई व पाळींव जनावरें यांसंबंधीं आस्थेवाईकपणा व प्रेम, कोणत्या ओळी लिहून, लेखकानें दाखविलें आहे ?

३. ' भणभण, ' बदाबद, ' घटाघट, हे शब्द नानाप्रकारच्या ध्वनींचें अनुकरण करणारे आहेत. यांना इंग्रजीमध्यें ऑनॉमटोपिइक (ध्वन्य-नुकारी शब्द) असें म्हणतात. असे पांच शब्द शोधून काढून सांगा.

४. " तिला झुणका **आहे आहे, नाहीं नाहीं.** " या वाक्यांत ' आहे ' ' नाहीं ' याची द्विरुक्ति कां केली आहे ?

५. या धड्यांत वर्णिलेली बाजीरावाची छावणी एका खेडेगांवाजवळ पडली होती व ते थंडीचे दिवस होते, हें कोणकोणत्या शब्दांमुळें तुमच्या लक्षांत येतें ?

६. या धड्यांतील पहिल्या परिच्छेदांत लेखकानें छोटीं छोटीं वाक्यें लिहिलीं आहेत. या परिच्छेदांतील पहिल्या १६ ओळींतील छोट्या वाक्यांचीं मोठीं (संयुक्त) वाक्यें करा.

७. ' कावळे कोरूं लागले '; ' शिडें वर धरणें; ' घोड्यास मंडळावर धरणें ' या वाक्प्रयोगांचे व ' निमकहलाल ', ' कंगणीदार ', ' ठाणबंदी ' या शब्दांचे अर्थ स्पष्ट करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वाध्याय

१. तुम्हीं बालवीरांच्या छावणींत गेलां असतां, तेथें पाहिलेल्या देखाव्याचें, 'कँपफायर'चें, खेळांचें व वनभोजनाचें पत्ररूपानें वर्णन लिहा. या वर्णनांत या धड्यांतील तुम्हांला विशेष रसाळ व सुंदर वाटणारे शब्द व वाक्प्रयोग निवडून त्यांचा उपयोग करा.

पुरवणीवाचन

(१) बाजीराव बल्लाळ पेशवे चरित्र—ना. वि. बापट; (२) पानिपतची मोहीम —बापट; (३) दुर्दैवी रंगू—चिं. वि. वैद्य.

---

३. माझे मित्र

कु. सुभद्रा जाधव

कु. जाधव ह्या बडोदें येथील महाराणी चिमणाबाई गर्ल्स हायस्कूलमध्यें अध्यापिका आहेत. आटोपशीर भाषा, वेंचक व सुंदर शब्दांची निवड व वर्ण्यविषयांशीं तादात्म्यता हे या लेखाचे विशेष होत. प्रत्येक परिच्छेदाचा शेवट विचारांत होत असल्यामुळें, लेख फुलांच्या माळेप्रमाणें गुंफला आहे असें वाटतें.

ज्येष्ठ महिन्यांत सकाळच्याप्रहरीं जागायला मन नेहमींच कुरकुरतें, पण देवदारावरील उमलत्या अरुणप्रभेवर बेहद्द खुष झालेला 'दयाळ' आपल्या दिव्य लकेरीची खैरात करूं लागला कीं तापट ग्रीष्मसुद्धां एका पावलानें मागें सरून वसंताच्या हंसऱ्या डोळ्यांनीं पृथ्वीला पाहूं लागतो व मग इतकें चांगलें वाटूं लागतें कीं, पूर्वीच्या उन्हाळलेल्या वृत्तीचा कुठें मागमूसहि राहात नाहीं,

कंटाळा आला म्हणजे मी सहज बाहेर बघतें, तेव्हां जुईच्या कमानींत चोंचींत चोंच अडकवून आपल्या अक्षय्य स्नेहाच्या शपथा मोठ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विश्वासानें कुजबुजतांना, परिस्थिति विसरलेलें कबुतरांचें प्रेमी युगुल पाहून मला मोठी धन्यता वाटते; पण त्याच क्षणीं 'व्यवहार म्हणजे काव्य नव्हे, अनेक बंधनांनीं जखडलेला हा जीव,' असले आयुष्याचें वैराण करण्याची शिकवण देणारे, व्यवहारज्ञांचे संसारी बोल आठवून रडावेंसें वाटतें.

कधीं काळीं तरी 'सुवर्णमंजू'ची जोडी प्रभातकालीं हंसऱ्या आम्र-मंजरीशीं सूर धरून अशी गोड बोलूं लागते कीं, जागेपणीं पडणारें तें पहांटेचें गोड स्वप्न कधींच पुरें होऊं नयेसें वाटतें. पण जरा उजाडूं लागतांच 'हे कोणी नवीन आले आहेत' असें जाणून 'बडबडे' आपल्या वृत्तीला अनुरूप असा त्यांचा पाठपुरावा करूं लागतात. पण त्यांना फारशी वाट न देतां तीव्र व निश्चयी शब्दांत त्यांचा निषेध करीत ते या फांदीवरून त्या फांदीवर व तेथून दुसऱ्या झाडावर उडत आपलें हट्टी गाणें चालूच ठेवतात. शेवटीं सर्व मृदुता टाकून देऊन 'तुमच्या इतकाच या बागेवर आमचाहि हक्क आहे' असें जाणविणारा त्यांचा तो गोड प्रतिकार सुरू झाला म्हणजे फारच गंमत वाटते.

कोणाची पंचाईत न करणारे, स्वतःवरच संतुष्ट असलेले आनंदी, चिमुकले 'सूर्य-पक्षी' तेजःकिरणांत मधुभक्षण करीत या फुलावरून त्या फुलावर कोमल शब्दांसह उडतांना पाहून, मला नेहमींच एक प्रकारचें विलक्षण समाधान वाटतें. कारण रत्नांतील तेज, मखमालींतील मृदुता व जीवनांतील चंचलता यांचा जिवंत संयोग त्यांच्या उडत्या पंखांत मला पाहावयास मिळतो.

पारिजातकाच्या झाडावर घरटें बांधण्यांत तल्लीन होऊं पाहणाऱ्या आपल्या रमणीला खूष करून तिचें श्रमहरण करण्यासाठीं तिच्या जवळच वरच्या डहाळीवर बसून आपली डौलदार शेंपटी उभारून गायनाचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मनोहर आलाप घेणारा छोटा ‘ रसिक ’ माझ्या कौतुकाचें एक सजीव स्थान आहे.

मनोनिर्मित दु:खानें खिन्न झालेल्या हृदयाचे जड पडसाद ऐकल्यामुळेंच कीं काय सहानुभूति दाखविण्यासाठीं धीरगंभीर, दीर्घ पण दु:खपूर्ण अशी कोमल शीळ थांबत थांबत घालणारा, पानाआड लपलेला लहानेला ‘कांचन’ मला मोठा उपकारक वाटतो. प्रत्येक शब्दाबरोबर हृदयावरील भार पडद्या पडद्यानें हलका करीत असतां त्या जागीं प्रसन्नतेचें सिंचन करून शेवटल्या हृद्यंगम आलापाबरोबर संथ आनंदाचे फवारे हृदयांत निर्माण करणारा तो एक अजब जादूगार आहे.

माझी एक बुलबुलाची जोडी अगदीं निर्भय व प्रेमळ आहे. आम्हीं बोलत असतांना अचानक ती कोठून तरी येऊन दिव्याच्या रंगीत फुलावर बसते व असें कांहीं तरी चमत्कारिक मंजुळ, कळत असूनहि न समजणारें किलबिलून ‘ काय गंमत केली यांची ’ असें एकमेकांना संकेतानें कळवून भुर्कन् उडून जाते. मी कितीदां विचार करतें कीं, या पांखरांना काय कळलें असेल बरें ?

कशानें तरी झालेला मनस्ताप मोठ्या त्वेषानें चढत्या शब्दांत प्रशान्त रात्रींहि व्यक्त करणाऱ्या ‘ पपैय्या’बद्दल मला कधीं कधीं फार वाईट वाटतें. झोंपेचा विचारसुद्धां न करणाऱ्या व सर्वांवर संतापलेल्या त्या पांखराच्या कर्कश टाहोंतील चढती कमान पाहून याचें हृदय आतां फुटेल कीं काय, या भीतीनें मी अगदीं अस्वस्थ होतें.

माणकांपेक्षांहि जास्त तेजस्वी अशा लाल डोळ्यांनीं मजकडे चकितपणें निरखिणारी कोकिळा, कावळ्यांचा शब्द दुरून जरी कानावर आला तरी कुठल्या कुठें लपून जाते. पण अत्यंत सुबक व घाटदार शरीराचा कोकीळ जरा चिडका व रागीट जरी असला तरी मोठा धीट व हुषार असतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तो कावळ्यांना फसवून आपल्यामागें येण्यास लावतो व चाळवत चाळवत त्यांना त्यांच्या घरट्यांपासून दूर नेतो आणि त्याची ती भित्री व बावळट वाटणारी सहचरी मोठ्या धिटाईनें कावळ्याच्या घरट्यांत अंडे घालून, त्यांतलें मूळचें एक अंडें चातुर्यानें खालीं ढकलून देते व लपत छपत उडून जाते; आणि या सुमारास आपला कार्यभाग साधला असणार असें जाणून इतका वेळ मुद्दाम थोडेंसें अंतर राखून उडणारा कोकीळ, सहज वेगानें विजयी कुहुहाट करीत सफाईनें निसटतो व बिचारे कावळे आपला बोजड पाठलाग टाकून देऊन घरट्याकडे निराशेनें वळतात; पण अंड्यांतील बदल लक्षांत न येऊन 'आपण किती मेहनतीनें तीं सुरक्षित राखलीं' अशा अज्ञानाच्या समाधानांत ते गर्क होऊन जातात.

माथेरानच्या झाडींतील स्वतंत्र वातावरणांत स्वैरपणें उडत असणारे अति मोहक, चपल पण डोक्यावरील टोंकदार लोखंडी शिरस्त्राणामुळें करारी वाटणारे 'दिल्बहार' घंटेसारखा मंजुळ व मोकळा शब्द करीत येऊन समोरील झाडावर टेंकतांत व क्षणमात्र विलक्षण आर्जवी दृष्टीनें रोंखून पाहून चपलतेनें उडून जातात. त्यांचा आशय कळून माझी मुग्ध दृष्टि मात्र त्यांच्या मागोमाग फिरते; पण मी स्वतः इच्छा असूनहि कशी जाणार ?

पांढरा शुभ्र 'नंदन' काय तो एकदांच आपल्या तांबड्या नंदिनीसह हिमालयांतील आपलें रम्यस्थान सोडून येथें आला होता. पण अगदीं थोड्याच वेळांत, निळ्या ढगांतून विद्युल्लतेची रुपेरी रेखा नागमोडींत चमचमून जशी अदृश्य होते, तसा तो आपली हातभर लांब शेपटी बाणासारखी मागें सरळ करून मोठ्या ऐटीनें वेगांत हवेंतून वर खालीं तरंगत तरंगत तिच्यासह दिसेनासा झाला. त्या चटका लावून गेलेल्या तिरंदाजाची, कदाचित् तो चुकून पुन्हां येईलहि अशा वेड्या आशेनें मी वाट पहात असतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पक्ष्यांची आठवण होतांच अनेक पक्षी डोळ्यांसमोर येतात. नाजूक पंख्यासारखा पिसारा करून उत्साहानें उड्या मारणारा 'नर्तक,' कमालीचें सुंदर घरटें बांधणारी 'सुग्रण,' मान खांद्यामध्यें खेंचून घेऊन, तारेसारखी आपली शेंपटी व चोंच एका तिरप्या रेषेंत आणून निरिच्छपणें किड्यांची वाट पहात आकाशाकडे डोळे लावणारा 'सुरंगी,' लाडानें मान वेळावून टक्-टक् करणारा 'तांबट,' भीतीचें किंचिन्मात्र चिन्ह दिसतांच आपला पसरलेला सुंदर शिरपेंच आवरून घेऊन तो एकदम भाल्यासारखा ताठ करणारा 'सुतार,' लाल मखमलीच्या कोटावर झगझगीत जरीची झूल पांघरून प्रतिष्ठितपणें झाडावर घसरपट्टी करणारा 'द्रुमचर,' झाडाच्या शेंड्याशींच लपून बसून चोरलेले रुपये खणखणावणारा 'टक्का चोर' असे कितीतरी माझे मित्र आहेत.

हीं पांखरें म्हणजे सृष्टीच्या स्वयंस्फूर्त, तेजस्वी हास्याचे आयुष्यमार्गावर उधळलेले कण आहेत. त्यांना पाहून प्रफुल्लित कृतज्ञतेनें माझें मन भरून येतें.

कर्दळीच्या झाडावरून, उंच मान करून घरांत डोकावणाऱ्या मोठ-मोठ्या केशरी, तांबड्या, सुंदर फुलांना, अंतरंगांत शिरूं पाहाणारे हे कोणी आपले प्रतिस्पर्धी आहेत असें समजून द्वेषानें त्यांच्यावर झडप घालून त्यांना कट्कट् खुडून टाकल्यावर अभिमानाचा एकवार कटाक्ष फेंकून आपल्या विध्वंसांत समाधान मानीत उडून जाणारी द्वाड चिमणीदेखील मला मनांतून आवडते.

अभ्यास

१. 'मीं कितीदां विचार करतें कीं, या पांखरांना काय कळलें असेल बरें?' हा इंग्रजी धर्तीचा भाषाप्रयोग आहे. अशा तऱ्हेचीं आणखी कांहीं उदाहरणें या धड्यांतून निवडून काढा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. लेखिकेला गडकरी संप्रदायाप्रमाणें बहुतेक नामामागें विशेषणें लावण्याची फार हौस दिसते. उदाहरणार्थ : 'हंसरे डोळे,' 'उडत्या पंखांत', 'विजयी कुहुहाट'. या धड्यांतून अशाच तऱ्हेचे आणखी कांहीं शब्द निवडून काढा.

स्वाध्याय

१. या धड्यांत वर्णन केलेल्या पक्ष्यांचीं वर्णनें वाचून त्यांचीं चित्रें पहा.
२. कोकिळास 'परभृत' कां म्हणतात ?
३. तुम्हांला परिचित असलेल्या पशूंचें किंवा पक्ष्यांचें अशाच मजेदार शब्दांत वर्णन करा.

पुरवणीवाचन

(१) पशु आणि पक्षी—देशपांडे आणि गोखले; (२) सृष्टिज्ञान–बर्न्स आणि रानडे (लॉंगमन्स).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२

बहादुरीचीं व धाडसाचीं वर्णनें

४. क्रिकेटच्या सामन्यांतील हिंदूंचा पहिला विजय

१९०६ सालीं हिंदु व युरोपिअन यांमध्यें क्रिकेटचा मोठा अटीतटीचा सामना झाला. या सामन्यांत हिंदु विजयी झाले. हिंदूंचा हा पहिलाच विजय होय. या सामन्याचें, त्या वेळेस मुंबई येथें, ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर व वऱ्हाडांतील एक नामांकित कादंबरीकार बाळकृष्ण संतुराम गडकरी यांच्या संपादकत्वाखालीं निघणाऱ्या 'महाराष्ट्र-वाग्विलास' या मासिकांत आलेलें वर्णन येथें दिलें आहे. क्रिकेटच्या सामन्यासंबंधींचा प्रस्तुतचा लेख, लढाईचें रूपक घेऊन, लेखकानें सजविला आहे. साधी सुटसुटीत व उत्तेजक अशी यांतील भाषा असून, खेळांतल्या बारकाया न वगळतां वर्णन पहिल्यापासून शेवटपर्यंत अगदीं रंगदार केलें आहे.

गुरुवार उजाडला. इंग्रज खेळगडी व हिंदु यांची ओली सुकी होऊन पहिला डाव हिंदूंनीं घेतला. बाराच्या ठोक्याला टाळ्यांच्या गजरांत इंग्रज कप्तान ग्रीग आपल्या बहाद्दर गड्यांसह मैदानांत दाखल झाला. हिंदूंच्या वतीनें उत्तर दरवाजावर आगासकर ह्यांची नेमणूक झाली व दक्षिण द्वारापाशीं बलवान पंढरीनाथ तेलंगांची भक्कम मूर्ति उभी राहिली. दक्षिणेकडून डीज व उत्तरेकडून विल्सन् ह्यांनीं इंग्रजांतर्फे गोळ्यांचा भडिमार सुरू केला. जेमतेम सात धांवा सर झाल्या. इतक्यांत वीरमणी तेलंगास डीजनें तंगडीमोड करून चीत केलें. न्यायमूर्ति तेलंगांच्या चिरंजिवाचा क्रिकेट-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

66 म/5 २०२०५
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सृष्टींतील हा अकालीं अस्त पाहून सारे हळहळले! (७–१–२). बॅटिंगचा बंदा भक्त बंडा आगासकरच्या कुमकेस गेला. दोघांनीं डीज व विल्सन्ला पुष्कळ शिणविलें; पण शेवटीं पस्तीस मिनिटें टिकून व फक्त दोन धांवा सर करून आगासकर डीजच्या संसर्गानें, इंग्रज दारवान सांडरसन ह्याच्या हस्तगत झाला. (९–२–२). सेनापति चुनीलाल रणांत दाखल झाला. सर्व लोकांचे डोळे त्याजकडे लागले. बंडानें मॅचमधील पहिली चौकडी फडकाविली व टाळ्यांचा वर्षाव झाला. चुनीची व बंडाची जोडगोळी काय करील कोण जाणे म्हणून लोक मनांत मांडे खात आहेत तों डीजनें हिंदु कप्तानाचें शीर उडविलें. हिंपूनीं माना खालीं घातल्या, व त्यांच्या दुःखावर डाग देण्याकरितांच जणुं कांहीं पारशी प्रेक्षकांनीं "वंदे मातरम्" पुकारून टाळ्यांचा एकच गजर केला. (१५–३–१). वढवाणचा योद्धा ओघडशंकर मोठ्या नेटानें पुढें सरसावला. पण बंडाला काय बुद्धि झाली कोण जाणे, अति अधाशीपणा करून हा लवकरच कोसळून पडला. (२०–४–९). हाय! हाय!

इतक्यांत दाते धीरानें सौराष्ट्र वीराच्या मदतीस आला. आहाहा! ओघडशंकर हा काठेवाडी लढवय्या इंग्रज गोलंदाजांस इतका अवघड गडी झाला आहे हें पाहून प्रेक्षकांस आनंद व आश्चर्य वाटलें. दात्याचे सफाईदार फेरफटके व ओघडशंकरच्या चौकड्या झडूं लागल्या! विसाचे तीस, तिसाचे चाळीस, व चाळिसाचे पन्नास झाले. विल्सन्च्या जागीं कॅंबेल आला व डीजच्या जागीं टर्नर आला—एक तास झाला तरी ओघड व दाते यांची जूट तुटेना. सत्तर चढले. चौऱ्याहत्तर झाले. पैकीं ह्या जोडीनें प्रत्येकीं एकतीस धांवांचें यश संपादलें. तेव्हां कप्तान ग्रीग स्वतः कॅंबेलच्या जागीं गोलंदाजी करूं लागला. तरी कांहीं वळेना. पुन्हां डीज व विल्सन् आपल्या पूर्वकामावर रुजू झाले.

LIBRARY, GURUKULA KANGRI.
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सव्वा दोहोंच्या सुमारास नामदार गव्हर्नरची स्वारी आपल्या लवाजम्या-सह मैदानांत आली. ८०–९० पटापट चढले व शंभरास एक कमी असतां दोन प्रहरच्या खान्याची घंटा वाजली. नामदार लॉर्ड लॅमिंग्टन, इंग्रज व हिंदु टीमबरोबर मेजवानीस बसले असतां खेळाच्या भावी स्वरूपाविषयीं उपाहार करितांना प्रेक्षक अटकळी बांधीत होते.

असा कल्पनेचा बाजार चालला आहे तों सुरवातीची घंटा झाली व रणाकडे सर्वांची नजर लागली. डीज व विल्सन्‌ची गोलंदाजी व ओघड व दात्याची वारबाजी यांचा मजेदार सामना सुरू झाला. लवकर बोर्डावर १०० चा आंकडा झळकला! ओघड सोळा आणे खेळत होता. एकशेंवीस चढल्या तेव्हां त्याच्या साठ व दात्याच्या छत्तीस धांवा सर झाल्या होत्या. हें टिपण करीत आहें तोंच दात्यांस डीजचा वार लागून, सांडर-सनच्या हातीं त्यानें आपली मान दिली. (१२९–५–३८). चार महारथी चीत होऊन फळ्यावर फक्त विसाचा आंकडा पडला आहे. अशा नाउमेदीच्या व आणीबाणीच्या वेळीं दाते मैदानांत गेला व दीड तास सुरेख खेळून ओघडबरोबर एकशेंनऊ धांवा सर करून त्यानें हिंदूंच्या पडत्या घरास वांसा घातला, म्हणून त्याची टाळ्यांच्या वर्षावानें संभावना झाली ती योग्यच होय! काठेवाडचा रजपूत गडी शिवलाल, ओघडच्या कुमकेस आला पण आला तसाच गेला. (१२९–६–०). यांचे मागून पटाईत बाळू रणांत आला पण थोड्या अवधींत ओघड डीजच्या गोळीनें सांडरसनच्या हातीं पडला. (१३८–७–६९). ओघड अप्रतिम डाव खेळला. शेषाचारी बाळूला येऊन मिळाला. फटकेबाजी चालविली व लोकांना आनंदीत केलें. त्यांना काय सर्वच गोलंदाज सारखे. कॅंबेल, ग्रीन व चिथॅम ह्यांची अदलाबदल झाली पण सर्वांनीं हात टेकले! १३८ वरून १९० वर आंकडा गेला. आणखी सात धांवा झाल्यावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डीजच्या साडेसातीनें बाळू गतप्राण झाला. धिटाईनें खेळून त्यानें आपली कामगिरी चांगली बजावली. (१९७–८–२५). शिवरामनें भावाची जागा भरली व दोनशेंचा आंकडा फळ्यावर चढला. चिथॅम्च्या जागीं टर्नरनें गोलंदाजी सुरू केली व लगेच शेषाचारीनें नमस्कार घातला. एकंदरीनें शेषाचारी चांगला धीरानें खेळला. (२१५–९–२९). खडकीच्या इराशानें बराच वेळ शिवरामबरोबर टिकाव धरला. २४२ रन्स झाल्या तेव्हां इराशाला डीजनें झेलून पाडलें. (२४२–१०–५). मोठ्या धिटाईनें ३४ रन्स झोडून शिवराम अजित राहिला. हिंदूंचा डाव एकंदर साडेतीन तास चालला. **इंग्रजांच्या डावास** सुरवात झाली. फ्रायसारख्या मार्मिक विलायती क्रिकेटपटूच्या कसोटीस उतरलेला ग्रीग महापराक्रमी चिथॅम् बलभीमास बरोबर घेऊन डेऱ्यांतून निघाला. तेव्हां सलामीच्या टाळ्यांचा एकच गजर झाला. कीर्तिवान् बाळूस गोलंदाजीच्या सुरवातीचा मान मिळाला. सौराष्ट्र योद्धा ओघड यानें नांवाजलेले गोतेबाज गोळे सोडले. इंग्रज वीर मोठ्या उत्साहानें व काळजीनें खेळत होते. फळ्यावर दहा रन्स चढल्या व सूर्यास्त झाला.

दुसरा दिवस :—कालचा अजित वीर ग्रीग, चिथॅम्सह मैदानांत दाखल झाला. पण हिंदूंच्या गोलंदाजींत फरक झाला व विद्युल्लतेच्या वेगानें गोळे फेंकणाऱ्या इराशाची योजना झाली. बाळूनें दक्षिणेकडून आपला मारा चालविला होता. इंग्रजांच्या दहा धांवा बोर्डावर होत्या त्या पंचवीस झाल्या तेव्हां वस्ताद गडी ग्रीग इराशानें पाडला ! (२५–१–११).

महारथी जेव्हां चीत झाला तेव्हां हिंदूंच्या यशाची आशा जरा उजळूं लागली व गोऱ्यांचे पाय किंचित् गळाले. रिनाउन जहाजावरील वीर डीबर्ग चिथॅम्च्या कुमकेस आला. पण अकरा धांवा वाढल्या नाहींत तोंच इराशानें चिवट चिथॅम्चे बारा वाजविले. (३६–२–२१).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्या खेळाडूस पाडणाऱ्या इराशाचें लोक साहजिकच कौतुक करूं लागले. झांशीचा मोहरा कॅरल, डीबर्गला जाऊन मिळाला व लवकरच पन्नासांचा आंकडा बोर्डावर फडकला. तेव्हां बाळूच्या जागीं ओघडला घालून इराशाच्या माऱ्याची दिशा फिरविली गेली. थोड्याच मिनिटांनीं इराशानें कॅरल यास बेमालुम झेलून पाडलें. (६१–३–६). यावेळीं चॅपलिन डीबर्गच्या जोडीस आला व ह्या जोडीनें डावास बराच रंग आणला. पण नव्वदाचा आंकडा चढला न चढला तोंच डीबर्गचें शीर इराशाच्या हातीं पडलें. (९०–४–२७). डीबर्ग उत्तम खेळला असें म्हणावें लागतें. विल्सन् चॅपलिनला जाऊन मिळाला. सात धांवा केल्या नाहींत तोंच इराशाला वार करतांना चॅपलिन सेनापति चुनीच्या हातांत सांपडला. (९७–५–१९). टर्नर पुढें सरसावला, व लवकरच ११० चढले. इतक्यांत ओघडशंकरनें तंगडी तोडून त्याला ठार केलें. (११०–६–८). रॉस टर्नरच्या कुमकेस आला व दोघांनीं फटकेबाजी सुरू केली. १३० झाल्या ! १३७ धांवा झाल्या तेव्हां हिंदु कप्तानानें स्वतः गोलंदाजी पतकरली. यावेळीं गरुडपक्षासारख्या तीक्ष्ण नजरेच्या शेषाचारीनें टर्नर रेषेबाहेर निघाला त्यास कसें सोडलें ह्याचें सर्वांना कोडें पडलें. विश्रांतीची घंटा झाली. फराळ करून ताजे तवाने झालेले इंग्रज वीर पटापट पडूं लागले; व अर्ध्या तासांत सारे आटपले ! आणखी सहा धांवा सर झाल्यावर बाळूनें टर्नरची तंगडी कापून काढली व त्याला चीत केलें. (१७५–७–३९). डीज रॉसला येऊन मिळाला. पण बाळूच्या दुसऱ्या गोळ्याचा स्पर्श होऊन तो शेषाचारीच्या चलाख हातांत सांपडला. (१७५–८–०).

सांडर्सन रॉसला मिळून दोघांनीं १९३ पर्यंत धांवांचा आंकडा रेटला. रॉस इराशाच्या भयंकर वारानें घायाळ होऊन बंडाच्या हातीं सांपडला !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(१९३-९-३२). त्यांच्या मागून कॅंबेल आला, व एक धांव जास्त झाली नाहीं तोंच शेषाचारीनें, रेघेबाहेर निघतांच त्याची मान उडवली. (१९४-१०-१). येणेंप्रमाणें ह्या अति मनोवेधक नाटकाचा पहिला अंक आटपला. हिंदूंचा स्कोअर २४२, इंग्रजांचा स्कोअर १९४, हिंदूंची सरशी ४८ फेऱ्यांनीं झाली.

हिंदूंच्या दुसऱ्या डावाला साडेतिहींच्या सुमारास सुरवात झाली. आगासकर तेलंगची जोडी डीज-विल्सन्‌च्या जोडगोळीसमोर दाखल झाली. आगासकर मोठ्या शांतपणें डीजला दाबून काढीत होता. तेलंगनें इंग्रज गोलंदाजांवर आपली गदा चांगली फिरविली, इतक्यांत डीजनें मोर्चा फिरवून दुसऱ्या बाजूनें मारा सुरू केला व तेलंगाला चीत केलें. (४१-१-३५). बंडा आगासकरच्या कुमकेस गेला. आतां तरी हा बडा बॅट्स्मन् आपलें नांव काढील असें लोकांना वाटूं लागलें. इतक्यांत पहिल्या डावाप्रमाणेंच ह्या दुसऱ्या डावांत बंडा धांवत असतां कॅरलनेंच पूर्वींप्रमाणें आपल्या तीव्र तिरंदाजीनें त्याला चीत केलें. (४९-३-६). दाते रणांत आला व थोडक्या वेळांतच डीजनें त्याची बत्तिशी रंगविली (४९-४-०). हिंदूंचीं धाबीं दणाणलीं ! !

पावणेपांचाला हिंदु कप्तान चुनीलाल आगासकरला जाऊन मिळाला. तेव्हां डीज व टर्नर हे दोघे मोठ्या नेटानें बोलिंग करीत होते. हिंदु वीरद्वयानेंहि मोठ्या नेटानें खेळ चालविला. आगासकरनें डीजला दाबदाबून जेरीस आणावें व चुनीलालच्या मधून मधून चौकड्या झडाव्या. ९१ चढले. शेवटीं डीजला हात टेकावे लागले. कॅंबेल आला व विल्सन् त्याला सामोरा आला.

आगासकर आपल्या कप्तानाच्या हुकुमाप्रमाणें धांव काढीत असतां त्याला रन आउट् केला. (९३-५-१८). आगासकर दोन तास फार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुरेख खेळला ! एक डीजला किंवा अंपायर व खेळगडी ह्यांनांच त्याच्या अप्रतिम किल्लेदारीचें मोल ठाऊक ! आगासकरच्या जागीं बाळू आला व दोन चार फेरफटके करून तो पाठीमागें डीजला फोडून काढतांना ग्रीगनें त्याला मोठ्या सुंदर रीतीनें झेलून पाडलें. (१०८-६-११).

तिसरा दिवस :—आज डावाचा खास निकाल लागावयाचा. तेव्हां आजची गर्दी विचारूंच नका. कोण जिंकेल ह्याविषयीं कोणास खात्रीनें सांगवेना. नॉट आउट् राहिलेल्या हिंदु कप्तानावर हिंदूंची सारी भिस्त होती. शिवराम त्याच्या जोडीस आला, व चुनीनें सुंदर फेरफटके करून बोर्डावर १४० आणले. मध्यें त्यास एकदां कँबेलनें जीवदान दिलें; परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. कारण तो लवकरच सांडरसन्च्या हातीं पडला. (१५१-७-६०).

शेषाचारी शिवरामला जाऊन मिळाला व लगेच तीन धांवा करून पडला. (१५९-८-३). शिवलाल आला व त्याला डीजनें झेलून पाडलें. (१५९-९-०). इराशानें त्याची जागा घेतली पण टर्नरची गोळी लवकरच झेलली जाऊन तो पडला. (१६०-१०-१). ह्या १६० व आधींच्या ४८ मिळून हिंदूंच्या साऱ्या २०८ धांवा इंग्रजांना फेडावयाच्या राहिल्या. साडे बारांचा सुमार, तेव्हां इंग्रजांस स्कोअर करण्यास वेळ पुष्कळ होता. एकंदरींत खेळ मोठा चित्तवेधक व कसोकशीचा होईल ह्यांत संशय नव्हता. सुमारें एक वाजतां इंग्रज वीर ग्रीग व चिथॅम् हे रणांत आले, व बाळु आणि इराशा या उभयतांनीं आपला तोफखाना सुरू केला. लवकरच चिथॅम् इराशाच्या गोळ्यासमोर पाय घालून चीत झाला. (८—१—३). डीबर्ग ग्रीगच्या कुमकेस आला व चाळिसाजवळ आंकडा आणिला असतां डीबर्ग बाळूच्या जाळ्यांत सांपडला. (३९—२—१०). कॅरलनें डीबर्गची जागा भरली. यानें कप्ताना-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बरोबर पन्नासपर्यंत मजल केली. परंतु त्याची बाळूपुढें डाळ शिजली नाहीं ! (५३–३–८). टर्नर आला व बाळूस पायाकडे वार करून वळून पाहतो तों ओघडशंकरनें भूमातेस साष्टांग घालून त्याला झेलून पाडिलें. (५७–४–०). विल्सन् पुढें सरसावला. ६५ धांवा झाल्या तेव्हां फराळाची घंटा झाली. फराळानंतर ग्रीग व विल्सन् तंबूंतून निघाले. बाळू-समोर लढत असतां विल्सन्चें डोकें चुनीच्या हातीं पडलें ! (६५–५–१). पहिल्या डावांत नांव काढलेला रॉस लढावयास सिद्ध झाला, परंतु दुर्दैवानें राक्षसी कप्तान ग्रीग रेषेबाहेर निघालेला पाहून शेषाचारीनें अवर्णनीय चपलतेनें त्यास पदच्युत केलें. (६५–६–२७). आतां इंग्रजांचे हात पाय गळाले. नंतर डीज व रॉसची जोडी जमली व लवकरच फुटली. (६९–७–१). कँबेल शिबिरांतून बाहेर पडला. दोघांनीं १०० वर आंकडा नेला. लवकरच कँबेलनें बाळूच्या गोळ्यासमोर पाय घालून आत्महत्या केली ! (१०२–८–१४). सांडरसन पुढें झाला ! पण लगेच इकडे रॉसचें शीर इराशानें उडवलें असें नजरेस आलें. (१०२–९–२२). चॅपलिन् सारखा महावीर आजारी झाल्यामुळें डाव आटपला व हिंदु इंग्रजांपेक्षां १०६ धांवांनीं सरस ठरून हें अति मनोवेधक चार अंकी नाटक खलास झालें.

जेथें तेथें एकच कल्लोळ व आनंदी आनंद झाला ! इंग्रज बहाद्दर हरले तरी मर्दासारखे आपल्या प्रतिस्पर्ध्यास जयश्रीची माळ घालण्यास मोठ्या उत्साहानें आले.

अ भ्या स

१. ‘ मांडे खाणें ’, ‘पडत्या घरास वांसा घालणें,’ ‘कल्पनांचा बाजार’ यांचा अर्थ स्पष्ट करा.

२. ‘ दारवान ’, ‘ गोतेबाज गोळे ’ हे शब्द कोणत्या इंग्रजी शब्दांचे ऐवजीं वापरले आहेत तें सांगा. असे आणखी शब्द शोधून काढा व त्यांच्या अर्थाचे इंग्रजी शब्द सांगा.

३. टर्नर शून्य धांव करून झेलला गेला, परंतु स्कोअरमध्यें चार धांवांची भर पडल्याचें दाखविलें आहे हें कसें ? हिंदूंच्या दुसऱ्या डावांत एका गड्याचें नांव गळालें आहे तें कुठें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. कुमक, गोलंदाज या शब्दांचे जागीं क्रिकेटच्या सामन्यांत हल्लीं जे शब्द वापरतात ते लिहा.

स्वाध्याय

१. अशा प्रकारें लढाईचें किंवा दुसरें योग्य रूपक घेऊन वार्षिक परीक्षेचें किंवा तुमच्या गांवांतील म्युनिसिपालिटीच्या किंवा लोकलबोर्डाच्या निवडणुकीचें वर्णन करा.

.५. एका स्वारींत दोन वाघ !

'शिकाऱ्या'

प्राचीन काळीं 'मृगया' (शिकार) करून हिंस्र श्वापदांपासून लोकांचें रक्षण करणें, हें राजेलोकांच्या अनेक कर्तव्यांपैकीं एक समजलें जाई. संस्कृत काव्यांत अशा मृगयांचीं अनेक सुरस वर्णनें आढळतात. अशा तऱ्हेचीं वर्णनें वाचून एकप्रकारची वीरवृत्ति जागृत होते; कांहींतरी पराक्रम करण्याची हिरीरी उत्पन्न होते. अलीकडे आपल्या देशांत लष्करी पेशा नष्ट झाल्यामुळें, अशा तऱ्हेची वृत्ति लुप्त झाली आहे; त्यामुळें असे प्रसंग क्वचितच ऐकावयास मिळतात. दुसरें असें कीं कुठें असे पराक्रम झाले, तर त्यांचीं विस्तृत व सुंदर वर्णनें क्वचितच कोणी लिहितो. आम्हांला ती हौसच नाहीं. उलट परदेशांकडे पहा. तेथील अनेक साहसी लोक सिंह, वाघ, जंगली हत्ती, रानडुक्कर, रानरेडे यांच्या शिकारी करण्याकरितां आफ्रिका, हिंदुस्थान, ब्रह्मदेश यांसारख्या दूरदूरच्या देशांत प्रवास करतात

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व त्यांत त्यांस आलेले अनुभव, त्यांच्या प्राणावर गुदरलेले प्रसंग, अनेक संकटांतून सहीसलामत बाहेर पडून त्यांनीं गाजविलेली मर्दुमकी यासंबंधींचीं संगतवार व सुरस वर्णनें लेखरूपानें किंवा पुस्तकरूपानें ते प्रसिद्ध करतात. इंग्रजींत तुम्हांला अशीं कितीतरी पुस्तकें वाचावयास सांपडतील. येथें एका 'शिकाऱ्या'चा घेतलेला लेख आपल्या देशांतील शिकारीचा परिचय चांगल्या तऱ्हेनें करून देईल. यांत तुम्हीं पूर्वी न ऐकलेले असे कांहीं शब्द व वाक्प्रयोग तुम्हांस वाचावयास मिळतील.

पूर्वीं बातबेत कांहींच झालेला नसतांना अकस्मात् श्री. आप्पासाहेबांचें पत्र आलें, कीं 'वाघाच्या शिकारीसाठीं कारवार जिल्ह्यांत कॅसल रॉकनजीक ब्लॉक रिझर्व केले आहेत. आमचा बेत उद्यांच निघण्याचा आहे, तरी आपण जरूर या शिकारीस यावें.' कांहीं झालें तरी वाघाच्या शिकारीसाठीं खास सरकारांचें आमंत्रण तें! मग कोणता खरा शिकारी अशी संधि व्यर्थ जाऊं देईल?

शनिवारीं दोन ट्रक्समधून सात रेडे, बंदुक-भालदार, व कांहीं सामान असें कोल्हापूरहून पुढें चांदवाडीच्या मुक्कामावर पाठवून देण्यांत आलें. चांदवाडी हें ठिकाण कोल्हापूरहून सुमारें १५० मैल आहे. बंदुक-भालदार बाळू व रामजी ह्यांना सोमवारीं संध्याकाळीं ३—४ रेडे बांधण्याबद्दल हुकूम देण्यांत आला होता. बाळू व रामजी हे दोघेहि कोंकणे असून वाघाच्या शिकारींत अत्यंत कुशल व धाडशी आहेत. सरकारस्वारी व आम्ही मित्रमंडळी सोमवारीं कोल्हापुराहून मोटारीनें रात्रीं आठ वाजण्याच्या सुमारास निघालों. जातांना सर्व तऱ्हेच्या शिकारीबद्दल—विशेषतः वाघाच्याच शिकारीवर चर्चा चालली होती. आज लोकांना जंगलांत रेडे बांधण्याबद्दल सांगितलें आहे ते त्यांनीं आतांपावेतों बांधले असतील, इत्यादि रेड्यांबद्दल चर्चा झाली. कोणी म्हणत होते कीं, 'जर खरोखरीच उद्यां वाघाची वर्दी लागली तर माझें साधलेंच म्हणून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समजा; कारण उद्यां माझा घातवार नाहीं.' वगैरे वगैरे गप्पा मारीत रात्रीं ३-४ च्या सुमारास एका दाट जंगलामधून चाललों होतों. आसपासची घनदाट झाडी, त्यांतून मधून मधून चकाकणारे काजवे व रातकिड्यांचा किर्र आवाज हीं फार भेसूर वाटत होतीं. इतक्यांत एक मोठी नदी आडवी आली! अजून पुढचा रस्ता तास अर्ध्या तासाचाच उरला होता. वारा गार सुटला होता, थंडी तर मी म्हणत होती. अशा परिस्थितींत पुढें जावें कीं सकाळ होईपर्यंत तेथेंच थांबावें असा प्रश्न पडला! पुढें जावें तर नदी आडवी येते, थांबावें म्हटलें तर ऐन जंगलांत अपरात्रीं राहणें धोक्याचें वाटूं लागलें; कारण त्या जंगलांत हत्तींचे कळप, मोठे वाघ, वगैरे हिंस्र श्वापदें असल्या-मुळें त्यांच्या शिकारीऐवजीं एखाद्या वेळीं आमचीच शिकार होण्याचा संभव होता. शेवटीं नाइलाजास्तव तशा परिस्थितींत तेथेंच राहणें प्राप्त झालें. तेथील जवळचीं लांकडें गोळा केलीं व दिलीं पेटवून नी बसलों त्याभोंवतीं शेकत.

नंतर अरुणोदय होतांच आम्हीं ती नदी ओलांडून पुढें येणार तोंच रामजी आम्हांस वाघाची वर्दी देण्यास आनंदित मुद्रेनें सामोरा येतांना दिसला.

आदल्या दिवशीं म्हणजे सोमवारींच संध्याकाळच्या सुमारास चार ठिकाणीं एक एक रेडा बांधण्यांत आला होता. आतां शिकारींत रेडा कशासाठीं लागतो, तें आमच्या बहुतेक वाचकबंधूंस ठाऊक असेलच. ज्या ठिकाणीं जंगलांत वाघांची वस्ती जास्त आहे, अशा ठिकाणीं कांहीं अंतरावर रेडे बांधून ठेवतात, आणि जर त्या जंगलांत वाघांचें अस्तित्व असेल तर तो नित्याप्रमाणें आपलें भक्ष्य शोधण्यासाठीं बाहेर पडतो व अशा बांधून ठेवलेल्या रेड्यावर हल्ला करून त्याचा बळी घेतो. आणि त्या ठिकाणाहून आसपास जवळच ज्या ठिकाणीं पिण्यास पाणी भरपूर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे, जेथें सहसा कोणी येणार नाहीं व आपलें खाद्य कोणी लांबवणार नाहीं अशा ठिकाणीं दाट झाडींत तो मारलेला रेडा नेऊन ठेवतो.

वाघाच्या स्वभावावरून त्याचे दोन प्रकार मानले जातात. एक 'चोरटा वाघ' व दुसरा 'घरचा वाघ'. 'चोरटा वाघ' हा त्या जंगलाचा रहिवाशी नसून नुसता फिरत फिरत आलेला असतो. तो मारलेलें सावज सांपडेल त्याच ठिकाणीं खलास करतो व उरलेंच तर पुन्हां येऊन खातो. पण आपल्या वस्तीस नेण्याच्या भानगडींत पडत नाहीं. परंतु 'घरचा वाघ' हा त्या जंगलाचाच रहिवासी असल्यानें त्याचें वास्तव्य तेथेंच असतें. हा वाघ मारलेलें सावज जागच्या जागीं बहुधा खात नाहीं तो तें आपल्या निवाऱ्याच्या ठिकाणीं नेऊन तेथें त्याची व्यवस्था करतो.

संध्याकाळीं रेडे बांधून झाल्यावर पुढील काम म्हणजे, दुसऱ्या दिवशीं पहांटे अगदीं शांतपणें रेडा बांधलेल्या जागीं जाऊन तेथील परिस्थिति काय आहे तें पहावें लागतें. जर रेडा 'मोडला' (मारला) असेल व त्या रेड्याचा कोणताहि भाग तेथें पडलेला नसेल तर तो वाघ 'घरचा' असून जवळच आसपास कोठें तरी आहे म्हणून समजावें. हीं कामें रामजी व बाळू यांच्याकडे सोपविण्यांत आलीं होतीं. हे लोक तेथील वाघ किती लांब व रुंद आहे, एकच आहे कीं अनेक आहेत, त्याच्या शरीराचा कल कसा आहे, तें जनावर फिरस्तें आहे कीं वस्तीस आहे, अगर तें कोणत्या दिशेनें गेलें आहे, हें सर्व रेडा मोडलेली जागा, वाघाची उमटलेली पावलट, गवतावर लोळलेल्याच्या खुणा, विखुरलेली माती, ताजी विष्ठा अगर झाडांच्या बुंध्यांवर घासलेल्या पंजांचे ओरखडे वगैरेंवरून जाणतात. विशेषतः या कामीं त्याची उमटलेली पावलट हीच फार उपयोगी पडते. मोठा वाघ असेल तर त्याच्या पंजाचा आकार चार ते सात बोटेंपर्यंत असतो. अर्थात् या सर्व गोष्टींची हकीगत आम्हांस राम-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जीनें मोटारींतच कळविली. त्यानें सांगितलेल्या वर्णनावरून जनावर मोठें असून तेथेंच वस्तीस आहे असें कळलें. शिवाय बांधलेल्या रेड्यांपैकीं एकच रेडा मोडला असल्याची वर्दी लागतांच आम्ही ताबडतोब पुढील तजविजीस लागलों.

वाघांची शिकार मुख्यत: दोन तऱ्हांनीं करतात. मारलेला रेडा ज्या ठिकाणीं वाघानें नेऊन टाकला असेल त्या ठिकाणीं थोडक्या अंतरावर, उंच झाडावर माळा घालून रात्रीं बसतात व ज्या वेळीं तो वाघ मारलेला रेडा खाण्यासाठीं येतो, त्या वेळीं त्यावर विजेच्या दिव्यानें उजेड पाडून बंदुकीनें मारतात. अशा शिकारींत वाघ बेसावध असला तरी त्यावर रात्रीं अचूक नेम मारणें कठीण जातें, फार वेळ तिष्ठत बसावें लागतें, व इतकें करूनहि त्या वेळीं तेथें कोणतें जनावर येईल याचा नेम नसतो. एखाद्या वेळीं हत्तींचा कळपहि येण्याचा संभव! तशांतून मारलेली गोळी बरोबर वर्मीं लागली तर ठीक, पण चुकून अर्धवट लागली तर मात्र माळ्यावरील शिकाऱ्यांस सकाळपर्यंत आपली जागा सोडतां येत नाहीं. मात्र अशा शिकारीस फारसा खर्च येत नाहीं. परंतु सरकारांनीं वाघाची शिकार जंगल उठवून करण्याचेंच निश्चित केलें असल्यानें आम्ही ताबडतोब हांकेवाल्या मंडळींना जमा करण्यासाठीं आसपास खेड्यांत दोन मोटारी पाठवून दिल्या.

आमच्या तळापासून जंगल पांचसहा मैल दूर होतें. हांकेवाली मंडळी येईपर्यंत आम्हीं सर्वांनीं भोजन वगैरे आटोपून घेतलें. तिकडे जंगलांत तोंपर्यंत बाळू व रामजी यांनीं झाडांवरून सुमारें वीस बावीस फूट उंचीवर सरकारांच्यासाठीं एक व आमच्यासारख्या स्नेही मंडळीसाठीं दोन, असे एकंदर तीन माळे घालून तयार ठेवले होते. दुपारीं बारा एकच्या सुमारास सर्व हांकेवाली मंडळी जमतांच ‘हांका’ कोणत्या बाजूनें व कसा घातला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाहिजे हें त्यांना सांगितलें. हा ' हांका ' म्हणजे काय व तो कसा घालावयाचा हें या ठिकाणीं सांगितलें पाहिजे. जंगलांतील कोणत्या भागांत जनावर असावें याचा अंदाज बांधल्यावर जंगलाच्या त्या भागास दुरून चोहोंबाजूंनीं वेढा देऊन एका बाजूनें रानांतून माणसांनीं आरडाओरड करीत पुढें सरकत जनावरास हांकत हांकत विवक्षित स्थळीं शिकारी बसले असतील तेथें आणावयाचें यास ' हांका ' घालणें असें म्हणतात. जंगलाची रचना व लहान मोठा आकार या मानानें ' हांक्यास ' माणसें जास्त कमी लागतात. निरनिराळ्या जातींच्या जनावरांचे जंगलांतून इकडून तिकडे फिरण्याचे ठराविक मार्ग असतात, त्यांस ' गौंड ' असें म्हणतात. जंगलांत ' हांका ' सुरू होतांच आंतील जनावरें ' गौंडानें ' पळूं लागतात व तीं तशीं पळून जाऊं नयेत म्हणून त्या त्या ' गौंडाच्या ' शेजारीं उंचवट्याची जागा, खडक अगर उंच झाडें पाहून त्यांवर हांकेवाल्या लोकांपैकीं शहाणे लोक बसतात. ह्या लोकांना ' ठोकेवाले ' अगर 'पहारेवाले' म्हणतात. हे लोक ठेवण्याचा हेतु हा कीं, जर यदाकदाचित् जनावर मुख्य शिकाऱ्याकडे न जातां या ' गौंडा'नें पळूं लागलें तर त्या ' ठोकेवाल्यांनीं ' काठ्या आपटून किंवा टाळी वाजवून शिकारी बसले असतील तिकडच्या ' गौंडास ' लावावें.

जंगलांत उंच माळा घालण्याचा हेतु सुरक्षितता तर आहेच, परंतु त्याबरोबर आणखी कांहीं फायदे असतात. माचाणावर बसल्यानें आजूबाजूच्या ' भांग्यांची ' (जनावर दिसावें म्हणून जंगलांतील झाडें तोडून जी जागा मोकळी केलेली असते तीस ' भांग ' म्हणतात.) पाहणी करतां येऊन जनावर कोणत्या मार्गानें येईल, बार काढण्यास कोणती जागा सोयीची होईल, जनावर लांबवर दिसतांच तें कोणत्या बाजूनें जाईल वगैरे ठरवण्यास व उंचीवरून अचूक नेम मारण्यास सोयीचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असतें. पण शिकारी खालीं जमिनीवर उभा राहिला तर जनावर एकदम समोर येऊन उभें राहील, व बंदुक उचलून गोळी चालू करीपर्यंत तें आपल्या अंगावर तरी चाल करील किंवा एकदम पळून तरी जाईल.

सर्व व्यवस्था होतांच, आम्हीं माळ्यावर चढून बसलों, व हांकेवाल्यांना रुमालानें केलेली खूण दिसतांच ' हांका ' सुरू करण्यास सांगून ठेवलें. सरकारांच्या माळ्यावर सरकार स्वत:, मी व रामजी असे तिघे बसलों होतों. दुसऱ्या दोन माळ्यांवर सरकारांचे धाकटे बंधु व आणखी कांहीं मित्रमंडळी बसली होती. सरकारांनीं आपल्या हातांत ४५० नंबरची कॉर्डाईट रायफल घेतली होती व थोड्याच वेळांत रुमालाचा इशारा करतांच चोहोंबाजूंनीं कर्कश आरोळ्यांचा एकच हलकल्लोळ उठला. झालें ! ' हांका ' सुरू झाला. सरकारांनीं काडतुसें चढवून आपली रायफल सज्ज केली, तोंच माकडांचा चीत्कार, वाघाच्या डुरकाळ्या व ' ठोकेवाल्यांचे ' आवाज एकसमयावच्छेदेंकरून ऐकूं येऊं लागले. थोडक्याच वेळांत वाघाच्या डुरकाळ्या व पानांचा खसखस आवाज अगदीं नजीक ऐकूं येऊं लागला. वाघोबा एकदम माळ्याच्याच खालीं येत आहे असें दिसलें. जनावर फारच जंगी असून एकसारखें झांपा टाकीत माळ्याच्या खालून पुढें सरकलें व आतां तेथून थेट झाडींत शिरणार इतक्यांत सरकारांचा बार पेटला. पण या वेळीं वाघास गोळी न लागतां तो जंगलांतील गर्द झाडींत नाहींसाहि झाला ! त्या जंगलांत शिकार करण्यास आम्हांस १५ दिवसांची मुदत असल्यानें पहिल्याच दिवशीं निराश होण्याचें कारण नव्हतें. ताबडतोब त्याच दिवशीं संध्याकाळीं पुन्हां आणखी निरनिराळ्या ठिकाणीं पांच रेडे बांधण्यास हुकूम दिला.

त्या दिवशीं वर्दीप्रमाणें रामजीनें तीनचार मैलांच्या अंतरावर जंगलांत रेडे बांधून दुसरे दिवशीं सकाळीं दोन रेडे ' मोडल्याची ' बातमी आणली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मग काय विचारतां ? कालचा हिरमोड मावळला व या दुसऱ्या दिवशींच्या बातमीनें अंगांत द्विगुणित स्फुरण चढलें. ताबडतोब हांकेवाले जमा झाले, व आदल्या दिवशींप्रमाणें सर्व तयारी करून आम्हीं आपल्या माळ्यावर स्थानापन्न झालों. एकाच रात्रींत वाघानें दोन रेडे मारले होते त्या अर्थी जनावर चांगलेंच माजलेलें असावें असा तर्क बांधून शिकार जास्त काळजी-पूर्वक करण्याचें योजलें. सर्व तयारीहि झाली. आज हांकेवाल्या लोकांचा आंकडा २५० च्या वर चढला होता. त्यामुळें चोहोंकडे उत्साहाचें वाता-वरण उत्पन्न झालें होतें. शिवाय कालच्या फसलेल्या शिकारीच्या सूडाची भावना अंगांत मुसमुसत होती.

दुपारीं दीडचा सुमार असेल. जंगलांत सर्वत्र शांतता होती, पण जेव्हां का लोकांनीं हांका सुरू करण्याबद्दल इषारा पाहिला, त्या वेळीं सारें जंगल आवाजाच्या कल्लोळानें दुमदुमून गेलें. हांका सरकत सरकत जवळ येऊं लागला. तास अर्धा तास अशा रीतीनें गेला. मनांत विचारांचा तर गोंधळ उडून गेला. हांकेवाल्यांचे आवाज स्पष्ट व जोरांत ऐकूं येऊं लागले, तरी वाघाचा पत्ता नाहीं. पण काय चमत्कार ! एकदम ठोकेवाल्यांची टाळी कानावर आली. लागलीच कानठळी बसेल अशा जोरानें वाघानें आपल्या अस्तित्वाची हजेरी दिली. वाघ डुरकत डुरकत नजीक येत होता, पण घाबरेपणानें व पळतां धीरे धीरे ऐटबाज चालीनें चालत होता. थोडें पुढें यावें, एकदां मागें पुढें निरखून पहावें व मध्येंच एखादी डरकाळी ठोकावी व पुन्हां पुढें निघावें, अशा रीतीनें आस्ते आस्ते आमच्याच माळ्याच्या बाजूनें बरोबर भांग्यांत, अगदीं नेटांत वाघ आला व आमच्या माळ्याकडे कान टवकारून पाहूं लागला. तोंच सरकारांनीं बंदूक उचलून गोळी चालवली. ती बरोबर डोकें व मान यांच्यामध्यें बसली. गोळी इतकी वर्मीं लागली कीं, वाघाला शेवटची आरोळी फोडण्याससुद्धां वेळ न मिळतां तो एकदम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जमिनीवर माळ्याकडे पाठ करून आदळला. तरीपण सरकारांनीं पुन्हां एकामागोमाग तीन गोळ्या झाडल्या. त्या तर इतक्या अचूक व बरोबर कीं, त्या चार चार बोटें अंतर सोडून एका खालीं एक मानेंत घुसल्या. माझी तर अशी कल्पना आहे कीं, शेवटच्या तिन्ही गोळ्या अगदीं मुडद्यावरच मारल्या गेल्या. ताबडतोड वाघ मारल्याची खूण म्हणून माळ्यावरून बिगुल वाजला. हांकेवाल्या लोकांना व आम्हांस त्या वेळीं जो आनंद झाला तो शब्दानें सांगणें अशक्य आहे.

अशा तऱ्हेनें पहिली शिकार यशस्वी झाल्यावर चारपांच दिवस मोरे आनंदांत गेले. रेडे बांधण्याचें काम चालूच होतें, पण अजून वाघाची वर्दी कांहीं कोठें लागेना. आतां पुढें काय करावें या विवंचनेंत असतां एक दिवस कांहीं गरीब शेतकरी लोक आमच्या तळावर आले, व एका उन्मत्त वाघिणीनें त्यांच्या उदरनिर्वाहाचें केवळ साधन जी म्हैस तिची कत्तल केली असल्याचें सांगूं लागले. त्या वाघिणीनें याशिवाय त्या खेड्यांतील बरींच जनावरें मारलीं असून लोक हवालदील झाल्याचें कळलें. अर्थात् ही बातमी ऐकतांच त्याच रात्रीं तिकडच्या जंगलांत रेडा बांधून काय वर्दी मिळते तें पाहण्यास रामजीस हुकूम झाला. तें ठिकाण तळापासून ८।१० मैल दूर असल्यानें रेडा मारलेली बातमी समजण्यास दुपार झाली. ताबडतोब जंगलांत मोटारी रवाना झाल्या. आम्हीं दुपारीं दोनच्या सुमारास ऐन जंगलांत आलों. तेथून अद्याप तीन मैल आंत झाडींत जावयाचें होतें. जंगल दाट असल्यानें आंत मोटारी नेतां येईनात अर्थात् पायीं जाणें हाच त्यांतून उपाय होता.

आजचें जंगल अत्यंत गर्द असून झाडी फार दाट होती. हांकेवाल्या मंडळीचा आंकडा तर आज जवळ जवळ ३५० पर्यंत चढला होता. सर्वांना कसून काम करण्याबद्दल इषारा दिला होता. जंगलांतून बरेंच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चालत जावें लागल्यामुळें आम्हीं किंचित् थकलों होतों, म्हणून थोडी विश्रांति घेऊन नंतर माळ्याकडे निघालों. वेळ फार थोडा असल्यानें माळे बांधण्यास फार घाई झाली व त्यामुळें ते कसेतरी बांधले गेले. आम्हीं माळ्याजवळ येऊन पाहातों तों आज माळे अगदीं खालीं,—म्हणजे १०–१२ फूट उंचीवरच त्या हांकेवाल्या लोकांनीं बांधले होते. वास्तविक ही एक अक्षम्य चूक झाली होती; पण आतां ते सोडून पुन्हां वर बांधण्यास सवड नव्हती म्हणून त्यावरच बसण्याचें ठरविलें.

सर्व तयारी यथास्थित होतांच साडेतीनच्या सुमारास सर्वजण माळ्यावर चढलों व हांकेवाल्यास हांका चालू करण्यास इषारा दिला. 'हांका' सुरू झाला, पण आज माळा फारच खालीं असल्यानें मनांत धाकधुकी वाटत होती. वेळहि बराच झाला होता. 'हांका' सुरू झाला तोंच माकडांचा किलबिलाट सुरू झाला. (माकडें ओरडणें ही एक जंगलांत वाघ निघाल्याची खूण आहे.) तोंच वाघिणीचा आवाज कानीं आला. वाघीण अद्याप दूर आहे असें तिच्या पहिल्या डुरकण्यावरून वाटलें; पण आश्चर्याची गोष्ट ही कीं जणूं काय तिच्या मागें कोणी लागलें आहे, अशा जलदीनें ती पळत होती. आपण एखाद्या घाई करणारास म्हणतों कीं 'पाठीमागें कांहीं वाघ लागला आहे काय?' पण आतां या वाघिणीस कोणती म्हण लावायची? वाघीण ओरडत डुरकत जी पुढें आली ती माळ्यापासून लगतच एक पाण्याची ओघळ गेली होती तेथून जाऊं लागली. वाघीण उभी रहात नाहीं असें दिसतांच सरकारांच्या बंदुकींतून जी गोळी सुटली, ती वाघिणीच्या पुढच्या पायाच्या फऱ्यांत शिरून छातीचा थोडा भाग चाटून बाहेर पडली. त्याबरोबर वाघीण जवळच्याच एका झुडपाआड भयंकर किंकाळ्या फोडीत व लोळत पडली. तें पाहतांच रामजी माळ्यावरून ओरडला, 'सरकार, वाघीण पडली!'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एवढेच शब्द त्या जखमी जनावरानें ऐकले मात्र, लगेच तिनें ज्या बाजूनें आवाज आला त्या आवाजाच्या धोरणावर उडी घेतली.

पण सुदैवानें चुकून माळा बांधलेल्या ढापीवर ती उडी पडली व तेथें तुटून वाघीण थेट माळ्याखालीं पडली व तशाच स्थितींत ती जवळच्या झुडपांत दिसेनाशी झाली. कधीं होऊं नये तें आज झालें! वाघावर मारलेला नेम एकवार अजिबात चुकावा तरी, नाहींपेक्षां एका गोळींत त्याला गार तरी करावा. पण एकदां जखमी झालेलें जनावर चवताळून अतिशय बेफाम होतें व जें दिसेल त्याच्यावर चाल करतें. अशा स्थितींत हांकेवाल्यांतील लोक जायबंदी होण्याचा संभव जास्त असतो. येथेंहि असेंच झालें. ती वाघीण जी एकदम आमच्यापासून निसटली ती दुसऱ्या माळ्याच्या दिशेस वळली. ती बराच वेळ कोणासहि दिसेना. मात्र तिचें भेसूर किंकाळणें व आरडाओरड ऐकूं येत होती. म्हणून आम्हीं ओरडून सांगितलें कीं वाघीण जखमी झाली आहे, अद्याप खालीं उतरूं नका, पूर्ण सावध रहा!!

वाघीण तर जखमी झालेली, माळा खालीं घातला गेलेला, म्हणून आम्ही सर्वजण झाडावर चढलों. वेळ आणीबाणीची. जिवास धोका होण्याचा संभव दिसतांच रामजी एकदम माळ्यावरून हातांत १२ नं. ची बंदूक घेऊन खालीं उतरला, व वाघिणीवर चाल करण्यास निघाला. हें सरकारांनीं पाहतांच 'रामजी, असें भलतेंच धाडस करूं नको. जलदी कर, एकदम माळ्यावर ये. पुढें एक पाऊल टाकशील तर या मालकाची तुला शपथ आहे!' असें ते उद्गारले. नाइलाजास्तव त्याला माघार घ्यावी लागली. इतक्यांत ज्या माळ्यावर सरकारांचे बंधु होते, तिकडे कांहीं बार झाल्याचे ऐकूं आले. त्याबरोबर सरकार झाडावरून माळ्यावर उतरले व त्यांनीं कांहीं वायबार काढून आरडाओरड केली. त्यासरशीं वाघीण जी पुन्हां चवताळून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आमच्याकडे फिरली ती एका कलत्या झाडावर दोन पुरुष उंच चढली व त्या झाडावर जो कांहींसा पांढऱ्या रंगाचा खुंट साधारणपणें माणसा-सारखा दिसत होता, त्यावर पंजे मारून तिनें दांतांनीं कडकडून चावा घेतला. या वेळीं ती झाडांच्या फांद्यांतून आम्हांस स्पष्ट दिसत होती. ताबडतोब सरकारनीं तेथून जी गोळी खुबीनें सोडली ती तिच्या छातींत शिरून पोटांतून बाहेर पडली. त्याबरोबर वाघीण झाडावरून खालीं आदळली. आतां ती जरी अगदीं घायाळ व जायबंद झाली होती, तरी तिच्या किंकाळ्या ऐकूं येतच होत्या. पहिली गोळी लागल्यापासून जवळ जवळ ती दोन तासानें मेली.

बिगुल वाजतांच सर्व मंडळी एकत्र जमली व सर्वांनीं मोठ्यानें जयघोष केला.

अभ्यास

१. 'घातवार', 'हवालदील', 'जायबंद', यांचे अर्थ स्पष्ट करा व त्यांचा उपयोग करून एक एक वाक्य तयार करा.

२. 'पाठीमागें वाघ लागणें' या वाक्संप्रदायाचें स्पष्टीकरण करा.

३. हांका, माळा, भांग, गौंड, यांचीं लिंगें लक्ष्यांत घेऊन त्यांच्या अनेक वचनांचीं रूपें द्या व त्यांचा उपयोग वाक्यांत करून दाखवा.

पुरवणीवाचन

१. 'रत्नाकर' मासिकांत प्रसिद्ध झालेले कर्नल शिंदे यांचे 'माझा पहिला डुक्कर' वगैरे शिकारविषयक लेख व बडोद्यांतील एक लेखक विष्णु गोविंद चिपळूणकर यांचें 'मृगयाकुतूहल' व श्रीमंत संपतराव गायकवाड यांचें 'आफ्रिकेंतील शिकार' हीं पुस्तकें वाचा.

२. हरि नारायण आपटेकृत 'सूर्योदय' कादंबरीचें पहिलें प्रकरण वाचा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३

उपदेशात्मक निबंध.

६. विद्वान् कोणास म्हणावें ?

‘ लोकहितवादी ’

पेशवाईच्या अखेरीस महाराष्ट्रांतील समाजाची घडी विस्कळीत झाली होती. सरदार दरकदार मंडळी विलासी व आळशी, भटभिक्षुक अज्ञानी व ऐदी अशी स्थिति होती. थोडेंसें इंग्रजी अगर संस्कृत पढलेल्यांना आपण विद्वान् झालों असें वाटे. या कालांत ‘ लोकहितवादी ’ (जन्म १८२३–मृत्यु १८९२) उदयास आले. यांचें खरें नांव गोपाळ हरि देशमुख असून हे सरदार घराण्यांतले होते. सरकारी कचेरींतील भाषांतरकाराच्या जागेपासून ते न्यायाधिशाच्या जागेपर्यंत चढले. त्यांना स्वसमाजांतील अज्ञान, आळस, विलासी वृत्ति व घातुक चाली पाहून फार दुःख होई व त्यांचें उच्चाटन करण्याकरितां त्यांचें अंतःकरण तळमळे. यासाठीं त्यांनीं वेळोवेळीं वर्तमानपत्रांत अनेक लेख लिहिले. त्यांपैकीं शंभर पत्रें त्यांनीं पुढें ‘ शतपत्री ’ या नांवानें पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलीं. यांतील एक पत्र येथें घेतलें आहे. त्यांच्या भाषेची गंमत पहा. किती ओबडधोबड व इंग्रजी धर्तीची आहे ! लेख वाचतांना आपल्याला क्षणोक्षणीं असें वाटतें कीं, जणूं काय ‘लोकहितवादी’ आधीं मनांत इंग्रजी वाक्य किंवा वाक्संप्रदाय तयार करितात व मग त्याला कष्टानें मराठी रूप देतात. परंतु लेखांत त्यांची कळकळ व सडेतोडपणाची वृत्ति कशी दिसते ती पाहा.

आम्हांस असें वाटतें कीं जांचीं मनें फार विस्तीर्ण झालीं आहेत; जांचे मनांत अनेक कल्पनांचा संग्रह झाला आहे, जांचे मनास संस्कार होऊन सर्व विषयांची थोडी फार माहिती झाली आहे त्यांसच विद्वान म्हणावें. हा नियम सर्वांस सारखा लागेल. तो असा कीं केवळ इंग्रजी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शाळेंत जाऊन नक्कल करण्यास शिकला तर तो विद्वान् नव्हे, तर इंग्लिश भाषेंत ग्रंथ काय आहेत, त्यांतील मुख्य मुख्य ग्रंथांची जांस ओळख झाली, त्यांतील कल्पना जांस ठाऊक ते इंग्रजींतील विद्वान् म्हणावे. तसेंच संस्कृत ग्रंथ किती, त्यांचा मुळापासून ओघ कसा आला आहे, त्यांत विद्वान् लोक कोण कोण झाले, ग्रंथकार ऋषी कोण कोण झाले व त्या ग्रंथांत आहे काय याचा सारांश, इतकें जांस ठाऊक असेल ते संस्कृतांतील विद्वान म्हणावे. या दृष्टीनें पाहिलें म्हणजे घोकणारे भट व लिहिणारे कारकून यांस कोठें स्थळ राहात नाहीं. सामान्यतः फक्त लिहिणें-वाचणें ही विद्या मुळींच नव्हे. हें केवळ कसब आहे. याची गणना कलेंत आहे. विद्येंत हें मुळींच येत नाहीं. विद्या म्हणजे जेणेंकरून मन मोठें होतें; वाईट गुण जातात; शांति, निर्लोभ, साधुता, इत्यादि गुण प्राप्त होतात; बारीक-सारीक द्वेष, दुर्बुद्धी, लोभ व क्रोध हे जातात, जगाचा विस्तीर्ण व्यवहार व कारभार जांस समजतो, तेच विद्वानांत गणले पाहिजेत. याखेरीज बाकी सर्व लहान मुलें किंवा अडाणी धनगर याचप्रमाणें समजावयाचे; मग ते राजे असोत, अथवा सरदार असोत, अथवा सावकार असोत; तरी ते मनानें लहान मुलांसारखेच समजावे. त्यांची वर्तणूकहि बहुतकरून मुलांसारखीच असते. परंतु त्यांत इतका फरक असतो कीं, मुलें अज्ञान त्यांस कल्पना थोड्या व सामर्थ्यहि थोडें, याजमुळें फारशीं उपद्रवास कारण होत नाहींत; परंतु मोठीं माणसें अज्ञान असलीं म्हणजे तीं उपद्रवीक होतात. कारण कीं तीं जरी अज्ञान असलीं तरी त्यांचे मनास अन्य कारणानें, म्हणजे अधिकार, वंश व द्रव्य इत्यादि योगानें अभिमान होऊन आपण मूर्ख आहों असें न वाटतां आम्हीं शहाणे हा गर्व त्यांस असतो. याजमुळें त्यांपासून इतरांस उपद्रव होतो. याजकरितां देशांत जितके अधिक विद्वान् होतील तितके पाहिजे आहेत. त्यांचें गंभीर व थोरपणाचें उदाहरण दुसरे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकांस लागतें आणि परस्परांचे सहवासानें विद्यावृद्धि होते. विद्या म्हणजे अनेक विषयांची माहिती असणें, व्यवहारांतील बहुतेक गोष्टी ठाऊक असणें, भाषणाचें व लेखनाचें चातुर्य असणें, हे गुण फार उपयोगी आहेत. आणि जांचें मन मोठें होईल, त्यांचे ठिकाणीं हे गुण सहज येतील. मन ही पोकळ पिशवी आहे. तींत जितकें जितकें भरावें तितकी तितकी ती अधिक होत जाते. आणि जन्मपर्यंत भरीत गेलें तरी ती पूर्ण होत नाहीं. हा एक ईश्वरी चमत्कार आहे. याजकरितां साधारण इंग्रजी शिकलेले किंवा साधारण संस्कृत शिकलेले या उभयतांसहि आम्ही विद्वान् म्हणत नाहीं. जांचें मन फार कल्पनांनीं भरलें असेल त्यांस मात्र विद्वान् म्हणूं. जसें शरीर मेहनतीनें वाढवून बलाढ्य होतें आणि रोडक्याचा पैलवान होतो, तसेंच मनास कमावून मोठें करितां येतें. राज्यदरबारांत जाणें, विद्वानांचे संगतीस बसणें, अनेक ग्रंथांचें अवलोकन करणें हे मनाचे तालीमखाने आहेत; शरीरास जसें अन्न पोसतें, तसें मनास ज्ञान पोसतें. आणि जरी आपल्यास फुरसत थोडी असली तरी जाला नवीन कल्पना मिळविण्याचा छंद आहे, तो अधिक संग्रह केल्यावांचून राहाणार नाहीं. आणि असे मनुष्यास विद्वान् म्हणणें योग्य आहे. आतां हल्लीं जे थोडे ज्ञानांत आपणांस विद्वान् म्हणविणारे आहेत, त्यांनीं असें मनांत आणावें कीं आपल्यास ठाऊक नाहींत अशीं पुस्तकें अद्याप किती आहेत; आपणास मिळाल्या नाहींत अशा कल्पना अद्याप किती आहेत; आपल्यास ठाऊक नाहींत असे व्यवहार जगांत किती आहेत? त्यापेक्षां आपण जें जाणतों हें अगदीं अल्प आहे ही गोष्ट ते स्मरतील तर त्यांचा लहानपणा त्यांसच दिसून येईल. आम्हांस असें वाटतें कीं सांप्रतकाळीं वर्तमानपत्राइतकें ज्ञान होण्याचें दुसरें मोठें साधन नाहीं. तें वाचून त्यांतील विषय कितीकांस समजतात, हें जाचें त्यांनीं पाहिलें तर विद्वान् कोण, अविद्वान् कोण हें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समजेल. वाचणें हें समजणें नव्हे. समजणें म्हणजे असें आहे कीं अमेरिकेचें नांव आलें तर अमेरिका कोठें आहे ? त्यांत लोक कोण ? धर्म काय ? राज्य काय ? इतकी माहिती असेल तर त्या खंडांतील गोष्ट समजूं शकेल. तसेंच युरोप म्हणजे काय ? तेथें देश किती आहेत ? लोक कोणे प्रकारचे आहेत ? तर युरोपांतील वर्तमान ध्यानांत येईल. जगाची माहिती असल्यावांचून वर्तमानपत्र वाचण्याची व समजण्याची योग्यता येत नाहीं. कितीएक तर सरकारी नेमणुका पाहातात आणि खालीं ठेवितात. बाकीचे विषय त्यांस व्यक्त नसतात, व त्यांविषयीं त्यांस माहिती नसते, म्हणून रुचीहि नसते. तर असे लोकांस कोण विद्वान् म्हणेल ?

अभ्यास

१. लेख लिहितांना मुख्य मुख्य मुद्यांना एक एक स्वतंत्र परिच्छेद द्यावयाचा असतो; असे परिच्छेद यांत पाडलेले नाहींत. तुम्ही यांतील एकेक मुद्दा शोधून काढून, त्याप्रमाणें या लेखाचे परिच्छेद पाडा.

२. 'वाचणें हें कसब आहे,' 'वाचणें हें समजणें नव्हे,' या वाक्यांचें स्पष्टीकरण करा.

३. 'वाचणें हें कसब आहे,' 'वाचणें हें समजणें नव्हे, हीं निव्वळ इंग्रजी वळणाच्या मराठीचीं उदाहरणें आहेत. अशीं कांहीं दुसरीं उदाहरणें लेखांतून शोधून काढा व त्यांना खऱ्याखुऱ्या मराठीचा पेहेराव चढवा.

४. नागमोडी खूण केलेलें वाक्य भर्तृहरीच्या एका सुभाषितांत आहे त्याचें कविवामन पंडित यानें केलेलें भाषांतर वाचा.

स्वाध्याय

१. वाचनालयांचें महत्त्व, साक्षरता, बहुश्रुतपणा यांपैकीं कोणत्या तरी एका विषयावर २० ओळींचा निबंध लिहा.

पुरवणीवाचन

कृ. ना. आठल्येकृत किंवा प्रो. ग. ह. केळकरकृत 'लोकहितवादी' यांचें चरित्र.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. द्रव्य देणारी विद्या शिका !

म. शि. गोळे

केवळ पुस्तकी विद्येनें समाजाची किंवा देशाची उन्नति होणें तर दूरच राहिलें, परंतु पोटाचीहि विवंचना सुटणार नाहीं; तिला एकाद्या धंद्याच्या विद्येची जोड पाहिजे. ही विद्या, स्वतःला आवडेल त्या त्या धंद्याच्या क्षेत्रांतील असावी. ती शिकतांना आपल्या कुळाचा किंवा जातीचा खोटा अभिमान आड आणूं नये; त्यांत लाज मानण्यासारखें कांहीं नाहीं, असा स्पष्ट उपदेश गोळे यांनीं यांत केला आहे. गोळे (जन्म १८५८—मृत्यु १९०७) पुणें येथील फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपॉल होते. यांचें निरीक्षण अतिशय सूक्ष्म असे व ते प्रत्येक गोष्टीचा शास्त्रीय दृष्टीनें विचार करीत. ‘हिंदुधर्म आणि सुधारणा’, ‘ब्राह्मण व त्यांची विद्या’ हीं त्यांचीं दोन पुस्तकें सुप्रसिद्ध आहेत. त्यांची भाषा सहजमनोहर व सुसंस्कृत आहे.

म. शि. गोळे

सर्व हिंदुलोकांमध्यें एक विलक्षण दोष दिसून येतो तो हा कीं, कोणत्याहि कामांत फेरबदल झालेला त्यांच्या स्वभावास आवडत नाहीं. जें जसें आहे तें थेट तसेंच चालावें असा त्यांचा निग्रह दिसून येतो. आहे त्यांत समाधान मानायाचें असा आमचा मनोधर्मच होऊन बसला आहे. ही स्थिति दोषरूप आहे व ती घालविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. व ती कुटुंबांतील शिक्षणानें जितक्या लवकर जाईल तितकी बाहेरील शिक्षणानें जाणार नाहीं. कुटुंबांतील आचारविचारांत एवढी एक सुधारणा झाल्यास केवढें हित होणार आहे !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जेव्हां आपण एखाद्या झाडाचें बीं लावितों, तेव्हां त्यापासून कसें झाड उत्पन्न होईल, तें किती उंच वाढेल, त्याचीं पानें कशीं असतील, फुलें व फळें कशीं असतील हें सर्व आधीं सांगतां येतें. त्याप्रमाणें अमुक कुळांत उत्पन्न झालेला मनुष्य कसा वाढविला जाईल, तो कोणता उद्योग करील, तो कोठें राहण्याचा प्रयत्न करील, आपलें आयुष्य कसें घालवील, या सर्व गोष्टींविषयीं व आणखीहि पुष्कळ दुसऱ्या गोष्टींविषयीं या आमच्या समाजांत मनुष्याच्या भावी वृत्ताचें भविष्यकथन करितां येईल. हें भविष्य कांहीं थोड्या बाबतींत खरें न ठरल्यास एकच कारण असायाचें व तें हेंच कीं कांहीं अनिवार्य कारणांनीं त्या मनुष्यास आपले स्वाभाविक उद्देश सिद्धीस नेतां न येणें व त्यामुळें तो पूर्वीं आंखलेल्या मार्गापासून थोडासा ढळणें. युरोपांतील सुधारलेल्या राष्ट्रांत कोणाहि व्यक्तीच्या भावी वृत्ताचें असें भविष्यकथन करितां येणार नाहीं. आपल्या येथें तें करितां येण्याचें कारण हेंच कीं, कुटुंबांतील शिक्षणानें व कुटुंबसंबंधी बंधनांनीं मनुष्य लहानपणापासून अगदीं जखडून जातो. आपल्या रीतीभातींत, आचार-विचारांत, पोषाखांत व उद्योगधंद्यांत इंग्रजी राज्यामुळें जे अल्पस्वल्प फेर-फार झाले आहेत ते केवळ आपल्या निरुपायास्तव झालेले आहेत.

कोणास वाटेल कीं हिंदुलोकांस जातिभेदामुळें ही स्थिति प्राप्त झाली आहे; परंतु जातिभेद कायम राहूनहि आचारविचारांत, अभिरुचींत व उद्योगधंद्यांत पुष्कळ वैचित्र्य येण्याजोगें आहे. एवढेंच कीं आपणास योग्य दिसेल तेवढा फेरबदल करण्याचें आपणांस धैर्य व उत्साह असला पाहिजे व आपण आपल्या स्वभावास जडलेला आळस व समाधानवृत्ति एकीकडे ठेविली पाहिजे. या प्रकारच्या वैचित्र्याच्या अभावानें देशाचें किती नुकसान होत आहे याची कोणास कल्पना आहे काय?

इंग्रजी अमलाखालीं ब्राह्मणादि वरिष्ठ जातींनीं केवळ लिहिण्यावाचण्याचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धंदे स्वीकारिले आहेत. वकील, डॉक्टर, एंजिनियर, शाळामास्तर, सरकारी व खासगी कारकून, या इतक्या धंद्यांवांचून जणूं काय ब्राह्मणांस दुसरा महत्त्वाकांक्षा उत्पन्न करण्याजोगा धंदाच नाहीं. सर्वांची या एवढ्या धंद्यांकडे ओढ दिसते. आतां हे धंदे वाईट असें म्हणणें नाहीं; परंतु ते भरपूर भरले तरी त्यांतच घुसणारांचा रेटा वाढतच चालला आहे. त्यायोगें कितीक कुटुंबें दारिद्र्यानें गांजलीं गेलीं आहेत, कितीकांस उद्यांचा दिवस कसा निभावणार अशी सतत चिंता जाळीत आहे, कितीकांस उदरभरणाकरितां अपमान, तिरस्कार, किंबहुना याहून नीच प्रकार प्रत्यहीं निमूटपणें सोसून दिवस काढावे लागत आहेत ! आपल्या वडलांस व पुढें आपणां स्वतःस जगांत कसे दिवस काढावयाचे आहेत याविषयीं वरिष्ठ जातीच्या बहुतेक तरुण मंडळीस जें हें व्यवहारांत शिक्षण मिळत आहे व त्यामुळें त्यांच्या नैसर्गिक थोर मनोवृत्तींची जी अनिवार्यपणें हानि होत आहे, ती कोणत्याहि उदात्त विद्याव्यासंगानें किंवा स्वच्छ कपड्यालत्त्यांनीं भरून येणार आहे काय ? या नियमित धंद्यांच्या मागें लागून केवळ बाह्यात्कारी निर्मळता जोडली जात आहे खरी, परंतु बुद्धि विफळ होत आहे व अंतःकरणें निरंतरचीं करपून जात आहेत. ज्या एका ज्ञातीस इंग्रजी विद्येची प्राप्ति झाली आहे व जिचे विचार कांहीं थोडे प्रगल्भ होऊं लागले आहेत तिचीच याप्रमाणें अवस्था होणें, ही गोष्ट किती शोचनीय होय ! हा परिणाम वर सांगितलेल्या आपल्या मोठ्या दोषाचा होय.

ज्या लोकांस कोणत्याहि एका धंद्यास लागण्यापूर्वीं विद्यार्जन करण्याची संधी सांपडते, त्यांची बुद्धि व त्यांचे परिश्रम हीं राष्ट्राचें एक प्रकारचें भांडवलच अशीं समजलीं पाहिजेत. हें भांडवल राष्ट्रांस अनंत प्रकारांनीं कामीं यावें; परंतु या भांडवलाचा आमच्या देशांत दुरुपयोग होत असल्यामुळें आपल्या राष्ट्राचा त्यापासून तोटाच होण्याची भीति उत्पन्न होत आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उदरभरणाचा कांहीं दुसरा मार्ग न सुचून कित्येक वरिष्ठ वर्गांतील लोकांस पूर्वीं सांगितलेल्या धंद्यांहून निराळ्या धंद्यांत पडावें लागलें आहे. कोणी फिटर, मिस्त्रि, सुतार बनले आहेत, कोणी हस्तिदंताच्या फण्या वगैरे करीत आहेत, कोणी मातीचीं चित्रें बनवीत आहेत, कोणी चितान्याचें काम करीत आहेत, कोणी शिंप्याचें, क्वचित् शिकलगाराचें, कातान्याचें, शेतकऱ्याचें वगैरे कामें पत्करिलीं आहेत. परंतु या धंद्यांत अत्युत्तम काम करण्यामध्यें फारच थोड्यांच्या हातून परिश्रम घडत आहेत. कारण, हें आपलें कर्म नव्हे ही बुद्धि त्यांस सोडीत नाहीं, व त्यांचें खरें प्रेम त्या धंद्यांत नाहीं. त्यांचीं मुलें विद्याभ्यास करून तयार होतांच लिहिण्यावाचण्याच्या नौकरीच्या मागें लागतात; व वडिलांनीं केलेल्या पातकाचें जणूंकाय क्षालन करूं पाहतात. कोणी सतारी करणारानें आपल्या मुलांस आपली कला शिकविली आहे असें बहुधा घडत नाहीं. त्यामुळें, उत्तरोत्तर उत्तम सतारी करण्याचें, कारखाना वाढवून बाजाच्या पेट्या वगैरे करण्याचें, व देशी वाद्यांत सुधारणा करण्याचें काम एकीकडेच राहतें; व बापाच्या मागें मुलास असें होतें कीं, त्यानें मोठ्या परिश्रमानें मिळविलेल्या या इतक्या भोपळ्यांचें आतां काय करावें! हीच गोष्ट ब्राह्मणांनीं स्वीकारलेल्या सर्व धंद्यांस लागू आहे. जे लोक डाक्तर किंवा एंजिनीयर आहेत ते देखील आपल्या मुलांस वकील किंवा मुन्सफ करूं पाहतील; परंतु रसायनक्रियेंत किंवा यंत्रशास्त्रांत त्यानें प्रावीण्य मिळवावें असें त्यांच्या मनांत येणार नाहीं. रसायनादि शास्त्रांत किंवा यंत्रकलेंत नवीन शोध किंवा नवीन क्लृप्ति काढणारा आपणांमध्यें निपजणें लांबच राहिलें, परंतु सुधारलेल्या राष्ट्रांस प्राप्त झालेल्या विद्येचें किंवा कलांचें ज्ञान संपादन करणारा व त्यांचा एतद्देशीय कारागिरांस व कारखानदारांस उपयोग दाखविणारा असा मनुष्य देखील इतक्या कोट्यवधि लोकांत क्वचितच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सांपडतो. या शोचनीय स्थितीचें कारण पूर्वीं सांगितलेला आपला दोष होय.

विशेष चमत्कार हा कीं, ज्यांचे विचार फार स्वतंत्र व फारच प्रगल्भ असें पाहून आपण चकित होतों, त्यांच्याहि वर्तनांत कांहीं विशेष वैचित्र्य दिसत नाहीं किंवा त्यांच्या कुटुंबांतील शिक्षणहि फारसें सुधारलेलें आढळत नाहीं. ज्यानें अनेक भव्य इमारती बांधल्या आहेत अशा एंजिनियरानें स्वतःकरितां बांधलेलें घर जुन्या तऱ्हेचेंच आहे असें दृष्टीस पडतें. डाक्तरांच्या मुलांमध्येंहि विद्येच्या किंवा व्यसनाच्या अतिपरिशीलनानें होणारे शारीरिक दोष दिसतात. हिमालयाच्या थंड प्रदेशांतहि विजार घालावयास न धजणारे व अपरिचित उपचारांस भिऊन काकडणारे, परंतु असें असतांहि आपणांस मोठे साहसी म्हणविणारे, कित्येक लोक आहेत. या प्रकारचीं उदाहरणें घरोघर सांपडतील व त्यावरून बाह्यात्कारीं दिसणारें विचारस्वातंत्र्य पुष्कळ वेळां केवळ एकदेशीय असतें असें तुमच्या लक्ष्यांत येईल.

याप्रमाणें आपली शुद्ध गतानुगतिकता व समाधानवृत्ति आपल्या मानसिक व सांपत्तिक ऱ्हासास कशी कारणीभूत होत आहे व आपल्या राष्ट्रासहि ती कशी अहितकारी आहे हें ब्राह्मणादि वरिष्ठ वर्गाचें उदाहरण घेऊन दाखविलें. आतां कदाचित् तुम्ही असा प्रश्न कराल कीं, या दोषासंबंधानें ब्राह्मणांचेंच उदाहरण कां घेतलें ? हा दोष ब्राह्मणांपेक्षां इतर जातींत अधिक प्रबळ नाहीं काय ? या प्रश्नाचें उत्तर असें कीं, ब्राह्मण लोकच आज विशेषतः विद्यार्जनाच्या मागें लागलेले आहेत व त्यांसच हा दोष तूर्त विशेष बाधक होत आहे.

थोर मनाच्या पुरुषांस अपमानापेक्षां मृत्यु बरा असें वाटतें, ही म्हण तुम्हीं पुष्कळांच्या तोंडून ऐकिली असेल. आतां तुम्हीं असें सांगा कीं,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोठ्या प्रयासानें अल्पवेतनाची जागा मिळविणें, अपमानाचे व धिक्काराचे अपशब्द निमुटपणें गिळून प्रसन्नमुख दाखविणें, व वस्तुतः अल्पप्राप्ती-करितां प्रत्यक्ष दास्य स्वीकारणें हें बरें, कीं तेलानें हात व कपडे मळणें, आचीनें तोंड काळें पडणें, किंवा घणाचे शंभर घाव मारणें हें बरें? या दुसऱ्या प्रकारांत केवळ शारीरिक कष्ट व अमंगलता पतकरावी लागते, परंतु आपला कारखाना मोठा होईल अशी आशा असते, आपली प्राप्ती आपल्या निढळाच्या घामाची आहे याविषयीं मनांत उत्साह वागतो, व आपण कोणाचे बंदे नौकर नाहीं याविषयीं गर्व मानण्यासहि जागा असते. परंतु पहिला प्रकार याहून अगदीं विपरीत होय. पाहा कीं, आईबापांनीं काळजीनें व ममतेनें वाढविल्यानंतर, शिक्षकांनीं उद्योग, परिश्रम व स्वातंत्र्य यांची महती गाईल्यानंतर, व स्वतः आपण अमुक गोष्टी करणार, अमुक तऱ्हेनें वागणार वगैरे पाहिजे तसे बेत केल्यानंतर, जेव्हां विद्येचें व विचारांचें चीज करण्याची वेळ येते, तेव्हां कुटुंबपोषणाचा स्वतंत्र मार्ग कोठेंच न दिसणें, जो धंदा पाहावा त्यास आपण अपात्र अशी खात्री होऊन धीर सुटूं लागणें, व हळूहळू मनाचा सर्व ताठा मोडून कोठें अर्ज करावा, कोणापुढें तोंड वेंगाडावें अशा विवंचनेंत रात्रंदिवस घालविणें व पुढें वर सांगितल्या प्रकाराची नौकरी मिळेपर्यंत धांवपळ व निराशा यांची परंपरा अनुभवीत राहणें—हें आपल्या गतानुगतिकतेचें परम सार्थक होय !

परंतु हा सर्व प्रकार शेंकडा पन्नास किंवा पाउणशें घरीं होत असतां कोणी सावध होत नाहीं हें कसें? आतां सांगितलेला प्रसंग जेव्हां कोणा-वर येतो, तेव्हां प्रत्येकजण उद्विग्न होऊन मनांत म्हणत असतो कीं, " मातापितरांनीं यापेक्षां निव्वळ हमालीचा धंदा शिकविला असता तर बरें होतें." परंतु आपल्या मुलांस शिक्षण देण्याची वेळ येईपर्यंत तें सर्व विसरून जातें, विचार कोते बनतात, व्यवहारज्ञानानें डोळे उघडून दास्याचेहि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुणच दिसूं लागतात, बाह्यात्कारी कितीहि थोर उद्गार काढले, तथापि मन इतकें अवनत स्थितीस येऊन पोहोंचलें असतें कीं, " पोटाकरितां हें केलें म्हणून काय झालें ? तें केलें म्हणून काय झालें ?" वगैरे विचारांचेंच प्राबल्य होतें. या प्रकारें अंतःकरणाचा व तसाच विचारांचा, बाहेर एक आंत एक, असा द्वैधीभाव कितीहि झांकला तथापि तो सार्वजनिक कामांत, सुधारणेच्या कामांत, धैर्याच्या निग्रहाच्या कामांत, वारंवार अनिवार्यपणें प्रकट होतो; व वरिष्ठ वर्गावर खडतर टीकाहि होते. ही स्थिति कशानें आली बरें ?

विद्यासंपादनापासून द्रव्यप्राप्ति दिवसानुदिवस कमी होत आहेत, म्हणून या प्रकारचा तुम्हांस उपदेश करितों असें मात्र समजूं नका. निर्धनतेमुळें पुष्कळ वेळां थोर हेतू मनांतल्या मनांतच राहतात, हा निर्धनतेचा दोष आहे खरा, परंतु निर्धनता आली म्हणून कोणीहि दोषास पात्र होत नाहीं; उलट गरीब स्थितींतच कित्येक मानवी गुणांचा पूर्ण विकास होतो. तुम्हांस शाळेंत असतां तेथें जी विद्याप्राप्ति होते ती अल्पच गणिली पाहिजे, व तितकी विद्या प्रत्येकास असणें माझ्या मतें हल्लींच्या काळांत अवश्यच आहे. परंतु हा शाळेंतील विद्याभ्यासाचा काळ गेला व कुटुंबभार अंगावर पडण्याचा वेळ समीप आला म्हणजे 'पुढें काय ?' हा प्रश्न जेव्हां डोळ्यांपुढें उभा राहील, तेव्हांच्या तुमच्या स्थितीस उद्देशून हा उपदेश आहे. स्वपराक्रमानें किंवा पालकांच्या मदतीनें आपली विद्या परिपूर्ण करून मोठ्या हुद्याच्या जागा मिळविणें, वकील, डाक्तर, एंजिनीयर होणें, या गोष्टी तुम्हांपैकीं कांहीं थोड्यांस मात्र शक्य आहेत; परंतु बाकीच्यांस आपली पुढची वाट अन्य रीतीनेंच पाहिली पाहिजे. गरीब स्थितींत असतां, केवळ भिक्षा मागून जे तरुण ब्राह्मण विद्यार्थी विद्यार्जन करीत आहेत, त्यांविषयीं सर्व समंजस लोकांस अनुकंपा वाटते हें ठीकच आहे. जर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्रह्मचारी राहून पूर्वींच्या ऋषींप्रमाणें विद्यानंदांतच निश्चिंतपणें काळ घालवायाचा त्यांचा निश्चय असता, तर त्यांचें वर्तन अत्यंत प्रशंसनीय गणिलें जातें. परंतु वस्तुस्थिति अशी असते कीं, विद्यासंपादनाच्या घाईनें शरीरास अकालीं क्षीणता आली आहे व चिंताज्वरानें मानसिक शक्तींच्या ऱ्हासास आरंभ होत आहे, अशा स्थितींत सर्व कुटुंबभार डोक्यावर घेऊन "नौकरी, नौकरी!" करीत त्यांस हिंडावें लागतें. या प्रयत्नांत त्यांच्या मनाच्या थोरवीचा व तसाच त्यांच्या आयुष्याचा नाश होतो, याविषयीं मनास साहजिकपणें अत्यंत खेद वाटतो; आणि मग त्यांचे विद्यार्जनाचे कष्ट अयुक्त व अनर्थावह दिसूं लागतात. सोन्याची सुरी झाली म्हणून ती उरीं खुपसतां कामा नये! पुष्कळ गरीब ब्राह्मण आईबाप व पालक दांतीं तृण धरून काळ लोटीत आहेत, व आपल्या मुलांस विद्याप्राप्ति व्हावी म्हणून हरएक उपाय योजीत आहेत! आपल्या मुलांच्या कोवळ्या मनास धक्का बसूं नये म्हणून ते आपल्या यातना कदाचित् त्यांस सांगतहि नसतील. परंतु ही स्थिति एकपक्षीं योग्य नाहीं. मुलें पाणीदार असतील तर आईबापांचे हाल पाहून तीं कधींहि स्वस्थ बसणार नाहींत. त्यांनीं साहजिकच प्रश्न करावा कीं "बाबा! ही अल्पस्वल्प विद्या मिळवून पुढें तुमच्याप्रमाणें अशीच ही विपत्ति भोगायची ना! बेहत्तर आहे यापेक्षां एव्हांच हमाली करावी लागली तर! तुमचा तरी कांहीं भार कमी होईल." याप्रकारें स्वतंत्र उद्योगाच्या ईर्षेनें बाहेर पडून, हालअपेष्टा सोसून, आपल्या हिमतीनें ज्यांनीं आपलें नशीब काढलें, अशीं कांहीं उदाहरणें माझ्या पाहण्यांत आहेत.

ह्या सर्व गोष्टी तुम्हांला सांगायाचें कारण काय? हेंच कीं, शारीरिक परिश्रमाचे व बाह्यात्कारी अमंगळ दिसणारे धंदे तुम्हीं तुच्छ गणूं नयेत. जोंवर अंतःकरण निर्मळ आहे व मनास उत्साह आहे, तोंवर बाह्यात्कारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोणत्याहि मलिनतेस भिण्याचें कारण नाहीं. बुद्धि हें हरकामी शस्त्र आहे, त्याचा हजार प्रकारांनीं कां तुम्ही उपयोग करीत नाहीं ? कोणीं कोणताहि धंदा स्वीकारिला, तर त्यांत हें शस्त्र त्यास उपयोगीं पडेल; इतकेंच नव्हे, तर त्यायोगें त्याची इतरांवर सरशी होईल. जो या अशा धंद्यांच्या मागें लागला, तो विद्यामृतास मुकला असें घडण्याचें कारण नाहीं; तेंहि त्यास प्राप्त करून घेतां येईल.

अ भ्या स

१. लेखकानें सुशिक्षितांतील बेकारी नाहींशी करण्यास कोणता उपाय सुचविला आहे ?

२. अगदीं गरीब स्थितींतून स्वतःच्या परिश्रमानें वरच्या स्थितीस पोंचलेल्या एकाद्या थोर व्यक्तीची माहिती देऊन ‘ गरीब स्थितींतच कित्येक मानवी गुणांचा पूर्ण विकास होतो ’ ह्या वाक्याचा खुलासा करा.

स्वा ध्या य

१. सुशिक्षित मनुष्य हलक्या समजलेल्या धंद्यांत (उदाहरणार्थ, पुस्तकबांधणी, विणकाम, कांचकाम, शेती) शिरून कसा नांवलौकिक मिळवितो याचें तुमच्या वाचनांतील किंवा माहितींतील एकाद्या व्यक्तीचें उदाहरण घेऊन वर्णन करा.

२. इंग्लंडमधील मुलें आपल्या १३–१४ व्या वर्षीच आपण पुढील आयुष्यांत काय होणार याचा ठाम निश्चय करतात. तुम्ही असा कांहीं निश्चय केला आहे काय ? तुम्हांला काय व्हावेंसें वाटतें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८. सभ्यता.

हरि नारायण आपटे

प्रसिद्ध कादंबरीकार हरि नारायण आपटे यांनीं, वार्षिक संमेलनाचे प्रसंगीं विद्यार्थ्यांस उद्देशून केलेला हा उपदेश आहे. भाषा किती साधी व सरळ आहे. मागील निबंधाची व याची या बाबतींत तुलना करा.

मुलांनो,

आज आतां तुम्हांला सुटी झाली म्हणजे सुमारें महिना दीडमहिना तुमची माझी गांठ पडणार नाहीं; तेव्हां तुम्हांला 'या' असें म्हणण्यापूर्वीं चार गोष्टी सांगाव्या असें माझ्या मनांत आहे.

हरि नारायण आपटे

घटका दोन घटका चालून आलें म्हणजे पाव—अर्धी घटका विश्रांति घ्यावी; दिवसभर मेहनत केली म्हणजे संध्याकाळच्या प्रहरीं घटकाभर करमणूक करावी आणि रात्रभर झोंप घ्यावी; सहा दिवस चांगले श्रम केले म्हणजे सातवे दिवशीं स्वस्थ विश्रांति घ्यावी; असें आजपर्यंत लोक करीत आले. वर्षांतून पांच पंचवीस दिवस सण म्हणून मानून लोक आनंदांत व विश्रांति घेण्यांत घालवितात याचा हेतु काय बरें? पुढें काम करण्यास ज्यास्त हुषारी यावी, मनाला व शरीराला आलेला थकवा, आपल्या पुढच्या मेहनतीच्या आड येऊं नये, हाच नव्हे काय? सुटी मिळते आहे म्हणून जशीं तुमचीं तोंडें अगदीं प्रफुल्लित दिसत आहेत, तशीं पुनः कामाला सुरुवात करण्याच्या दिवशीं आमच्या दृष्टीस पडावीं, मनास व शरीरास दोहोंसहि योग्य विश्रांति मिळावी म्हणून ही सुट्टी आहे, तर तिचा तुम्हीं साऱ्यांनीं चांगला उपयोग करून घ्यावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परंतु एक गोष्ट तुम्हीं लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं ही जी विश्रांति घ्यावयाची तिच्या योगानें तुमच्या अंगांतली तरतरी जाऊन आळस मात्र शिरूं देतां कामा नये. डोंगराच्या शिखरावरून एकसारखें घडघड येऊन कोठें तरी पडणाऱ्या दगडाप्रमाणें तुम्ही आपली स्थिति होऊं देऊं नका. आजपर्यंतची जी तुमची तरतरी आहे, आजपर्यंतच्या अभ्यासानें जणूं काय घांसून पुसून तुम्हांस जें तेज आलें आहे, तें गमावेल अशी विश्रांति घ्यावयाची नाहीं.

तुम्ही आतांपर्यंत जें शिकलां, त्याच्यावर थोडीबहुत उजळणी जर केली नाहीं, तर मग तुमचीहि स्थिति मळलेल्या आरशाप्रमाणें अगर काळ्या पडलेल्या भांड्याप्रमाणें होईल. दिवा लागला आहे; परंतु त्यांत तेल आहे कीं नाहीं हें पाहून, वातबीत सारून काजळी झाडली नाहीं, तर कांहीं वेळानें दिवा जाऊन अंधार पडेल. तेव्हां आजपर्यंत शिकलांत त्याची दिवसांतून तास दोन तास उजळणी करीत जा. आतां सुटींत करण्यासाठीं म्हणून तुम्हांस कोणी नवीन अभ्यास नेमून देत नाहीं. जे झाले आहेत त्यांची नीट व्यवस्था ठेवा. घर चांगलें भक्कम बांधलें तरी पण त्याची वास्तपुस्त ठेवली नाहीं, आठ चार दिवसांनीं धूळ वगैरे झाडून कोळिष्टकें काढलीं नाहींत, भिंतीवरून हात फिरविला नाहीं, पडलें झडलें पाहिलें नाहीं, तर तें लवकरच मोडकळीस येईल. तेंच जर हें सारें केलें, तर घर पण घर राहील !

आतां मीं तुम्हांस सांगितलें खरें कीं, "सुटींत करण्यासाठीं म्हणून तुम्हांस कोणी नवीन अभ्यास नेमून देत नाहीं," पण तसें नाहीं. मी आज जो उभा राहिलों आहें, हा तुम्हांस एक नवीन धडा नेमून देण्यासाठींच उभा राहिलों आहें. तो धडा मी आतां तुम्हांस समजावून देतों. भिऊं नका. तोंडें वाईट करूं नका. मी धडा देणार आहें तो तुमच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विश्रांतीच्या, आनंदाच्या अगर सुखाच्या आड येणार नाहीं, इतकेंच नव्हे, तर तो धडा तुम्ही चांगला शिकलांत तर तुम्हांला या तीनहि गोष्टी हव्या तेवढ्या मुबलक प्राप्त होतील. हा धडा शिकण्याकरितां तुम्हांला पुस्तक घेऊन एकाच ठिकाणीं तास दोन तास बसायला नको. हा धडा असा आहे कीं, पाहिजे तेव्हां, पाहिजे त्यानें, पाहिजे त्या ठिकाणीं शिकावा. " अहो येतां जातां उठत बसतां कार्य करितां ! सदां देतां घेतां वदनिं वदतां ग्रास गिळितां," घरीं, दारीं सर्वत्र शिकतां येईल असाच तो धडा आहे आणि तो शिकत जावा तसतसा आपल्याला अधिक अधिक आनंद होतो. आपल्या सभोंवार असतील त्यांस सुख होतें. तो आपण कितीहि घोकला तरी त्याची कटकट कोणास होणार नाहीं. असा विलक्षण धडा आहे तरी कोणता ? तो कळण्याची तुम्हांला मोठी उत्सुकता झाली असेल नव्हे ? ऐका तर मग. मी जें आज तुम्हांला विशेष शिकावयास सांगणार आहें, तें ' सभ्यपणाचा धडा ' हें होय. आजपर्यंत तुम्हांला सभ्यपणा नव्हता असें म्हणणें नाहीं; परंतु तो तुमच्या अंगीं कायम राहून त्याचा अधिकाधिक उदय व्हावा, अशी माझी फार फार इच्छा आहे. याच्या-विषयीं आज मीं थोडेंसें विवेचन करणार आहें.

मुलांनो, सभ्यपणा या शब्दांत किती अर्थ येतो, याचा कधीं तुम्हीं विचार केला आहे काय ? या शब्दांत जितका अर्थ येतो, तितका सगळा यथास्थितपणानें मीं जर सांगेन म्हटलें, तर सात आठ तास देखील पुरणार नाहींत; तेव्हां अगदीं थोडक्यांत सांगतों म्हणजे झालें. 'सभ्यपणा' या शब्दाचा अर्थ अंतर्बाह्य निर्मलपणा. ज्याचें शरीर व मन दोनहि निर्मल तो खरा सभ्य. नीटनेटक्या पोषाखाचा मनुष्य पाहिला म्हणजे आपण एक-दम तो कोणी तरी सभ्य गृहस्थ असावा, असें समजतों. त्याचप्रमाणें एखाद्या माणसाचा पोषाख आपला कसाबसा दिसला, आणि प्रथमदर्शनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपणास तो सभ्य वाटला नाहीं, तरी त्याचें आपलें दोन घटका बोलणें झालें म्हणजे त्याची रीतभात, आचारविचार चांगले दिसले तर त्यास आपण सभ्य म्हणतों. तेव्हां सभ्यपणा हा पोषाखावर, चालचलणुकीवर आणि मनाच्या शुद्धतेवर असतो. या तीनहि गोष्टी ज्याच्या अंगीं परिपूर्ण तो खरा सभ्य. तेव्हां तुम्हांला जर सभ्य व्हावयाचें असेल तर,—तुम्हीं व्हावें अशी माझी, तुमच्या आईबापांची, तुमच्या स्नेह्या-सोबत्यांची, सारांश, तुमचें सदासर्वदा कल्याण व्हावें असें ज्याला वाटतें त्या प्रत्येकाची अतिशय इच्छा आहे. तेव्हां साऱ्यांना संतोष व्हावा असें तुम्हांला वाटत असेल, तर या आतां सांगितलेल्या तीन गोष्टींकडे लक्ष पुरवा. नीटनेटका पोषाख करायला शिका, आपली चालचलणूक चांगली करा आणि मन गंगेच्या पाण्या-प्रमाणें शुद्ध निर्मल राहूं द्या. या तीन गोष्टी तुम्हीं साधल्या म्हणजे मग तुमच्या अंगीं सभ्यपणा परिपूर्ण आला म्हणून समजा.

मुलांनो, इंग्रजींत सभ्य गृहस्थ किंवा सुजन, याला Gentleman असा शब्द आहे, याचा अर्थ अगदीं उघड आहे—Gentle सौम्य, man गृहस्थ = सौम्य गृहस्थ. पोषाखांत सौम्य, बोलण्याचालण्यांत सौम्य, विचार-विकारांतहि सौम्य. हा सौम्यपणा आपल्या अंगीं आणणें हेंच तुम्हांला शिकवावें असें माझ्या मनांत आहे; परंतु ज्याप्रमाणें मी इतर धडे तुम्हांस शिकवितों, त्याप्रमाणें हाहि शिकविणार. अभ्यास करावयाचा तो मुलाचा मुलानेंच केला पाहिजे. त्याचप्रमाणें आज जो हा धडा मी तुम्हांस शिकवितों आहें, तो योग्य रीतीनें समजावून सांगतों. तो आपलासा करून घेण्यास काय काय करावें लागतें, तें सांगून वाट दाखवून देतों; हें सांगणें तुमच्या एकदां मनांत उतरलें, म्हणजे पुढचें काम तुमचें आहे. अभ्यास करावयाचा तो तुमचा तुम्हींच केला पाहिजे आणि तो तुम्ही कराल व त्याचीं योग्य फळें मिळवाल अशी माझी पक्की खात्री आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

मी आतांच तुम्हांला सांगितलें कीं, सभ्यपणा हा पोषाखावर, चालचलणुकीवर व मनाच्या निर्मलपणावर अवलंबून असतो. आतां या तीन गोष्टींतून एक एक गोष्ट घेऊन आपण त्याचा निरनिराळा विचार करूं.

परंतु पोषाखाचा विचार करूं लागण्यापूर्वीं ज्या आपल्या शरीरावर तो पोषाख घालावयाचा त्या शरीराच्या स्वच्छतेसंबंधानें विचार केला पाहिजे; कारण शरीर स्वच्छ राखणें हें एक सभ्यपणाचें अंग आहे. मुळीं सभ्यपणा म्हणजे स्वच्छता–शुद्धता होय. शरीरानें, पोषाखानें, चालचलणुकीनें आणि विचारानें जो स्वच्छ तो सभ्य. तेव्हां शरीर स्वच्छ राखणें ही अगदीं आरंभींची गोष्ट आणि विशेषतः तुम्हां लहान मुलांना तर हें विशेषच सांगितलें पाहिजे. कारण तुम्हांपैकीं कित्येक–किंबहुना–पुष्कळजण शरीराच्या स्वच्छतेकडे द्यावें तितकें लक्ष देत नाहींत. स्वच्छ तोंड धुतलें नाहीं, तर किती ओंगळपणा दिसतो! दांतांवर कीट चढून पिंवळेपणा येतो आणि मग कोणाशीं बोलण्यास लाज वाटूं लागते. तोंडावर ओघळ दिसणें किती तरी हिडिस! कावळ्यासारखी अंघोळ करणें अगदीं गैरशिस्त! उगीच डोक्यावर तपेलीभर पाणी ओतून थडथडा पळत जाणें सर्वथा टाका; तुम्हांपैकीं पुष्कळांना ही संवय असेल. इंग्रजींत यासंबंधानें म्हण आहे ती सदैव लक्षांत ठेवा. पवित्रतेच्या आधींची पायरी स्वच्छता. पवित्रता मिळवूं पहाणाराला स्वच्छता साधलीच पाहिजे. शिवाय स्वच्छतेपासून शरीरास किती तरी सुख होतें! वाईट काम करणाऱ्या मुलांच्या मनाला जितकें दुःख तितकेंच अस्वच्छ असणाऱ्या मुलांच्या मनाला, शरीराला दुःख! एवढ्याकरितां मलीनता म्हणून आपल्या अंगावर राहूं देऊं नये. रोजच्या रोज अंग स्वच्छ धुवावें, बाहेर जाते वेळीं तोंडवींड चांगलें स्वच्छ धुऊन नंतर जावें.

आतां बाहेर जातांना पोषाख करावयाचा तो सभ्यतेला योग्य असा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असावा. मुलांनो, पोषाख घालावयाचा हा मुख्यतः शरीर झांकण्याकरितां आहे; परंतु तो दुसऱ्यास दिसला असतांना त्याला त्यांत कांहीं वाईट वाटेल असा तो असूं नये. पोषाख असा असावा कीं, तो कसा केला आहे हें कोणाच्या विशेष लक्षांत येऊं नये; तो अगदीं स्वच्छ असावा, हें तुम्हांला सांगावयास नकोच; कारण, सभ्यपणाची आपली इमारत बांधावयाची ती मुळीं स्वच्छतेच्या पायावर. पोषाख अस्वच्छ असला तर लोकांस व आपणांस दोघांसहि वाईट. तेली आपले कपडे म्हणून भांडायाला येईल, असे कपडे असूं नयेत; चांगले स्वच्छ ठेवावे. पोषाखांत उंचीपणा नकोच. मुख्य पाहिजे तो स्वच्छपणा. त्याचप्रमाणें जो पोषाख अंगावर असतांना लोक छचोर म्हणतील, असाहि तो असूं नये. त्यांत साधेपणा, नीटनेटकेपणा असावा. कित्येक मुलें ओंगळपणांत व गयाळीपणांतच साधेपणा आहे असें समजतात. कोणी " असें कां ? " म्हणून विचारतां, " आम्हांला काय साध्या माणसांना ? असाच बरा ! " पण ही त्यांची केवढी मोठी चूक आहे ? तुम्हांपैकीं अशी चूक करीत असतील, त्यांनीं ती अवश्य सुधारावी.

बरें, दुसरीं कित्येक मुलें असतात त्यांना नखरा—डामडौल करण्यांतच नीटनेटकेपणा वाटतो. कानावर टोपी घालून ऐटीनें बसणें, अंगरख्याचे बंद अगर कोटाच्या गुंड्या मुद्दाम मोकळ्या सोडणें, बाकी सारे बंद बांधून गळ्याच्या तिथलीच अंगरख्याची गुंडी मोकळी सोडणें, यांतच काय ती मजा आहे असें त्यांस वाटत असतें. पण ते फार वेडे ! नीटनेटकेपणा किंवा साधेपणा, असे बंद अगर गुंड्या मोकळ्या सोडण्यांत नाहीं, तर नीट बंद वगैरे बांधण्यांत, टोपी चांगली नीट घालण्यांत आहे. पोषाख म्हणजे शरीराचा एक दागिना आहे असें जे समजतात ते तो डौलानें, नखऱ्यानें लोकांच्या नजरेस जरूर येईल अशा तऱ्हेनें घालतात; आणि ज्याला नीट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घालायला येत नाहीं ते आपला उणेपणा—आपला गयाळीपणा झांकण्या-साठीं साधेपणाची ऐट मारतात. मिळून दोघेहि मूर्खच ! तेव्हां तुमच्यांतले कित्येक या दोन वर्गांपैकीं एखाद्यांत असतील, त्यांनीं तो वर्ग सोडून खऱ्या साधेपणाकडे व नीटनेटकेपणाकडे वळावें, व पोषाख स्वच्छ, साधा, आणि नीटनेटका करावा.

असा पोषाख तुम्ही नित्य करूं लागलांत म्हणजे पोषाखानें दिसणारा सभ्यपणा तुम्ही आपल्या स्वाधीन करून घेतलांत असें पक्कें समजा.

आतां आपल्या विषयाच्या दुसऱ्या अंगाकडे वळूं. चालचलणुकीसारखी दुसरी कोणतीहि महत्त्वाची गोष्ट नाहीं. तुम्ही चोरी करूं नका, लबाडी करूं नका, खोटें बोलूं नका, वाईट संगत धरूं नका इत्यादि गोष्टी मी तुम्हांला सांगत नाहीं; कारण हे अत्यंत नीच अपराध तुमच्या हातून स्वप्नांतहि होत असतील असें मला वाटत नाहीं. एखादा दुसरा तुमच्यांत हे अपराध करणारा असेल, तर त्यानें वेळींच सुधारावें, नाहीं तर त्यास पुढें अतोनात यातना भोगाव्या लागतील.

मी कांहीं लहानसान परंतु फार महत्त्वाच्या पांच चार गोष्टींबद्दल थोडेंसें बोलणार आहें. मुलांनो, मीं नुकतेंच जें तुम्हांला सांगितलें कीं, सभ्यता म्हणजे पोषाखांत, चालचलणुकींत व विचारविकारांत सौम्यता असणें, तें तुमच्या ध्यानांत आहेच. चालचलणुकींत सौम्यता असणें हें सभ्यतेचें मुख्य अंग हें आतां सांगतों. नीट ध्यानांत धरा. एका ग्रंथकारानें म्हटलें आहे, ‘लहानसान—यःकश्चित् गोष्टींतहि चांगुलपणा दाखविणें, हें सभ्यतेचें खरें लक्षण. गोड बोलणें, कोणाचें मन न दुखविणें, कोणींहि कांहीं काम सांगितल्यास होतां होईपर्यंत त्याला ‘नाहीं’ असें कधीं न म्हणणें, आपल्यासाठीं कोणाला कांहीं करण्याविषयीं सांगणें झाल्यास मोठ्या नम्रतेनें विनंति करणें, इत्यादि गोष्टी म्हणजे सभ्यतेचें सार होय.’

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुम्हांपैकीं पुष्कळ–पुष्कळच जण–ज्या गोष्टी करीत नाहींत त्या याच. नम्रतेनें व सौम्यपणानें वागणें म्हणजे कांहींच नाहीं. तुम्ही आपल्या गुरूशीं अथवा आईबापांशीं नम्रपणानें वागतां तें उत्कृष्टच. तें कर्तव्य तुम्ही बजावतां; परंतु तुमच्या बरोबरीचे जे आहेत त्यांच्याशीं व तुम्हांहून लहान आहेत, त्यांच्याशींहि नम्रपणानें व सौम्यतेनें वागूं लागल्याखेरीज तुम्हांला कोणी सभ्य समजणार नाहीं. उद्धटपणानें बोलण्यांत कोणास मौज वाटत असेल ती वाटो; मला तर त्यांत कांहींहि चांगलें दिसत नाहीं. आपल्याला वर्गांत बसायला जागा पाहिजे असल्यास आपल्या स्नेह्याला "ए! खालीं हो रे. आम्हांला जागा नको का बसायला?" असें उद्धट-पणानें सांगण्यापेक्षां "मला थोडीशी दाटी होते आहे, अंमळ सरकून घेशील काय?" असें म्हणण्यांत खरोखर मोठेपणा आहे; परंतु मीं एकच गोष्ट सांगण्याच्या या ज्या दोन पद्धती दिल्या आहेत, त्यांपैकीं पहिली कितीजण अनुसरतात, आणि दुसरी किती अनुसरतात याचें प्रमाण पहा बरें! मला वाटतें शंभरांत एक, असें प्रमाण मोठ्या माराकुटीनें बसेल! ही स्थिति चांगली काय? उगीच उदाहरणाकरितां म्हणून एक, वर्गांत घटकोघटकीं घडणारी गोष्ट सांगितली; परंतु तुम्ही विचार करून पहाल तर अशा तऱ्हेचें वर्तन क्षणोक्षणीं घडतें असें तुम्हांला आढळेल. आपल्या स्नेह्याला हांक मारतांना त्याचीं सरळ नांवें टाकून "नाम्या, विन्या, बाळ्या, हऱ्या" अशीं नांवें घेण्यांत काय विशेष आहे? त्याचप्रमाणें कोणी कांहीं काम सांगितलें तर त्याला "चल, आमचं काय अडलं आहे? तुला हवं तर कर!" असे शब्द दिवसांतून कितीदां तुमच्या तोंडून निघतात! तुम्हांला जर कोणीं विचारूं लागलें–विशेषत: तुमची बहीण जर तुम्हांला कांहीं विचारायला आली, तर तुम्ही कशीं उत्तरें देतां? माझ्या एका स्नेह्याच्या मुलीनें, पुस्तहि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचीत बसलेल्या आपल्या भावास एक दिवस सहज म्हटलें, "दादा, तूं काय वाचतो आहेस तें मला सांग रे." तिनें बिचारीनें अगदीं सौम्यपणानें विचारलें. परंतु दादासाहेब तेवढ्यानेंच चढून मोठ्या उद्धटपणानें तिला म्हणतात, "चल, तुला काय पोरीला करायचं आहे बुकांतली गोष्ट ऐकून? चूलबोळकीं खेळ जा आपली!" हें त्या मूर्ख पोराचें उत्तर ऐकून कोणास हसूं येणार नाहीं? मुलांनो, तुम्ही आपल्या बहिणींस असें उत्तर कधीं–कधींहि देऊं नका. पुस्तकें वाचून ज्ञान मिळविण्याची तुम्हांला जशी इच्छा असते तशी त्यांनाहि असते. ज्ञानापासून जसा तुम्हांला फायदा होणार तसा त्यांनाहि होणार. उलट त्यांना जर वाचण्याची गोडी नसली, तर त्यांच्या मनांत ती उत्पन्न करा. उद्धट उत्तरें देऊन त्यांचा कधींहि हिरमोड करूं नका. कोणाचा हिरमोड करूं नये. चांगल्या गोष्टींत उलट सर्वांस यथाशक्ति मदत करावी. यांत सभ्यपणा आहे हें चांगलें ध्यानांत ठेवा. तोंडावाटे कधींहि अभद्र भाषण काढूं नका. अभद्र शब्द आपल्या शब्दकोशांतून अगदीं पिटाळून लावा. स्वप्नांत देखील त्यांचा विटाळ आपणांस होऊं देऊं नका. दुसरा कोणी उच्चारीत असला तर त्याला तसें करूं नकोस म्हणून उपदेश करावा. तो न ऐकेल तर आपण तेथून उठून जावें. पुन्हां असल्या माणसाशीं संबंध ठेवूं नये. जे शब्द आपणांस सभ्य लोकांच्या देखत उच्चारण्यास लाज वाटेल, जे शब्द आपल्या बहिणीच्या, आईच्या वगैरे कानीं कधींहि पडूं नयेत असें आपण इच्छितों, असले शब्द आपल्या तोंडांतून निघणें, म्हणजे केवढा हलकटपणा! असला हलकटपणा ज्याच्या अंगीं आहे तो सभ्यपणा पावणार कसा? तेव्हां आपण काय बोलतों, व आपले स्नेही काय बोलतात, याजबद्दल अतिशय खबरदारी घेतली पाहिजे. ज्याची वाणी निर्मल, त्यानें सभ्यता बहुतेक मिळविली म्हणून समजावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बोलण्यांत बोल नसणें हें एक सभ्यतेला मोठें विघ्न आहे. तेंहि तुम्हीं टाळलें पाहिजे. आतां एक गोष्ट तुम्ही करतों म्हणून सांगावें, तुमच्या विश्वासावर लोकांनीं बसावें, आणि दुसऱ्या घटकेस तुम्हीं बदलावें, यासारखी असभ्यपणाची वागणूक दुसरी कोणतीहि नसेल. तर ती तुम्ही अवश्य अवश्य टाळा.

आपल्या चालचलणुकीसंबंधानें इतकी सुधारणा तुम्हीं केली म्हणजे तुम्हीं सभ्यता संपादन केली असें म्हणण्यास हरकत नाहीं. याप्रमाणें दोन अंगें झाल्यानंतर आतां आपण शेवटल्या अंगाकडे वळूं या.

मन निर्मल असणें, कोणतेंहि काम करतांना तें शुद्ध हेतु धरून करणें, कोणाविषयीं हेवादावा मनांत मुळींच राहूं न देणें, कपटाला म्हणून थारा न देणें, रिकामा दिमाख, पोकळ अभिमान यांचा अगदीं नायनाट करणें, इत्यादि गोष्टी साधल्या म्हणजे सभ्यपणाचें तिसरें व अति महत्त्वाचें अंग आपलेंसें झालें म्हणून समजावें. आपल्याला अमुक गोष्ट येते आहे असें समजून आपल्या वर्गांतला सोबती आपल्याला विचारायला आला तर त्याला मन मोकळें करून आपल्याला येत असेल तें सांगावें; कुचराई करूं नये. त्याला आपण सांगितल्यानें आपला नंबर वर जायचा तितका जाणार नाहीं असा वाईट—घाणेरडा—विचार मनांत मुळीं शिरूंच देऊं नये. असला एक विचार एकच वेळ जरी आला, तरी उत्तम अंजि-रांच्या टोपलींत एक नासका अंजीर पडल्यानें जी स्थिति होते ती व्हायची. ते जसे सारे अंजीर एकामुळें नासतात, तसे अशा एका कुविचारानें आपले सर्व विचार नासून जातात; तेव्हां असला विचार अंतःकरणाच्या दाराशीं देखील येऊं देऊं नये.

आपलाच हेका धरून बसणें—मी अमुक करा असें म्हणतों, तें केलें तरच बरें—असा हट्ट घेणें तर फारच वाईट, आणि तुमच्या वयांत जर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुम्ही हा अवगुण घालविला नाहीं, तर पुढें फारच अवघड जाईल. बाबांनो, हा हट्टी स्वभाव—हा सगळ्यांत वाईट व निंद्य दुर्गुण—तुम्ही जितक्या लवकर टाळाल तितकें तुमचें कल्याण होईल. या हट्टी स्वभावामुळें किती नुकसानें होतात याचा पत्ताच नाहीं. आपल्यालाहि सुख नाहीं, दुसऱ्यालाहि नाहीं. कोणाचा म्हणजे त्यापासून संतोष होतो असें नाहीं. हट्ट घेऊन बसलांत म्हणजे क्षणभर मंडळी दादापुता करितात, पण तुमचें रडगाणें थोडक्यांत संपलें नाहीं म्हणजे वडील मंडळी संतापून जाऊन रट्टे देण्यापर्यंत येतात. तुम्हांला शिक्षा करण्यांत गुरूला किंवा वडिलांना संतोष का आहे? उलट किती तरी वाईट वाटतें! पण त्याचा दोष कोणाकडे? सभ्यतेला अनुचित असें हट्टी वर्तन करणाऱ्या तुम्हांकडे, हें तुमचें तुम्हांला समजतेंच आहे.

तर मुलांनो, हे वर सांगितलेले पोषाखाचे, चालचलणुकीचे व मनाचे दोष अजिबात काढून टाका. हे दोष गेले म्हणजे तुम्ही सभ्य झालांतच. प्रथम प्रथम कित्येक गोष्टी साधण्यास थोडेंसें कठिण जाईल; परंतु एकदां निश्चयपूर्वक यत्न केला म्हणजे तें सारें खास साधेल. सांगणें—शिकवणें काम आमचें; त्याचा अभ्यास करून तें आपलेंसें करणें हें काम तुमचें. आमचें काम आम्हीं केलें, तसें तुमचें काम तुम्ही करा. आज जो हा धडा मीं तुम्हांला दिला, तो चांगला पाठ करा, त्याचा अभ्यास करा, आणि सुटी संपल्यावर परत आलांत म्हणजे आपल्या वर्तनांत फरक झाला आहे असें आमच्या नजरेस येऊं द्या. 'जो गुण बाळा तोच जन्मकाळा' ही म्हण चांगली लक्षांत धरा. आज जो गुण तुम्ही आपल्या अंगीं खिळवाल, तो आजन्म रहाणार! तुमचें कल्याण अगर अकल्याण होणार तें आतां तुमच्या अंगीं जडणाऱ्या गुणावगुणांवर अवलंबून आहे. तुमचें मुख्य कर्तव्यकर्म आपल्या चांगल्या वागणुकीनें, स्वतःस व इतर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सर्वांस सुख देणें हें होय. शरीराची स्वच्छता राखून व्यायाम वगैरेकडे चांगलें लक्ष पुरविलें म्हणजे तुमचें शरीर सुखी होईल. आईबापांची व गुरूची आज्ञा पाळून, आपल्या सद्वर्तनानें त्यांस सुख दिलें म्हणजे तुमच्या मनाला जें समाधान होईल, तें केवळ अवर्णनीय ! गोड व सौम्य अशा शब्दांनीं दुसऱ्यास बरें वाटविलेंत तर किती तरी मोठेपणा होतो ! वेळेची किंमत जाणून—तो व्यर्थ घालवूं नका. खेळण्याच्या वेळीं खेळा, अभ्यासाच्या वेळीं अभ्यास करा. इतक्या सगळ्या गोष्टी तुम्ही योग्य तऱ्हेनें केल्या म्हणजे ‘ सभ्य ’ हें नांव मिळवून तुम्हीं सुख संपादन केलें म्हणून समजा; आणि तुम्ही अशा तऱ्हेनें सुखी झालां म्हणजे गुरूंच्या व वडील मंडळीच्या आनंदास काय पारावार ! तुमचें खरें सुख तेंच त्यांचें सुख !

पुनः पुनः माझें तुम्हांला सांगणें आहे तें हेंच कीं, सभ्यपणानें वागणें हें अगदीं तुमच्या हातचें आहे. तें तुम्ही साधा. मनास वाटेल त्यावेळीं सरदाऱ्या दरकदाऱ्या मिळविणें हें आपल्या हातचें नाहीं. इच्छेस येईल त्या वेळीं श्रीमंत होणें अशक्य. प्रत्येकजण जर म्हणेल कीं, मी रावसाहेब रानडे, डॉ. भांडारकर, जस्टिस तेलंग इत्यादि मंडळींप्रमाणें विद्वान् होईन तर तेंहि त्यास साधेलच असें नाहीं; आणि कधीं काळीं सतत श्रमानें, व दृढ निश्चयानें तसें होतां आलें, तरी फार थोड्यांस येईल. परंतु सभ्यतेनें वागणें हें कोणाला पाहिजे त्याला साधणार आहे. मग तो लहान असो, थोर असो, धाकटा असो, वडील असो, तरणा असो, म्हातारा असो, श्रीमंत असो, गरीब असो, विद्वान् असो, अविद्वान् असो, पुरुष असो किंवा स्त्री असो. पोषाख अगदीं साधारण पण नीटनेटका करणें, आपले विचार व आपलें मत स्पष्ट सांगणें, परंतु त्यांत उद्दामपणा नसणें, सत्यनिष्ठा, उदारता व कळकळ या तीन गोष्टी सदैव मनांत राखणें, गरिबांवर दया करणें, व गरजूंची गरज पुरविणें, सर्वांविषयीं आदरबुद्धि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धरणें, आपणाहून लहान असतील त्यांना बरेंवाईट सांगणें व वडिलांस मान देऊन त्यांचें म्हणणें ऐकणें ! ज्या स्थितींत आपण आहोंत त्या स्थितींत समाधान मानणें, कोणाचा हेवा-दावा न करणें, याचेंच नांव सभ्यपणा ! मनांत आणल्यास साऱ्यांना साधायला येईल, असें जें काय आहे तें हेंच ! सर्वत्रांच्या सुखाच्या भांडाराची जी किल्ली ती हीच, आणि ही तुमच्या स्वाधीन आहे ! तर पुनः एकदां तुम्हांला सांगतों, नीट लक्ष द्या. ही किल्ली तुमच्या हातीं आहे, हिच्या साहाय्यानें तें भांडार खुलें करा. आपणहि सुखी व्हा आणि आम्हां सर्वत्रांसहि सुखी करा. एवढें केलेंत म्हणजे तुमच्यासारखे धन्य कोणीच नाहींत ! व तुम्ही धन्य झालांत म्हणजे आम्ही वडील मंडळी धन्य झालोंच !

मुख्यतः ज्या विषयावर मी आज चार शब्द तुम्हांस सांगणार होतों, तो विषय वास्तविक येथें आटपला; तथापि आणखी तुम्हांला थोडेंसें सांगावें असें माझ्या मनांत आहे.

आपल्या वयाला अगदीं विशोभित अशा गोष्टी करण्याची तुम्हांपैकीं कित्येकांस जी संवय लागली आहे ती मात्र फार वाईट. मोठी मंडळी ज्या सभांना जातात, त्या सभांना आपण जाऊन बसणें; आणि तेथें जाऊन कांहीं एक न समजलें तरी "हा–हा–हा–" करून टाळ्या पिटणें, ज्यांत आपल्याला कांहीं समजत नाहीं असे वर्तमानपत्रांतले लेख वाचून त्यावर दुढ्ढाचार्यांप्रमाणें खल करणें, यासारखा लहान मुलांच्या हातून होणारा मूर्खपणा दुसरा कोणताहि नाहीं. अशा सभांस जाणें, आणि ज्या गोष्टींशीं आपला आज कांहीं संबंध नाहीं अशा गोष्टींचा काथ्याकूट करणें अगदीं –अगदीं सोडून द्या कसे ? ज्या सभा तुम्हांकरितां नव्हेत, त्यांकडे पाहूं देखील नका; जीं वर्तमानपत्रें तुमच्यासाठीं नव्हेत त्यांस शिवूं नका. मुलांसाठीं म्हणून जीं व्याख्यानें असतील तीं जाऊन अवश्य ऐका. पण जिथें तुमचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संबंध नाहीं, तुम्हीं गेलांत तर तुमचा फायदा नाहीं, इतकेंच नव्हे, तर नुकसान आहे, तेथें तुम्हीं जाऊं नका व जें तुमच्यासाठीं लिहिलेलें नाहीं तें तुम्हीं मुळीं हातींहि धरूं नका.

त्या सभांत जाण्याजोगें तुमचें वय झालें, व त्या गोष्टी योग्य रीतीनें समजण्याची अक्कल तुम्हांला आली म्हणजे मग कोणी तुम्हांला नको म्हणणार नाहीं. परंतु सध्यां त्यांचें नांव देखील घेऊं नका. आतां सुट्टीचे व व्याख्यानांचे दिवस आहेत तेव्हां प्रसंग येणार आहेत; तर ते टाळा आणि आत्मसंयमनाचा पहिला धडा शिका.

संपलें, आतां आज आणखी कांहीं गोष्टी मी सांगत नाहीं. सांगितल्या एवढ्या सर्व ध्यानांत धरून त्याप्रमाणें वागा, एवढेंच पुनः पुन्हां सांगून पुरें करतों.

अ भ्या स

१. 'पोषाख, चालचलणूक व मनाची शुद्धता यांवर सभ्यता अवलंबून असते,' या वाक्याची फोड करा.

२. "अहो येतां जातां उठत बसतां कार्य करितां ।
सदा देतां घेतां वदनिं वदतां ग्रास गिळतां ॥"
हा चरण कोणत्या कवीच्या कोणत्या कवितेंतील आहे ?

३. 'बोलण्यांत **बोल** नसणें', 'काथ्याकूट', यांतील अर्थ स्पष्ट करा.

स्वा ध्या य

१. तुमच्या सोबत्यास तुम्ही सभ्यतेचा धडा देत आहांत अशी कल्पना करून एक संवाद तयार करा.

२. 'शाळेबाहेरील शिस्तीचें महत्त्व' यावर निबंध लिहा.

पुरवणीवाचन

(१) काशीबाई हेर्लेकरकृत 'संसारांतल्या गोष्टी' या पुस्तकांतील 'सन्मार्गबोध' प्रकरण; (२) गोविंदरावाचीं आपल्या मुलास पत्रें—ह. ना. आपटे. (३) सगुणाबाईचीं आपल्या मुलीस पत्रें—ह. ना. आपटे. (४) मुलीस थोडा उपदेश–मधुप (कृष्णाजी केशव गोखले)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४

पत्रें

१. विनायकरावांची ग्रामसुधारणा

प्रो. वा. म. जोशी

आपण पत्रें कां लिहितों ? कांहीं कामासंबंधीं, कांहीं देण्याघेण्यासंबंधीं, कांहीं कुशलसमाचारासाठीं. हें तर खरेंच; परंतु पत्रलेखनाचा मुख्य हेतु, आपल्यापासून दूर असलेल्या इष्टमित्रांना आपलीं सुखदुःखें, आपले प्रासंगिक विचार, आपल्या दैनिक जीवनक्रमांत होत असलेल्या बऱ्या-वाईट घडामोडी कळविणें हा असतो. जितक्या सुंदर, स्वाभाविक रीतीनें आपण पत्रांत विचार व भावना व्यक्त करूं तितकी त्या पत्राची योग्यता अधिक. या दृष्टीनें विचार केल्यास तुम्हांला असें दिसून येईल कीं पत्रलेखन हीहि, कादंबरी, नाटक अगर कविता यांच्या लेखनासारखीच एक कला आहे. पत्रलेखनचातुरीबद्दल अनेक मोठमोठ्या लेखकांची ख्याति आहे. प्रो. वा. म. जोशी यांच्या 'इंदु काळे व सरला भोळे' या पत्रमय कादंबरींतील खालील पत्रहि असेंच सुंदर आहे. या पत्रांत कृत्रिमता, शब्दांचें अवडंबर, लांबलचक वाक्यें तुम्हांला दिसणार नाहींत, उलट नित्यांतली भाषासरणी व ओघाबरोबर आलेला स्वाभाविक विनोद तुम्हांला यांत आढळेल. अलीकडच्या 'पत्रकलें'त हेच गुण आढळतात. पत्र हें नेहमीं 'बोलकें' असलें पाहिजे. पत्र वाचतांना पत्र लिहिणारा आपणाशीं जणूं बोलतोच आहे असें वाटलें पाहिजे. तुम्हीं भाऊराव काळे आहांत अशी कल्पना करा व हें पत्र तुमच्याशीं 'बोलतें' का पहा. 'पत्नी चहा घेऊन येतांच पत्र लिहिण्याचें थांबवलें,' हें भाऊरावाला पत्रांत कळविणें व तिच्या येण्यानें सुचलेली उपमा लागलीच पत्रांत योजणें हें स्वाभाविकपणाचें किती उत्कृष्ट उदाहरण आहे !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पांचबावडी
ता. १०–१२–२४.

प्रियमित्र भाऊराव काळे यांस विनायकराव भोळे याचा सा. न. वि. वि.

रात्रींच्या शाळेकरितां, सामाजिक कार्याकरितां आणि आमच्या खाजगी खर्चाकरितां आपण जेवढे रुपये पाठवितां तेवढे सगळे मी सामाजिक कार्यांत खर्च करून टाकतों हा माझा कदाचित् दोष असेल; पण ही खोड मेल्याशिवाय जावयाची नाहीं. कारण माझ्या भोंवतीं मला इतकें दारिद्र्य दिसतें आणि मदतीची इतकी जरूर भासते कीं, जवळ पैसे असतां ते पेटींत ठेवणें माझ्या जिवावर येतें. दुसरें असें कीं, आपण माझ्यावर दया करून मदत करतां तशी मी इतरांवर करावयास नको काय? तिसरें असें कीं, माझ्यासारख्या वृत्तीच्या लोकांनीं आपण होऊन स्वीकारलेल्या दारिद्र्याच्या दीक्षेला सुसंगत वागावयाचें म्हणजे असेंच वागलें पाहिजे, नाहीं तर लोकांमध्यें भलतेच गैरसमज उत्पन्न होतील आणि 'फंडगुंड'-पणाचे आरोप येतील. आणि अगदीं खरें कारण सांगावयाचें म्हणजे सभोंवार इतकें दारिद्र्य आणि इतक्या आपत्ति 'आ' पसरून आहेत कीं, अशा परिस्थितींत अनवश्यक सांपत्तिक सुखोपभोग घेणें माझ्या जीवावर येतें, इतकेंच नव्हे तर तें मला पाप वाटतें. शिवाय, माझ्यासारख्यांना मुलांमुलींना शिक्षण देतांना, गरिबांना फुकट औषधपाणी देतांना, आपद्ग्रस्तांच्या आपत्ति दूर करतांना, स्नेह्यासोबत्यांमधील गैरसमज दूर करतांना, गांवांतील लोकांमधील तट मोडतांना (व मधून मधून तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें 'व्याख्यानबाजी आणि अध्यक्षगिरी' करतांना!) इतका आध्यात्मिक आनंद होत असतो कीं, इतर सुखोपभोगांची लालसाच शिल्लक रहात नाहीं. द्राक्षें मिळाल्यावर करवंदें कोण खाईल? अंजीर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खाऊन पोट भरल्यावर उंबरांकरितां कोण धडपड करील? (लाडिकपणानें हट्ट करणाऱ्या छोट्रूला कडेवर घेऊन सौभाग्यवतीनें चहा आणलेला आहे तो पाहून सुचलेली उपमाहि येथें लिहितों आणि ५।१० मिनिटें चहा पिण्याकरितां आणि सौ. शीं बोलण्याकरितां थांबतों. उपमा अशी कीं, अशी पत्नी आणि असा मुलगा आणि असा चहा आणि असा प्रेमपूर्ण देखावा ज्याच्या भाग्यांत आहे तो बाजारांतल्या एखाद्या नादान स्त्रीच्या दुकानांत जाऊन दारू कशाला पिईल?)

माझी वैद्यकी उत्तम चालली आहे. खेड्याच्या मानानें पुष्कळच पैसे मिळतात. भाजीपाल्यांच्या देणग्या पुष्कळ मिळतात. माझ्या पुराणाला संध्याकाळीं गांवांतील पुष्कळ लोक येतात. बायका येतात पण त्या कापूस पिंजीत किंवा वाती करीत असतात! त्या माझ्या विद्वत्तेची फार स्तुति करतात आणि ती ऐकून मी धन्य होतों!! आप्पासाहेबांना आपल्या-सारख्या श्रीमंताचा जांवई खेड्यांत दरिद्र्यासारखा राहतो हें त्यांना दुःख-दायक होत असेल, पण सुख आणि समाधान या बाबतींत मी (आणि सौभाग्यवतीहि) दारिद्र्यांत खास नाहीं, हें त्यांना समजावून सांगावें.

रात्रींची शाळा कशीबशी चालली आहे. सौभाग्यवतीहि सवड सांपडेल तेव्हां माझ्या सोबतीला येऊन मुलांमुलींना शिकविते. इतके दिवस शाळा एका पडक्या झोंपडींत घेत होतों, ती आतां देवळाजवळील धर्म-शाळेंत आणली आहे. कांहीं लोक विरुद्ध होते, कारण शाळेंत अस्पृश्य मुलें आहेत; परंतु होतें–नव्हतें तेवढें वजन खर्च करून धर्मशाळेंत शाळा आणण्याची परवानगी मिळविली. मीं पुण्यास असतां अस्पृश्यांशीं उघड-पणें रोटी-व्यवहार केला आहे; पण येथें करणें इष्ट का अनिष्ट याबद्दल निश्चय होत नाहीं. बहुधा लवकरच लोकमताला धाब्यावर बसवीन असें वाटतें. स्पर्शास्पर्श मात्र मानीत नाहीं. पुराणिकाच्या पेशाला वास्तविक हें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झेंपावयाचें नाहीं, (खऱ्या किंवा काल्पनिक) विद्वत्तेच्या कीर्तीवर आणि वैद्यकींत उपकार करून ठेवलेल्यांच्या कृतज्ञताबुद्धीवर आतांपर्यंत तरी सगळें धकून गेलें आहे. घारूअण्णा नागे, कृष्णंभट फुरशे, वगैरे सनातनी धर्माचा खोटा अभिमान बाळगणारी टवाळ आणि फसवी मंडळी मनांतल्या मनांत (आणि थोडेबहुत जनांत) जळफळत आहेत, पण पांडुरंग-शास्त्री अभ्यंकर यांच्यासारखा शास्त्री आणि नारायणराव काणे यांच्यासारखा घरंदाज श्रीमंत मनुष्य माझ्या बाजूला असल्यामुळें माझा सुधारकीपणा आतांपर्यंत तरी पचला आहे. योग्य संधि सांपडल्यावर नागे, फुरशे वगैरे लोक कदाचित् फणा उभारतील आणि दंश करतील, आणि कार्यांत विघ्नें उत्पन्न करतील अशी भीति आहेच म्हणा! माझ्यापुढें असा प्रश्न उभा राहतो कीं, समाजाला चुचकारून घेऊन थोडेंसेंच कार्य कां होईना, पण सगळ्यांना बरोबर घेऊन करावें, का लबाड पण भेकड लोकांना न भितां तत्त्वनिष्ठेनें सुचविलेलीं मोठीं कार्यें करण्यास लागून, आपत्तींना आणि धोक्यांना धैर्यानें तोंड द्यावें? धैर्यानें तोंड देण्यास मी भितों असें नाहीं, पण मोठा घास घेऊं लागल्यानें कार्यविनाश तर व्हावयाचा नाहीं ना, अशी भीति वाटते.

सौ. ची प्रकृति उत्तम आहे, ती मला हरतऱ्हेनें सामाजिक व बौद्धिक कार्यांत मदत करते,—ती खरी 'सहधर्मचारिणी' आहे. आनंदांत असते, पण छोटूला श्रीमंती कपडे व अलंकार वगैरे करतां येत नाहींत, एवढ्या-करतांच फक्त माउलीला वाईट वाटतें. आपण कौतुकानें उंची कपडे पाठ-वितां आणि अलंकारहि पाठवितां, पण आपण स्वतः मुलाला उंची कपडे करूं शकत नाहीं म्हणून बिचारीला वाईट वाटतें. स्त्रीहृदय असें आहे.

मी स्वतः छोटूचें बोट धरून, किंवा त्याला हातावर घेऊन (किंवा कधीं कधीं खांद्यावर घेऊन) मित्रांकडे किंवा बाजारांत जातों आणि त्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धन्यता मानतों ! लोक मला चमत्कारिक म्हणतात आणि हंसतात; पण छोट्टूच्या आनंदपूर्ण हास्यापुढें लोकांच्या हंसण्याची किंमत काय ? कळावें.

आपला,
विनायकराव भोळे

अभ्यास

१. 'फंडगुंड,' 'व्याख्यानबाजी,' 'अध्यक्षगिरी' या वाक्प्रचारांचा अर्थ सांगून त्यांतील गर्भित विनोद स्पष्ट करा.

२. 'छोट्टूच्या आनंदपूर्ण **हास्यापुढें** लोकांच्या **हंसण्याची** किंमत काय?' यांतील 'हास्य' व 'हंसणें' यांचे येथें दोन भिन्न अर्थ होतात. ते कोणते ?

३. या पत्रांतील मजकुरावरून विनायकराव भोळे यांचा स्वभाव कसा असावा असें तुम्हाला वाटतें ? वर्णन करा.

४. विनायकराव भोळ्यांचें, त्याच्या या पत्रांत व्यक्त झालेलें चरित्र लिहा.

५. घारुअण्णा **नागे** व कृष्णंभट **फुरशे** यांतील नागे व फुरशे हीं आडनांवें उपयोजिण्यांत लेखकाचा काय हेतु आहे ?

स्वाध्याय

१. विनायकराव भोळ्यांच्या या पत्रास, तुम्हीं स्वतः भाऊराव काळे आहांत अशी कल्पना करून, उत्तर लिहा. भोळ्यांच्या पत्राप्रमाणेंच तुम्हीं तुमचें उत्तर जितकें स्वाभाविक लिहितां येईल तितकें लिहा.

---

१०. विलायतेच्या वाटेवर—

न. चिं. केळकर

'केसरी' पत्राचे माजी संपादक रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर हे १९१९ सालीं लोकमान्य टिळकांबरोबर विलायतेस गेले असतां, त्यांनीं प्रवासांत वेळोवेळीं 'केसरी'ला—अर्थात् "केसरी'च्या वाचकांसाठीं—जीं पत्रें पाठविलीं त्यांतील हें एक पत्र आहे. हें पत्र बोटींतून लिहिलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. या अगोदरचें जें पत्र तुम्हीं वाचलेंत त्याहून हें जरा भिन्न आहे. आपलें हें पत्र हजारों लोक वाचणार, तर तें वाङ्मयिकदृष्ट्या जितकें सुंदर लिहितां येईल तितकें लिहिलें पाहिजे, ही जाणीव ठेवून लेखकानें तें लिहिलें आहे. ग्रंथांतील किंवा निबंधांतील लेखनपद्धतीहून यांतील लेखन भिन्न आहे खरें, पण विनायकराव भोळ्यांच्या पत्रांत जो 'घरगुतीपणा' आहे तो यांत नाहीं. हें पत्र त्या पत्राप्रमाणें 'बोलकें' आहे यांत संशय नाहीं; पण तें पत्र ओघाबरोबर येईल तें बोलतें, तर हें पत्र अमुक अमुक आणि अशा अशा रीतीनें बोलायचें असें अगोदर योजून मग बोलतें, हा दोहोंतील फरक आहे. आणि तो तसा फरक असणें योग्यच आहे. कारण बहुजनां-करितां लिहिलेलें पत्र त्यांना काय लिहिलेलें आवडेल हें लक्ष्यांत घेऊन आकर्षक पद्धतीनें लिहावें लागतें. रा. केळकर हे जसे रसिक, तसेच सूक्ष्म निरी-क्षक असल्यामुळें त्यांचें लिहिणें नेहमींच खुबीदार व रसपूर्ण असतें. उपमा, रूपक हे अलंकार, त्यांत असायचेच. हे त्यांचे गुणविशेष तुम्हांला त्यांच्या या पत्रांत आढळतील.

न. चिं. केळकर

ता. २२–२३. आज म्हणण्यासारखें कांहीं घडलें नाहीं. फक्त एक दोन वेळां मोठे व्हेल मासे आढळले. व्हेल मासा पाण्याच्या पृष्ठभागाकडे येऊं लागला म्हणजे तोंडांत पाणी घेऊन टाळूंतून वर सोडतो, त्या योगानें मोठा कारंजा उडत असतो. तो बराच दुरून दिसतो. या कारंजाचे रोखानें पाहिलें तेव्हां माशाचा निम्मा भाग पाण्यावर आलेला दिसला. कालपर्यंत बोट बेसुमार हालत होती. आज हालणें कमी झालें. बे ऑफ बिस्केची बोट हालण्याबद्दल फार ख्याती आहे. पण आम्हांस त्यापेक्षां अटलांटिक महासागरानेंच अधिक त्रास दिला. इतर समुद्रांपेक्षां येथें थोडा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निराळा प्रकार आढळतो. तो असा कीं, इतरत्र लाटांची लांबी लहान असून त्या फुटतात व फेस येतो, तो क्षितिजापर्यंत दिसत असतो; व या योगानें दिसण्यांत खळबळ फार असते. या महासागरांत लाटांची लांबी फार असून त्या कोठेंहि फुटलेल्या आढळत नाहींत व खळबळहि ऐकूं येत नाहीं; पण लांबून लाट येतां येतां समुद्राचा पृष्ठभाग इतका उंच होतो कीं, डोंगर वर उठल्यासारखा वाटतो व त्याबरोबर जहाजाची कड पाण्याला लागते. हें पाहून वाटतें कीं, खरोखरच समुद्राचें ऊर भरून आलें ! तरच समुद्रांच्या खळबळींत स्त्रियांच्या दुःखभराची उपमा साजली तर या महासागराच्या या भरतीस पुरुषांच्या दुःखाची उपमा साजेल !

आज सकाळीं आम्ही बे ऑफ बिस्के सोडून इंग्लिश चॅनलमध्यें प्रवेश केला असें जहाजाच्या रोखावरून दिसूं लागलें. इंग्लिश चॅनल आल्याबरोबर इंग्रजांना घर आलेंसें सहजच वाटूं लागलें. इंग्लंडचा किनारा दिसत नाहीं, पण डाव्या हातास कांहीं मैलांवर तो जवळ आहे असें मनास वाटतें ना ! रात्रीं झोंपेंत आईचा हात मुलाच्या अंगावर नसला तरी ती शेजारीं आहे या कल्पनेनें मुलास आईची सोबत पुरी होते तसेंच हें आहे. आम्ही मात्र हौसेनें इंग्लंडास जात आहों खरे; तरी पण इंग्लंड जवळ आलें या कल्पनेपेक्षां हिंदुस्तान तितकें दूर गेलें या कल्पनेचा पगडाच मनावर अधिक बसतो ! तूर्त आम्हांला आगबोट हेंच घर वाटत आहे खरें. पोर्ट-सय्यद व जिब्राल्टर येथें गांव पाहण्यास आम्हीं जाऊन परत येऊन बोटीवर पाय ठेवतांना आम्हांला 'घरीं' परत आल्यासारखें सुख वाटलें. संवयीनें घराची कल्पना बदलते; दुसरें काय? बोटींत आज २४ दिवसांत आम्हांला खालीं कॅबीन व वर डेक किंवा जेवणाचा दिवाणखाना यांशिवाय थारेपालट करण्यास चवथें ठिकाण नाहीं. खालून वर व वरून खालीं खेपा घालणें हीच करमणूक ! तरी पण उद्यां कॅबिन सोडून जातांना घर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सोडल्यासारखें वाईट वाटेल. सरकशींतले वाघ–सिंह मैदानांत उतरण्यापेक्षां परत पिंजऱ्यांत जातांना किती हौसेनें उडी मारतात–हें आपण पाहतोंच. तूर्त आमची गत पिंजऱ्यांतल्या पांढऱ्या उंदिरांसारखी झाली आहे. त्यांच्या पिंजऱ्याला आमच्या जहाजासारखेच दोन मजले असतात व आमच्या खालवरच्या येरझारांप्रमाणें तेहि वाटोळ्या रहाटावर असेच फिरून करमणूक करितात !

इंग्रज लोक मात्र जातील तेथें खरोखरीचें घर करतील. त्यांना कांहीं कमी नाहीं. पण त्यांना हें सुख बोटीविषयीं आपलेपणामुळें व एकजुटीमुळें वाटत असलें तरी त्यांच्या अंगांत हौसेचा जो वारा खेळत असतो तोहि यास कारणीभूत आहे ! आमच्या वांटणीचें म्हणजे पहिल्या क्लासचें डेक २०।२५ फूट रुंद व सुमारें सव्वाशें फूट लांब आहे. तेवढ्यांत पांचपन्नास ईझिचेअर्स, व वेताच्या खुर्च्या यांची गर्दी आहे. त्यांतच सुमारें पन्नास साठ स्त्रीपुरुष येरझारा घालीत असतात. त्यांतच मुलांच्या हात-गाड्या फिरतात. त्यांतच मुलांना झोंके घेण्याकरितां दोरीचा झोपाळा आहे. त्यांतच मुलें दोऱ्यांतून उड्या मारण्याचे खेळ खेळतात. त्यांतच मुलांचे लपंडावाचे खेळ चालतात. त्यांतच थोरांचे लगोऱ्याचे खेळ चालतात. त्यांतच बायका शतपावलीचा व्यायाम करीत असतात. त्यांतच कांहीं मोठे पुरुष मुलांप्रमाणें ओणव्याची रांग लावून कांहीं लांबून धांवत येऊन पाठीवर उड्या घालून स्वारांचा खेळ खेळतात. त्यांतच दोर लावून टग ऑफ वॉरचा खेळ चालतो. त्यांतच एका बाजूस सोडतीच्या तिकिटांचें दुकान मांडलेलें असतें. आणि त्यांतच आमच्यासारखे परके हिंदी लोक ओंठ मिटून खिशांत हात घालून, दुसऱ्यास लागेल म्हणून अंग चोरून, दिसण्यांत गंभीर तत्त्ववेत्याप्रमाणें. पण खरोखर अस्पृश्य सुतक्याप्रमाणें–बावळ्या-सारखे क्वचित् हिंडत असतात !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परवां रात्रीं या लोकांनीं डेकवर छोटीशी रंगभूमी सजवून विजेची रोषनाई करून खेळ व गाण्याचा जलसा केला. त्यांत सात आठ पुरुष व दोन बायका होत्या. सर्वजणांनीं चिनी लोकांचे पेहराव घातले होते. गाणें यथातथाच होतें; पण एका गोऱ्या खलाशाचें सोंग व मागाहून गलबतावरील कॅप्टनानें केलेले जादूचे चमत्कार प्रेक्षणीय होते. तसेंच आज रात्रीं 'किंग्स आफ्रिकन रायफल' नामक पलटणीच्या लोकांनीं खेळ केले.

आज दोन प्रहरीं धुकें बरेंच पडलें होतें व सावधगिरीचे कर्णे वाजत होते. संध्याकाळचे सुमारास खूप थंडी पडली; ती इतकी कीं, डेकवर जाववत नव्हतें. साडेसात वाजण्याचे सुमारास 'आईल ऑफ वाईट' नामक बेट व त्यावरील दीपगृह दिसूं लागलें. हेंच इंग्लंडचें प्रथमदर्शन म्हणावयाचें! लंडन येथें उद्यां सकाळीं दहा वाजतां पोचूं असें म्हणतात!

अभ्यास

१. यांतील उपमा व रूपकें निवडून सांगा.
२. 'इतर समुद्रांच्या खडबळीस स्त्रियांच्या दुःखभराची उपमा साजली तर या महासागराच्या या भारतीस पुरुषांच्या दुःखाची उपमा साजेल,' असें केळकर लिहितात. या स्त्रिया व पुरुष यांच्या दुःखांत भेद कोणता?
३. 'त्यांतच' या शब्दाच्या पुनरुक्तीचा मनावर काय परिणाम होतो?

स्वाध्याय

१. 'घरा' विषयींच्या वेगवेगळ्या कल्पना आहेत. तुम्हांला तुमची शाळा 'घर' वाटते का? कां नाहीं? किंवा कां वाटते?
२. तुम्हीं गोव्यास, कारवारास किंवा समुद्रकिनाऱ्यावरील कोणत्याहि एका गांवाहून दुसऱ्या गांवीं प्रवास केला असल्यास त्याचें किंवा एकाद्या प्रेक्षणीय स्थळाच्या प्रवासाचें वर्णन करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५

आत्मनिवेदन

.११. ज्ञानाचा वर्षाव !

अनुवादक
श्रीपाद सखाराम गोखले

कविवर्य डॉ. रवींद्रनाथ टागोर यांच्या 'जीवनस्मृती' या आत्मचरित्रात्मक पुस्तकांतील एका प्रकरणाचा बंगालींतून केलेला हा अनुवाद आहे.

आमच्या शाळेंतील एक शिक्षक आम्हांला घरीं शिकवावयाला येत असत. त्यांचें शरीर रोडकें होतें; नाकडोळे इत्यादींत चमक नव्हती; आवाजांत कठोरपणा होता. मूर्तिमंत वेताची छडी! सकाळीं सहापासून साडेनवांपर्यंत त्यांची वेळ ठरलेली होती. बंगाली वाङ्मयविषयक व शास्त्रीय क्रमिक पुस्तकें सोडून देऊन त्यांनीं आम्हांला 'मेघनादवध' हें महाकाव्य वाचावयास लाविलें. माझा तिसरा भाऊ आम्हांला निरनिराळ्या विषयांचें ज्ञान करून देण्यांत विशेष तत्पर असे. त्यामुळें आम्हांला शाळेंतील अभ्यासक्रमापेक्षां पुष्कळच अधिक घरीं शिकावें लागे. मोठ्या पहांटे निजून उठून, लंगोट घालून एका आंधळ्या पैलवानाबरोबर कुस्तीच्या एकदोन पकडी आम्हांला कराव्या लागत. त्या झाल्यावर लगेच मातीनें माखलेल्या अंगावरच डगलीं घालून भाषाविषय, गणित, भूगोल व इतिहास यांचा अभ्यास करण्यास आम्हीं सुरवात करीत असूं. शाळेंतून आम्हीं घरीं परत येतों तोंच चित्रकला शिकविणारे व कसरत शिकविणारे आमचे शिक्षक तयार असत. याच्यानंतर म्हणजे संध्याकाळीं आम्हांला इंग्रजी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिकविण्याकरितां अघोरबाबू येत असत. रात्रीं नवानंतर मात्र आम्ही अगदीं मोकळे होत असूं.

रविवारीं सकाळीं विष्णु आम्हांला गायन शिकवीत असे. तसेंच पदार्थ-विज्ञानांतील प्रयोग करून दाखविण्याकरितां सीतानाथ दत्त बहुतकरून प्रत्येक रविवारीं येत असत. त्यांनीं दाखविलेल्या प्रयोगांपैकीं एक मला फार आवडला. एका कांचेच्या भांड्यांत पाणी घालून त्यांत त्यांनीं लाकडांचा भुसा घातला व तें भांडें विस्तवावर ठेवलें. नंतर तापलेलें पाणी वर कसें आलें, गार पाणी खालीं कसें गेलें व हा क्रम चालतां चालतां पाणी कसें उकळूं लागलें हें सर्व जेव्हां त्यांनीं आम्हांला

कविवर्य टागोर

दाखविलें तेव्हां मला किती आश्चर्य वाटलें हें माझ्या चांगलें लक्ष्यांत आहे. दुधापासून पाणी वेगळें करतां येतें आणि दूध आटविलें म्हणजे दुधापासून पाणी निराळें होऊन त्याची वाफ बनते व दूध आटतें, इतकें अगडबंब ज्ञान मला त्या दिवशीं मिळाल्यावर मी बराच शेंफारून गेलों. सीतानाथ बाबू जर रविवारीं आले नाहींत तर रविवारचा दिवस रविवारासारखा वाटत नसे !

शरीरांतल्या हाडांसंबंधानें सर्व माहिती देण्याकरितांहि एक तास ठेविला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होता. ती माहिती आम्हांला समजावून सांगण्याकरितां कँबेल मेडिकल स्कूलमधील एक विद्यार्थी येत असे. तारांनीं हाडें बांधलेला सांगाडा आमच्या शिकण्याच्या खोलींत ठेवून दिला होता. आणि शेवटची गोष्ट म्हणजे हेरंबतत्त्वरत्नांनीं संस्कृत व्याकरणांतील नियम आमच्या तोंडपाठ करून घेण्याकरितांहि वेळ नेमून दिलेली होती. संस्कृत व्याकरणांतील सूत्रें घोकतांना तोंडाला अधिक श्रम पडतात, कीं, हाडांचीं नांवें पाठ करण्यास अधिक श्रम लागतात हें मला खात्रीपूर्वक सांगतां येत नाहीं. मला वाटतें व्याकरणांतील सूत्रें पहिला नंबर पटकावितील.

हे सर्व विषय बंगालीमधून शिकविण्यांत येत. त्यांच्यांत आमची बरीच प्रगति झाल्यावर आम्ही इंग्रजी शिकण्यास प्रारंभ केला. इंग्रजी शिकविण्याकरितां ठेवलेले शिक्षक अघोरबाबू हे स्वतः मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी असल्यामुळें आम्हांला शिकविण्याकरितां ते संध्याकाळचे येत असत. पुस्तकांतून आम्ही असें वाचतों, कीं, मनुष्यानें लाविलेल्या सर्व शोधांत विस्तवाचा शोध अत्यंत महत्त्वाचा होय. याबद्दल शंका घेण्याची माझी इच्छा नाहीं, परंतु लहान पक्ष्यांच्या आईबापांना संध्याकाळ झाली कीं, दिवे लावतां येत नाहींत हें त्या पिलांचें सुदैवच होय असें मला वाटल्याशिवाय राहत नाहीं. अगदीं उजाडतांच त्यांना भाषेचे पाठ मिळतात. आणि पक्ष्यांचीं पिलें आपले धडे किती आनंदानें शिकत असतात हें प्रत्येकानें पाहिलेंच असेल; पण एक गोष्ट मात्र आम्ही विसरतां कामा नये कीं, त्यांना कांहीं इंग्रजी भाषा शिकावयाची नसते, तर ते आपली मातृभाषाच शिकत असतात.

या आमच्या इंग्रजी शिक्षकाची शरीरप्रकृति इतकी सुदृढ होती कीं, त्याच्या तिन्ही विद्यार्थ्यांनीं कट करून निदान एक दिवस तरी त्यानें येऊं नये अशी उत्कट इच्छा प्रदर्शित केली असती तरी तें अशक्य होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एकदां मात्र थोडे दिवस त्याला येतां आलें नाहीं. मेडिकल कॉलेजमधील हिंदु व ख्रिस्ती विद्यार्थ्यांमध्यें एकदां मारामारी झाली; त्या मारामारींत त्याला कोणी खुर्ची फेंकून मार दिला, त्यामुळें त्याचें डोकें फुटलें. त्यामुळें त्याला शिकवावयास येतां आलें नाहीं. त्याच्यावर तें एक संकटच गुजरलें होतें.

बाळ रवींद्रनाथ

पण तें संकट आमच्यावर येऊन पडलें आहे असें आम्हांला वाटलें नाहीं. त्यांतून तो फार लवकर बरा झाला. आम्हांला इतकें मात्र वाटलें कीं, इतक्या लौकर बरें होण्याची याला काय आवश्यकता होती !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याच्या कारकीर्दीतील एका दिवसाची मला फार चांगली आठवण आहे. संध्याकाळ होऊन गेली होती. पावसाच्या सरीवर सरी कोसळत होत्या. आमच्या बोळांत गुडघ्याइतकें पाणी उभें राहिलें होतें. टांक्यांचें पाणी बागेंत शिरलें होतें. बेलाच्या झाडांचे झुबकेदार शेंडे पाण्यावर तरंगतांना दिसत होते. कदंबपुष्पांतून सुवास दरवळावा त्याप्रमाणें त्या आल्हादकारक पाऊस पडत असलेल्या संध्यासमयीं आम्हांला आनंदाच्या उकळ्या फुटूं लागल्या. आतां काय आणखी दोन तीन मिनिटेंच ! तेवढीं निघून गेलीं, कीं, आमच्या शिक्षकांची येण्याची वेळ गेलीच म्हणून समजावें. पण छे ! खात्री कोणी सांगावी ! दीनवाण्या चेहऱ्यानें बोळाकडे पहात तो आतां येईल मग येईल अशी सारखी त्याची वाट पहात आम्ही व्हरांड्यांत बसून राहिलों होतों. इतक्यांत एकदम आमच्या छातींत धडकी भरली, व आम्हांला मूर्च्छा येते कीं काय असें वाटूं लागलें ! ती पहा आमच्या परिचयाची काळी छत्री अशा पावसापाण्याला न जुमानतां त्या कोपऱ्यावरून इकडेच वळली. येणारी व्यक्ति आणखी कोणी तरी नसेल ना ? छे, दुसरी कोण असणार ? त्यांच्या तोडीचा दुराग्रही मनुष्य या जगांत आणखी कोठें तरी खास सांपडला असता, पण आमच्या त्या लहानशा बोळांत कोण मिळणार !

त्यांच्या कारकीर्दीचें सर्व बाजूंनीं परीक्षण केल्यास अघोरबाबू कडवा मनुष्य होता असें म्हणतां येणार नाहीं. त्यानें आम्हांला कडक रीतीनें कधींच वागविलें नाहीं. ते आम्हांला रागानें बोलत, पण त्यांनीं आमची खरडपट्टी कधींच काढिली नाहीं. असो. त्यांच्या अंगीं नावाजण्याजोगे कांहीं गुण असतील, पण त्यांची शिकविण्याची वेळ होती संध्याकाळची आणि शिकविण्याचा विषय पडला इंग्रजी ! शाळेंत सबंध दिवस त्रासांत काढून कंटाळून घरीं आलेल्या कोणच्याहि बंगाली मुलाला शिकविण्याकरितां सायंकाळीं प्रत्यक्ष देवदूत जरी प्राप्त झाला असता, व मिणमिण जळणारा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिवा लावून त्यानें त्याला इंग्लिश शिकविण्यास प्रारंभ केला असता तरी तो देवदूत नसून खराखुरा यमदूत आहे असेंच त्याला वाटलें असतें ! इंग्रजी भाषा अत्यंत मोहक आहे ही गोष्ट आमच्या मनावर ठसविण्याचा आमच्या शिक्षकानें एकदा किती आटोकाट प्रयत्न केला त्या गोष्टीची मला फार चांगली आठवण आहे. इंग्रजी भाषेचें चित्ताकर्षकत्व आमच्या मनावर बिंबविण्याच्या स्तुत्य हेतूनें, आम्हांला आनंद वाटेल अशा तऱ्हेनें, त्यानें एका इंग्रजी पुस्तकांतून आम्हांला कांहीं वाचून दाखविलें. तें गद्य कीं पद्य हें कांहीं आम्हांला समजलें नाहीं. परंतु आमच्या मनावर त्याचा भलताच परिणाम झाला. आम्ही इतके पोट धरधरून हंसलों, कीं, त्याला त्या दिवशीं आमचा वर्ग सोडून देणें भाग पडलें. आपण व्यर्थ त्या भानगडींत पडलों व आपल्या मताप्रमाणें आम्हां मुलांचीं मतें होणें ही कांहीं एकदोन दिवसांची गोष्ट नसून कित्येक वर्षें तो वाद मिटण्याजोगा नाहीं, ही गोष्ट त्याच्या लक्ष्यांत यावयास पाहिजे होती !

आमच्या शाळेंत शिकविले जाणारे सर्व विषय रुक्ष होते. म्हणून शाळेंतील नीरस रुक्ष विषयांचें आम्हांवर ज्ञानामृतसिंचन करून आम्हांला ताजेतवाने करण्याचा अघोरबाबू कधीं कधीं प्रयत्न करीत असत. एके दिवशीं त्यांनीं आपल्या खिशांतून कागदांत गुंडाळलेलें कांहीं बाहेर काढिलें आणि आज तुम्हांला विधात्याची एक चमत्कृति दाखवितों असें ते म्हणाले. वरचा कागद त्यांनीं सोडून टाकला, व त्यांतून मनुष्याचा मुखवटा बाहेर काढून त्यांतील आश्चर्यकारक इंद्रियरचना त्यांनीं आम्हांस समजावून सांगितली. त्यावेळीं माझ्या मनाला बसलेल्या धक्क्याची मला अजूनहि आठवण आहे. मनुष्याचें सर्व शरीरच बोलतें अशी माझी समजूत होती. बोलण्याची क्रिया अशी एकट्या दुकट्या इंद्रियाला स्वतंत्रपणें करतां येत असेल ही मला कल्पनाच नव्हती. एखाद्या अवयवाची रचना कितीहि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चमत्कार उत्पन्न करणारी असो ती सबंध मनुष्यापेक्षां कमी प्रतीची यांत मुळींच संशय नाहीं. हा विचार मनांत येण्यास त्या वेळीं इतके शब्द लागले, असें नव्हे; पण माझ्या मनाला खेद वाटण्याचें तें एक कारण होतें. दुसऱ्या एका वेळीं मेडिकल कॉलेजांतील प्रेतें फाडून पाहण्याच्या जागीं ते आम्हांला घेऊन गेले. एका वृद्ध बाईचें प्रेत टेबलावर ठेविलेलें होतें. तें पाहून मला विशेष कांहीं वाईट वाटलें नाहीं. पण जमिनीवर कापून टाकिलेली तंगडी पहातांच माझें भान नाहींसें झालें! छिन्नविच्छिन्न स्थितींत एखाद्या मनुष्याला पहाण्याचा प्रसंग मला इतका भयप्रद व इतका आचरटपणाचा वाटला कीं कित्येक दिवस तो सर्व देखावा, ती कृष्णवर्ण अर्थशून्य तंगडी माझ्या नजरेसमोरून हालली नाहीं!

'प्यारी सरकार'चें पहिलें व दुसरें पुस्तक वाचल्यानंतर आम्ही 'मॅक्कुलो'चीं पुस्तकें शिकूं लागलों. सायंकाळीं आमचीं शरीरें थकलेलीं असत. घरामध्यें जाण्याला आमचीं मनें उत्सुक झालेलीं असत. शिकण्याचें पुस्तक कसें होतें म्हणाल तर काळ्या पुठ्याचें व कठीण शब्दांनीं खच्चून भरलेलें. त्याच्यांतील विषय तर विचारूंच नका; नीरसतेची कमाल होती! याचें कारण असें होतें, कीं, त्या कालीं विद्यादेवी श्रीसरस्वती हिनें आपला मधुर मातृभाव व्यक्त केला नव्हता! आतांप्रमाणें तेव्हां मुलांचीं पुस्तकें सचित्र नसत; शिवाय प्रत्येक धड्याच्या चौकीवर शब्दांच्या द्वारपालांच्या रांगा, निरनिराळे तोडलेले शब्दावयव (syllables) आणि स्वराघात (accents) यांच्या उभ्या, आडव्या खुणांच्या संगिनी खांद्यावर टाकून मुलांना अडविण्याकरितां मार्गावर उभ्या राहात असत. त्यांच्या रांगांवर मी एकामागून एक हल्ले चढवीं पण व्यर्थ! आमचे शिक्षक दुसऱ्या एकाद्या हुशार विद्यार्थ्याच्या पराक्रमाचें उदाहरण देऊन आम्हांला लाजवीत! आम्हांला मनांत विषाद वाटे, आमचें मन खट्टू होई, त्या हुशार विद्यार्थ्यासंबंधीं आमचें मन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

कलुषित होई; पण इतकें होऊन उपयोग काय! त्या काळ्या पुठ्ठयाच्या पुस्तकाचें वैषम्य मात्र आमच्या मनांतून हद्दपार होत नसे!

मानवजातीबद्दल अनुकंपा वाटून, जगांतील सर्व कंटाळवाण्या गोष्टींमध्यें विधात्यानें गुंगीचें औषध घालून ठेविलेलें आहे. आमचे इंग्रजी धडे सुरू होतांच आम्ही पेंगूं लागूं. डोळ्यांना पाणी लावणें, व्हरांड्याच्या भोंवतीं जरा धावून येणें हा त्यावर उतारा होता; व त्यानें चढलेला अम्मल क्षणिक कमी होई इतकेंच. पुनः येरे माझ्या मागल्या आहेच! एखाद्या वेळीं सहजगत्या आमचा सर्वांत वडील भाऊ त्या रस्त्यानें जात असतां निद्राकुल असे आम्ही त्याच्या दृष्टीस पडलों, तर, 'आतां पुरे' असें म्हणून तो आमची सुटका करीत असे. आम्हांला मोकळें सोडून दिल्यावर मग काय! आमची झोंप त्यापुढें एक पळभरहि टिकत नसे!

अभ्यास

१. या धड्याला "ज्ञानाचा वर्षाव" असें नांव कां दिलें?

२. या धड्यांतील विनोदस्थळें शोधून काढा.

३. यांतील कांहीं खोंचदार वाक्यें सांगा.

स्वाध्याय

१. तुम्हांला, 'फिजिक्स,' 'केमिस्ट्री,' 'फिजिऑलॉजी व हायजीन्' हे विषय इंग्रजींतून शिकणें आवडेल कीं मराठींतून? कां?

२. "त्या कालीं विद्यादेवी श्रीसरस्वती हिनें आपला मधुर मातृभाव व्यक्त केला नव्हता" या वाक्याचा खुलासा करा.

३. टागोरांना लहानपणीं ज्या प्रकारानें शिकविलें जात होतें त्याविषयीं तुम्हांला काय वाटतें?

४. यांतील कांहीं वेंचक शब्दचित्रें निवडून काढा.

पुरवणी वाचन

प्रौ. के. कर्वेकृत 'आत्मवृत्त,' श्री. रमाबाई रानडेकृत 'माझ्या आयुष्यांतील आठवणी'; लक्ष्मीबाई टिळककृत 'स्मृतिचित्रें.'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

.१२. माझा पहिला बळी

अनुवादक
आनंदराव सखाराम बर्वे

कॅप्टन मेडोज टेलर याच्या 'कन्फेशन्स ऑफ ए ठग' या इंग्रजी पुस्तका-वरून 'ठगाची जबानी' नांवाचें पुस्तक मराठींत आनंदराव सखाराम बर्वे यांनीं पुष्कळ वर्षांपूर्वी तयार केलें. त्यांतून हा उतारा घेतला आहे.

तो सावकार माझा बळी असल्याबद्दल मंडळींत सर्वांस ठाऊक झालें होतें; ह्यामुळें त्या माझ्या पहिल्या प्रसंगाविषयीं माझ्या मनांत काय काय विचार घोळत होते ते पाहण्याकरितां माझ्या भोंवतालीं पुष्कळ गर्दी होई. माझ्या मनांत उत्साह जागृत व्हावा म्हणून सारे जण मला हुशारीच्या गोष्टी सांगत. तेणेंकरून माझ्या जिवाला पुष्कळ भरंवसा आला. खचित हें मला कबूल केलें पाहिजे कीं, जसजसा वेळ जवळ जवळ येऊं लागला सततशी अधिकाधिक माझ्या जिवाची तळमळ होऊं लागली. जसा एकादा ज्वान शिपाई लढण्याचा प्रथम प्रसंग आला आसतां समरांगणांत आपली तरवार उपसण्यास अत्यंत उतावीळ होऊन जातो त्याप्रमाणें माझी अवस्था झाली पाहा. माझी ती मुद्रा पाहून माझ्या बापाच्या जिवाला अंतर्यामीं मोठें समाधान झालें. तो तोंडानें कांहींएक बोलला नाहीं; पण जेव्हां त्यानें मोठ्या प्रीतीनें मजकडे पाहिलें, तेव्हां तो अंतर्गत आनंद त्याच्या मुखचर्येवर स्पष्ट दिसत होता. तें पाहून आतां आपण याची निराशा करूं नये असें माझें मलाच वाटूं लागलें. हा प्रसंग कांहीं विशेष महत्त्वाचा आहे असें सर्व मंडळीस वाटलें होतें, असें त्यांच्या कृतीवरून भासूं लागलें. कारण जरी कोणाची योजना कोणत्या कामीं आहे हें एकूण एकास पक्कें माहीत होतें, तरी ते सर्व एकत्र जमून पुष्कळ रात्रपर्यंत विचार व मिसलती करीत बसले होते. तथापिहि शेवटीं हातघाईचा समय येऊन बेतण्यापूर्वी थोडीबहुत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विश्रांति घ्यावी म्हणून एकामागून एक उठून गेले. माझा बाप, हुसेन वगैरे सर्व जाऊन निजले. मी एकटा मात्र गेलों नाहीं. आमचा लहानसा डेरा होता. त्याच्या बाहेरच्या बाजूस मी बसून राहिलों होतों. इतक्यांत रूपसिंग मजपाशीं आला.

तो जवळ येऊन बसला आणि म्हणाला, " बाबा, कसें काय ? तुझें चित्त स्वस्थ आहेना ? तुझ्या मनाला भय तर नाहीं ना वाटूं लागलें ? नाडी थंड वाहात आहे ना ?"

म्यां उत्तर दिलें, " कांहीं नाहीं, सर्व यथास्थित आहे; आतां माझ्या मनाचा कधींहि बदल होणार नाहीं. पाहिजे तर पाहा माझी नाडी कशी तीव्र चालते ती."

म्हातारा माझा हात पाहून म्हणाला, " नाडी ठीक आहे. चांगली थंड चालली आहे. चंचलता किंचितहि नाहीं. असेंच पाहिजे. पहिल्या प्रसंगासाठीं तयारी करतांना आजपर्यंत म्यां पुष्कळांना पाहिलें, परंतु तुझ्यासारखी शांत वृत्ति हा वेळपर्यंत कोणाचीच माझ्या दृष्टीस पडली नाहीं. परंतु हें कशाचें फळ ! विधिपूर्वक जे तुझे म्यां अनेक संस्कार केले त्यांचा व माझ्या मंत्राचा हा सारा प्रभाव होय, समजलास !"

म्यां म्हटलें, " असेल, पण त्या मंत्रतंत्रांखेरीज देखील माझी स्थिति अशीच असती."

" पहा, पुन्हां गर्विष्ठ ! बेटा ! भवानी तुझ्या अहंपणाची तुला क्षमा करो. माझ्या मंत्रांचें सामर्थ्य किती आहे हें तुला ठाऊक नाहीं. एका वेळीं मला जितका अभिमान झाला तसा कोणालाहि कधीं झाला नसेल. एक तर माझा जन्म मोठ्या कुलीन रजपूत घराण्यांत, दुसरें लहानपणापासून वाघासारखीं कित्येक रानटी जनावरें म्यां स्वहस्तें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मारलेलीं व अनेक मारण्याच्या कामीं इतरांस मदत केलेली. पण जेव्हां मजला माणूस दाखवून त्याचा नाश करण्यासाठीं रुमाल माझ्या हातीं दिला, तेव्हां खरोखर मी घाबरून कांपूं लागलों, व पुढें पुष्कळ दिवस-पावेंतों माणसांवर हात चालविण्याची मला छाती होईना. असो. पण अजून एक विधि तुला करणें राहिला आहे. कांहीं होवो पण तो झालाच पाहिजे; राहतां कामा नये. आपल्या बापाला, हुसेनाला, आणि बद्रिना-थाला बोलावून आण. तेहि सन्निध असले पाहिजेत."

त्या प्रमाणें तात्काळ सर्वजण जमले. आम्हां सर्वांस घेऊन माझा गुरू जवळच्या एका शेतांत गेला. तेथें उभा राहून ज्या मोठ्या मार्गानें आमचा कूच होणार होता त्या दिशेकडे त्यानें तोंड केलें आणि मोठ्या भावानें उंच हात करून देवीची प्रार्थना केली. तो म्हणाला, "हे काली! हे महाकाली! जर आम्हांबरोबर आलेल्या त्या सावकाराचा ह्या तुझ्या नूतन दासाच्या हातून खचित् काळ होणार असला तर तुझा कौल आम्हांला तूं 'थिबाऊ' शकुनानें दे."

ह्याप्रमाणें त्यानें प्रार्थना केल्यानंतर आम्हीं सर्वजण मुकाट्यानें स्वस्थ उभे राहिलों. आणि काय चमत्कार आपल्याला सांगूं! त्या तशा अपरात्रीस कीं हो आमच्या उजव्या बाजूला गाढव ओरडलें! माझ्या गुरूला आनंदाचा खरोखर उमाळा आला. तो मोठ्यानें ओरडून म्हणाला, "पाहा, ह्याप्रमाणें आपल्या दासाचा देवीनें पूर्ण स्वीकार केलेला तुम्ही पूर्वीं कधीं तरी पाहिला होता काय? प्रार्थना आटोपली नाहीं तोंच शकून!"

माझा बाप दीर्घ स्वरानें म्हणाला, "शूकर अल्ला! देवा तुझे थोर उपकार! आज तर सर्व परिपूर्ण झालें. रूपसिंगजी, आतां रुमालाला गांठ मारून देण्याचें मात्र तुमचें काम शेष राहिलें आहे. तेवढी गांठ मारून द्या एकदां म्हणजे झालें."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुरुजी म्हणाले, " आतां परत गेलों म्हणजे मी तें करीन. "

त्याप्रमाणें आम्हीं परत गोटांत गेल्यावर त्यांनीं मजपासून माझा रुमाल मागून घेतला. त्याजला पूर्वीं गांठ मारलेली होती ती सोडून पुनः नवीन चांदीचा तुकडा बांधून गांठ मारली. नंतर त्यांनीं तो रुमाल माझ्या हातीं दिला. रुमाल माझ्या हातीं देतांना ते म्हणाले,—

" घे तूं आतां हें पवित्र शस्त्र. संभाळ, याजवर तूं आपला संपूर्ण भाव ठेव. तुझ्या इच्छेनुरूप सर्व काम करण्याविषयीं देवीच्या पवित्र नांवानें मी ह्यास आज्ञा करितों. "

म्यां तो उभ्या हातानें घेतला; आणि तो हरवूं नये, व वेळेवर झटकन् काढितां यावा म्हणून जपून तो आपल्या कंबरेस बांधून ठेविला आणि नंतर अंमळ बोलत बसलों. पण लागलेंच क्षणभरानें थोडीबहुत झोंप घेण्यासाठीं आम्हीं सतरंज्या टाकून निजलों. कांहीं अवकाशानें शहरांत सावकाराच्या तैनातीस पाठविलेल्या माणसांपैकीं एकजण येऊन सांगूं लागला कीं, 'शेटजींनीं निघण्याची तयारी करून आपल्यास सूचना करण्यासाठीं मला पाठविलें आहे.' तत्काळ सर्व मंडळीला उठवून जनावरांवर सामानसुमान लादलें आणि सर्व तयारी करून आम्हीं रस्त्यावर सावकाराची वाट पाहात उभे राहिलों. त्याला येण्यास फारसा उशीर लागला नाहीं. तो येऊन पोहोंचतांच सर्व मंडळी पुढें चालू झाली. त्या रात्रीची शोभा फार वर्णनीय होती व रस्ताहि बहुत नामी, ह्यामुळें आम्हीं मोठ्या मस्तीनें चाललों होतों. त्या प्रसंगीं जी लूट आमच्या हातीं लागणार होती तिच्या स्वरूपावरून, व आरंभापासून तें काम व्यवस्थित रीतीनें शेवटपर्यंत पार पाडण्याकरितां जें चातुर्य व धूर्तता खर्च करावी लागली त्याच्या मानानें पाहतां अन्य साधारण प्रसंगांहून तो प्रसंग भारी खराच;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आमच्या सर्व मंडळीस मोठ्या फुशारीनें वर्णन करण्याजोगा; त्याच्यायोगानें सर्व देशांत साधारणत: व विशेषेंकरून हिंदुस्थानांत ज्या असंख्य ठगांच्या टोळ्या होत्या त्यांत, व त्याहूनहि सालअखेरीस ज्यांस आम्हीं जाऊन मिळणार होतों त्यांत, बरीच गडबड होण्यासारखी होती. सारांश, तो प्रसंग मोठा खराच.

आम्ही सुमारें दोन कोस गेलों, इतक्यांत पुढें वाट काढणारी मंडळी होती, त्यांच्यांत कांहीं गडबड होऊन एकजण सरळ आम्हीं होतों त्या ठिकाणीं आला. पूर्वीं पुढें जे लोक पाठविले होते त्यांपैकींच तो होता; माझ्या बापानें त्यास ओळखिलें, आणि मोठ्या उत्सुकतेनें पुसलें, "भला मांजे ?" (खाडे खणून तयार केले ?)

त्या माणसानें उत्तर दिलें, "मांजे." (सर्व सिद्धता आहे.) त्या आपल्यास पलीकडील टेकड्या दिसल्या काय ? मी पूर्वीं सांगितल्याप्रमाणें त्यांतून एक नाला वाहात आहे. जमादारसाहेब, अशी भीळ तर आमच्या हातून पूर्वीं कधींच बनली नसेल. आपण पाहिल्यावर तारीफ कराल."

माझ्या बापानें पुसलें, "येथून किती दूर आहे ?"

तो माणूस म्हणाला, "सरासरी अर्धा कोस. येथून आपण अंमळ पुढें गेलों म्हणजे तेथपासून रस्ता खडकाळ लागतो, तो थेट त्या खिंडीच्या तोंडाशीं जाईपावेतों; हेंच संधान पाहून आपला बेतबात करावा." इतकें बोलून तो इतर मंडळींत जाऊन मिसळला.

नंतर सर्वांस आपल्या नेमलेल्या जागा धरून राहण्याविषयीं संकेतानें सुचविलें. त्याप्रमाणें सर्वजण फुटून जो ज्याचा भाग नेमिला त्याच्या तो सन्निध जाऊन तयारींत राहिला. एकएकटा पुरण्यासारखा होता तेथें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक एक, व दोघे दोघे लागण्यासारखे होते तेथें दोघे दोघे, असे जरूरीप्रमाणें जाऊन उभे ठाकले. संकेताप्रमाणें रस्त्याच्या अडचणीचें निमित्त काढून सावकाराचे बैल त्याच्या गाडीपाशींच आणिले, कारण त्याचीं सर्व माणसें एका ठिकाणीं असल्यानें त्यांस एकदम हस्तगत करण्यास ठीक. ही सर्व तयारी पाहून म्यांहि आपली सिद्धता केली. आणि कंबरेचा रुमाल सोडून हातांत नीट बेतानें सांवरून धरिला व आतां इशारा होईल, क्षणानें इशारा होईल, म्हणून अगदीं वाट पाहात राहिलों. तरी आम्ही हळुहळू पुढें चालत होतों, कारण रस्ता अगदीं चिंचोळा असून दोहोंबाजूंनीं कांटेरी झाडी असल्यामुळें आधींच सावकाश जपून चालावें लागे, व त्यांत पुढील मंडळी तर मुद्दामच हळुहळू पावलें टाकीत; तेणेंकरून ज्याला त्याला आपापल्या योजिलेल्या स्थळीं नीट तयारीनें राहण्यास मोठें सुलभ पडलें. आतां नेमिलेल्या स्थळीं जाऊन पोहोंचूं असें क्षणोक्षणीं सर्वांस वाटे, म्हणून जो तो आपापल्याकडून हुशारीनें राही.

जसजसे आम्ही त्या टेकड्यांजवळ गेलों तसतसें जंगल अधिक अधिक दाट लागूं लागलें; आणि चांदणें पडलें होतें त्याच्यायोगानें तर तें वास्तविक असे त्यापेक्षां दुप्पट दाट दिसे. आम्हीं कित्येक ठिकाणें अशीं टाकलीं कीं, मला वाटे कीं येथेंच हें कृत्य उरकणें उत्तम. पण त्यांत माझी नजर बरोबर चालली नाहीं असें मागाहून माझ्या लक्षांत आलें. कारण आमच्या लध्यांनीं जें ठिकाण मुक्रर केलें होतें तें तर फारच नांवाजण्यासारिखें होतें. पुढून एकजण येऊन माझ्या बापाच्या कानांत कांहीं सांगून परत गेला. तें पाहून माझें चित्त फार व्यग्र झालें. एक लहानसा खोलवटा ओलांडून एका उंचवट्याच्या माथ्यावर चढलों, आणि खालीं नजर फेंकतांच मला वाटलें कीं नेमलेली जागा खास हीच. खालीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक लहानसा ओहोळ वाहात होता; दोन्ही बाजूंच्या कडा फार उंच असून त्यांचे धस अगदीं उभे तुटलेले; लहान लहान खुरटी झाडी पराकाष्ठेची दाट लागून गेली होती, व तींतून वेली गुरफटल्यानें संपूर्ण एक मोठें मजबूत भोंकच होऊन राहिलें होतें. ओहोळाचें पात्रहि फार अरुंद. त्यामुळें दोहोंबाजूंच्या उंच धसांवरून जीं मोठमोठालीं झाडें होतीं त्यांच्या खांद्यांचा विस्तार साऱ्या पात्रावर पसरून दोहोंकडील झाडांच्या खांद्या परस्परांत अशा निकट मिळून गेल्या होत्या कीं, तें एक मोठें विस्तीर्ण व दाट छतच लावून दिलें आहे कीं काय, असा भास होई. तळाशीं पाण्याचा प्रवाह अगदीं बारीक दिसे. त्याजवर चंद्राचे किरण वरील पल्लवमय छताचा लक्षावधि ठिकाणीं भेद करून जाऊन पडले होते, त्यांच्या प्रकाशानें तो प्रवाह वर उभें राहून पाहणाराच्या दृष्टीस, खालीं कोणी स्वच्छ रजतवर्ण दिव्य भुजंग तें शांत स्थळ पाहून स्वस्थचित्त होत्साता आनंदानें यथेच्छ शीत वायुभक्षणाच्या सुखाचा अनुभव घेत पडून राहिला आहे अशीच भ्रांति उत्पन्न करी. म्यां मनांत म्हटलें, "अरे येथें शेंकडो चोरटे पाहिजे तरी गुप्तवास करूं शकतील. ह्या स्थळीं प्रवासी लोकांवर हात टाकणें काय अगदींच सोपें! येथें कितीहि प्रवाशांचा प्राण हरण केला म्हणून त्यांचा मागमूस तरी कधीं कोणास लागणार आहे काय?" ह्याप्रमाणें मी कल्पनेच्या राहाटींत पडलों. इतक्यांत माझा बाप मोठ्यानें "हुशारी" म्हणून ओरडला. तेणेंकरून जसा कोणी निजलेला मनुष्य एकदम जागृत व्हावा त्याप्रमाणें माझ्या चित्तवृत्ति ठिकाणीं आल्या. सर्वांस तयार राहण्याविषयींच्या सूचनेचा तो इशारा होता. माझा बाप सावकाराच्या गाडीपाशीं जाऊन म्हणाला, "आपण ह्या ओहोळावर येऊन पोहोंचलों. हा धस उभा तुटलेला असल्यामुळें उतरण फार कठीण, बिकट आहे, आणि दगडहि पुष्कळ आहेत. यास्तव आपण खालीं उतराल तर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बरें पडेल. निदान एवढा ओहोळ उतरून पलीकडे जाईपर्यंत तरी आपण पायीं चालण्याचें करावें; मग पुढें खडकाळ रस्ता संपेपर्यंत नाहीं तर नाहीं." सावकारानें ती गोष्ट ऐकली आणि तो लागलाच गाडींतून खालीं उतरला. पहिल्यानें आपली गाडी सुरक्षितपणें पार उतरून गेली असें पाहून मागाहून आपण निघाला.

साहेब, तें सर्व माझ्या डोळ्यांपुढें आतां मूर्तिमंत उभें राहिलेलें दिसत आहे. ते बैल, त्यांचे ते हांकणारे, त्यांजबरोबर ते आमच्या मंडळींतील ठग, मिळून सगळा त्या ओहोळाच्या पात्रांत एकच घोटाळा होऊन गेला आहे; त्या दगडांतून बैलास चालविण्याकरितां ते हांकणारे मोठमोठ्यानें ओरडून हांकीत आहेत; त्या प्रत्येक माणसाच्या निकट एक एक दोन दोन ठग संकेताच्या खुणेकडे कान लावून उभे आहेत. हा सर्व प्रकार आम्हीं उभे होतों त्याच्या खालीं अगदीं थोड्या हातांच्या अंतरावर. तो ओहोळ इतका सांकडा कीं, जेव्हां सावकाराची गाडी अगदीं तळाशीं पोहोंचली तेव्हां सर्व माणसें त्यांत मावतना.

इकडे वरतीं माझा बाप, हुसेन, मी, तो सावकार, त्याचा एक चाकर, आणखी कांहीं ठग मंडळी उभी, म्यां माझा तो घातक रुमाल काढून आपल्या हातांत मजबूत धरला, माझा बळी मजपाशीं फार तर दीड वितीच्या अंतरावर. त्याच्या एका अंगास उभें राहून त्याजवर हात टाकण्यापेक्षां पाठीमागून टाकणें चांगलेंसें वाटल्यावरून मी मागें सरून त्याच्या पाठीशीं झालों. इतक्यांत पाहिलें तों दुसरा एक ठगहि त्या चाकराच्या मागें आला. सावकारानें एक दोन पावलें पुढें टाकलीं. म्यां त्याची पाठ सोडिली नाहीं. तरी माझें लक्ष त्याजकडे इतकें लागलें होतें कीं, माझें पाऊल हालत आहे कीं काय ह्याचेंहि मला भान नव्हतें. "जय काळी" म्हणून एकदम मोठ्यानें माझा बाप ओरडला. तीच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संकेताची खूण होती; तो ध्वनि कानीं पडतांच म्यां आपलें काम उरकलें !

अभ्यास

१. ठग हा शब्द एका संस्कृत शब्दावरून झाला आहे. हा शब्द कोणता? कोशांत शोधून पहा.

२. यांतील कोणकोणत्या ओळी काव्यमय आहेत?

३. यांतील उत्कटता व क्षोभ उत्पन्न करणारे प्रसंग कोणते?

४. या गोष्टीच्या आधारें चित्रपट (फिल्म) तयार करतां येईल का? करतां येण्यासारखा असल्यास कां?

५. यांतील कोणकोणत्या पात्रांबद्दल तुम्हांला काय वाटतें?

६. या लेखांतील 'म्यां, मजला' असे जुने प्रयोग व सध्यां वापरांत नसलेले धस (बाजू), लघे (खड्डे खोदणारे), भीळ (खड्डा), भाग, राहटी यांसारखे शब्द शोधून त्यांचे अर्थ करा.

स्वाध्याय

१. क्षणभर कल्पना करा कीं, तुमचे वडील एक नामांकित पहेलवान आहेत. त्यांनीं पुष्कळ कुस्त्या जिंकलेल्या आहेत. त्यांना तुम्हींहि नामांकित पहेलवान व्हावें व गांवोगांवच्या मल्लांशीं झुंज देऊन विजयी व्हावें असें वाटतें. आणि त्या दृष्टीनें एके दिवशीं आखाड्यांत नेऊन ते तुम्हांला वस्तादाकडून पहिला धडा देतात. पुढें तुम्हीं कुस्तींतील अनेक पेंच शिकतां व जाहीर रीतीनें कुस्ती मारण्याचा प्रसंग केव्हां येईल याची उत्कटतेनें वाट पहात रहातां; इतक्यांत तसा एक प्रसंग येतो, आणि लंगोट कसून, शड्डू ठोकून, 'जय बलभीम' अशी आरोळी ठोकून तुम्ही आखाड्यांत उभे राहतां. तुमची कुस्ती जुंपते. या तुमच्या पहिल्या कुस्तीचें वर्णन करा.

पुरवणीवाचन

ठगाची जबानी. अनाथ पांडुरंग.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६

पेशवाईच्या अखेरच्या काळांतील गद्याचा नमुना

१३. स्वामिनिष्ठ सेवक

मल्हार रामराव चिटणीस

पेशवाईच्या अखेरच्या काळांत लेखनकौशल्याबद्दल विशेष प्रसिद्ध असलेल्या लेखकांत मल्हार रामराव चिटणीस हे प्रमुख होत. यांनीं लिहिलेल्या थोरले राजाराम महाराज यांच्या चरित्रांतून हा उतारा घेतला आहे. या उताऱ्यांतला प्रसंग तुमच्या इतिहासाच्या पुस्तकांत यापूर्वीं तुम्हीं वाचलाच आहे.

सर्व देशांत पादशाहाची फौज फिरूं लागली. राज्य व्यापिलें. पन्हाळ्यास वेढा घाळून विशाळगड रांगण्याकडे फौजा धावल्या. तेव्हां बहूत विचार दुर्घट प्राप्त जाला. सहा चार महिने दम खाऊन फौज मसलत बळावत नाहीं. एखादे किलियावर राहून किल्ला भांडवून दम खावा म्हणतांहि किल्लेबंद झालें असतां परिणाम नाहीं. एखादे ठायीं बाहेर असतां दगा झाला [तर] तेंहि ठीक नाहीं. त्याअर्थीं कबिले एखादे किल्ल्यावरि ठेवून जमाव येथून फोडावा. जिकडील तिकडे वारापाणी करून गेले, फुटले, ऐसें करून सर्वांनीं ज्यांस जसें कळेल तसे दहापांच एकटेदुकटे ऐसें करून मोंगलाईंत रोजगारास जातों ऐसें करून, पागा घोडे जसें निभावेल तें करून, चंदीस येऊन पोहोंचावें. आपण सडे होऊन पांच पंचवीस मुत्सद्दी सरदार ऐसे वेष बदळून, जंगम, लिंगाईत,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कापडी यांचे वेष घेऊन चंदीस जाऊन पोंचावें. कबिल्यापाशीं रामचंद्र निळकंठ यांणीं या प्रांतीं राहून, आम्ही तिकडे गेलीयावरि कबिलेहि युक्तीनें काढून पोहोंचवावे, रायगडचीहि बातमी वरचेवर राखून, तीहि काढून आणून तिकडे युक्तीनें शिवाजीराजे कबिले पोहोंचतसे करून, आपण याच प्रांतीं राहून संस्थानें जतन होतील तीं करून, पुढें जसा विचार सुचेल तसें करावें, म्हणोन सांगोन ठेविले. आणि चंदीस निळोपंत प्रधान व हरजी महाडीक पूर्वीं संभाजी महाराज यांनीं पाठविले होते त्यांत इकडील सर्व वर्तमान लिहून, "तुम्हीं त्या प्रांतीं फौज व जमियत व स्थानें बहूत बहूत खबरदारीनें रक्षावींत, कायम असावें, तों आम्हींहि हरतऱ्हेनें तुम्हांपाशीं येऊन पावतों." ऐशीं पत्रें लिहून व शाहाणीं माणसें इतबारी यांजबरोबर सांगोन पाठविलें. आणि मुत्सद्दी व सरदार यांचे सर्वांचे मसलतीनें ठराव केला. लांबचा पल्ला निभावून गेलें पाहिजे म्हणोन गौप्यरूपें जावें. त्याजवरून संताजी घोरपडे व धनाजी जाधवराव व खंडेराव दाभाडे व प्रल्हाद निराजी व खंडो बल्लाळ चिटणीस ऐसे [यांनीं] महाराजसुद्धां लिंगाईत वाण्याचे वेष धारण केले. आणखीहि कोणी सरदार मातबर यांस वेष देऊन सर्वांनीं एक मार्गें जावें हें ठीक नाहीं, घोळका न दिसावा म्हणोन निराळे निराळे लावून दिल्हे. आणि गोकर्णावरून सौंध्यावरून श्रीव्यंकटेशावरून बेंगरुळावरून जावें (असें ठरविलें.) सोबत लोक आणखी निघाले. ते बेंगरूळपर्यंत जाऊन पावले.

तेथें महाराजांचे पाय धुतां पाणी पायांवर घातलें. एक सेवक पाणी घालतो, एक पाय धुतो, एक पुसतो, हें तेथील लोकांनीं पाहिल्यावरि कानडे भाषेनें चर्चा केली कीं, "हे कापडी दिसतात, परंतु पायांवरि पाणी घालून पाय धुवून घेणार, तेव्हां कोणी मातब्बर आहे," असें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपल्या भाषेनें बोलतां यांतहि कोणी भाषा जाणणार होते त्यांणीं ऐकिलें. कानडे निघोन कोटांत गेले. तेथें ठाणें औरंगजेबाचें बसलें होतें. तेव्हां बोलणें समजणारांनीं सांगितलें. यावरून बहूतच दुर्घट प्रसंग पडला जे, परिणाम ठीक दिसत नाहीं. कसें करावें? म्हणतां विचार करितां खंडो बल्लाळ चिटणीस यांणीं सांगितलें कीं, "घाबरे न होतां महाराज व संताजी घोरपडे व जाधवराव व दाभाडे यांनीं एक मार्गें जावें. निघावें. आम्ही आमचे दोन चार असामी आहेत ते घेऊन येथें राहतों. चौकशी पडली असतां कजाखी करून नांवें न सांगता सुटून येऊन प्रल्हाद निराजी यांणीं अमके स्थळीं दम खावा तेथें पोहोंचूं. न घडल्यासहि कोठें तरी जाऊन गांठूं. सर्वांनींच गेलें असतां मागून धांवणें येईल." म्हणून काढून दिले.

ते गेलियावर कानडे यांणीं कोटांत वर्तमान सांगितलें. हे स्वयंपाक करून जेवितात तो चौकी आली. यांस धरून नेलें. कोण म्हणून विचारिलें. "कापडी, यात्रेकरू, श्रीरामेश्वरीं जातों. दहा पांच आणखी होते ते जिकडे जाणार तिकडे गेले. आम्हां दुसरीकडे जाणें म्हणोन राहिलों," सांगितलें असतां त्यास मारहाण करूं लागले. डोईवर दगड दिले. चाबूक मारिले. परंतु कापडीच म्हणोन सांगितलें. शेवट राखेचा तोबरा दिला असतांहि आम्ही स्वच्छ यात्रेकरू म्हणोन पृथक् पृथक् माराहाण करून विचारीत असतांहि सर्वांचें बोलणें सारखेंच. तेव्हां कचेरींत चौकशी करणार बोलले कीं, "यात्रेकरू हे खरेच. तसेच असते तरी इतके मारापुढें बोलते. यात्रेकरू यांस पीडा करणें ठीक नाहीं." तीन चार दिवस कैदेंत ठेविलें. तीन उपोषणें झालीं. यांणीं "आम्ही यात्रेकरू बंदांतून सुटल्यावांचून अन्नग्रहण करीत नाहीं," ऐसे आग्रह धरून बसल्यावरी सोडून दिले. ते संकेताप्रमाणें तेथें जाऊन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रल्हाद निराजी वगैरे एक जागां जाहले. आणि पुढें गेले. महाराजहि चंदीनजीक जाऊन पोहोंचले. तेथें यांणीं सर्वांनीं जाऊन गांठिलें.

स्वा ध्या य

१. तुम्हांला यांतील अपरिचित वाटणारीं शब्दांचीं रूपें निवडा.

२. जंगम, लिंगाईत, कापडी हे कोण ? माहिती द्या.

३. या सबंध उताऱ्याचें चालू मराठी भाषेंत रूपांतर करा.

४. सध्यां रूढ नसलेले, पण यांत कोणते शब्द तुमच्या लेखनांत वापरणें तुम्हांला आवडेल ?



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७

चरित्रात्मक

१४. गोपाळराव गोखले

बाळ गंगाधर टिळक

आपल्या देशाचे एक थोर पुढारी नामदार गोपाळ कृष्ण गोखले, १९१५ सालीं एकाएकीं व अकालीं निवर्तले. त्यामुळें सर्व देशाला अतिशय दुःख वाटलें. याप्रसंगीं लोकमान्य टिळक यांनीं आपल्या 'केसरी' पत्रांतून त्यांच्या-संबंधीं जो गुणवर्णनपर लेख लिहिला, त्यांतील निवडक भाग येथें दिला आहे. टिळकांचें लिहिणें नेहमीं स्पष्ट व सडेतोड असे. भाषा मुद्दाम म्हणून ते कधीं सजवीत नसत. विचारांच्या ओघाबरोबर जी भाषा बाहेर पडेल ती. पण ती भाषा मात्र अशी कीं, तिनें अंतःकरणाचा ठावच घ्यावा. प्रत्येक वाक्य अर्थपूर्ण असावयाचें. त्यांत वायफळ एक शब्दहि लिहिला जावयाचा नाहीं. प्रस्तुत लेखच घ्या. किती स्पष्ट व जोरदार आहे मांडणी ! गोखल्यांनीं आपल्या आयुष्यांत केलें काय, त्यांच्या चरित्रापासून आपण शिकावयाचें काय व आपल्याला त्यांच्याबद्दल जर आदर असेल तर आपण यापुढें केलें पाहिजे काय, हे तीन मुद्दे अगदीं ठसठशीतपणें त्यांनीं वाचकां-पुढें मांडले आहेत.

गोपाळरावजींनीं जी कामगिरी केली ती बहुतेक सर्व लोकांस पूर्ण माहीत असून आजच्या दुःखकारक प्रसंगीं तिचें कोणासहि स्मरण झाल्याखेरीज राहणार नाहीं. एका गरीब ब्राह्मणाच्या मुलानें शाळेंत अभ्यास करून परीक्षा पास झाल्यानंतर कांहीं थोड्या वर्षांतच हत्ती, घोडे, संपत्ति, सत्ता किंवा अशाच प्रकारचीं दुसरीं बाह्य साधनें जवळ नसतां वयाच्या पन्नासाव्या वर्षापूर्वींच सर्व देशांत आपलें नांव आबालवृद्धांचे तोंडीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठेवून जावें, हें कांहीं लहानसहान काम नव्हे; आणि हें काम कोणासहि आपल्या बुद्धिमत्तेनें, दीर्घोद्योगानें, सतत उच्च ध्येय मनापुढें ठेवून, केवळ

बाळ गंगाधर टिळक

आपल्या कर्तबगारीनें करतां येतें हें गोपाळरावजींच्या चरित्रांतील मुख्य मर्म होय. यांनीं प्रथम न्यू इंग्लिश स्कुलांत व फर्ग्युसन कॉलेजांत अध्यापकाचें काम करून नंतर सार्वजनिक सभेंत वेल्बी कमिशनपुढें, मुंबईच्या व पुढें हिंदुस्थानच्या कायदेकौन्सिलांत, प्रांतिक सभेंत, किंवा राष्ट्रीयसभेंत, अनेक प्रकारचीं कामें केलेलीं आहेत, असें यांच्या चरित्राचें वर्णन करीत असतात; कित्येक त्यांच्या बुद्धिमत्तेची प्रशंसा करितात, तर कित्येक त्यांच्या दीर्घोद्योगाची महती गातात. कित्येक त्यांचा सौम्यपणा वर्णन करितात, तर कित्येक त्यांचा निगर्वीपणा गातात. परंतु आमच्या मतें हे बाह्य गुण झाले; आणि यासंबंधानें कांहीं बाबतींत कित्येकांचा नामदार गोखले यांशीं मतभेदहि असूं शकेल. पण हे गुण व ही कामगिरी ज्या एका अंतर्गुणामुळें उदयास येते त्या गुणाबद्दल मतभेद असणें शक्यच नाहीं, असें आमचें कायमचें मत आहे. तो गुण म्हटला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणजे निर्लोभ अंतःकरणानें वेळींच आपणांस देशकार्यास वाहून घेणें हा होय. बालपणीं अभ्यास व तरुणपणीं संसार यथास्थित करून मंदावलेल्या कायिक मानसिक शक्ति इतर कर्तव्याभावीं लोकोपयोगास वाहाणारे पुरुष कोठें आढळून आल्यास त्यांबद्दल विशेषशी आदरबुद्धि मनांत उत्पन्न होत नाहीं. पण इंद्रियशक्ति शाबूत आहेत, शरीर स्वार्थासाठीं उद्योग करण्यास समर्थ आहे, वार्धक्य अजून दूर राहिलें आहे, आणि संसारांतील सुखाचें स्वरूप अद्याप मनोहर असून तिकडे चित्ताची प्रवृत्ति होणें साहजिक आहे; अशा वेळीं आणि विशेषेंकरून या दिशेनें गेलें असतां आपणांस यश मिळण्याचा इतरांपेक्षां कांकणभर अधिक संभव आहे, अशी मनास खात्री वाटत असतांहि या सर्व मनोहर देखाव्यांवरून दृष्टि मागें ओढून यथाशक्ति आपल्यास देशकार्यास वाहून घेणें, त्यांत आलेलीं संकटें सोसण्यास कबूल असणें, किंबहुना त्यांतच आनंद मानून त्यासाठीं सतत परिश्रम करण्यास तयार होणें, याला एकप्रकारचा बळकट मनोनिग्रह लागत असतो आणि तो मनोनिग्रह ज्यानें दाखविला, दाखविलाच नव्हे तर आमरणान्त कायम ठेवला, तोच पुरुष धन्य होय.

गोपाळरावजींचे उद्योग व त्यांनीं केलेली कामगिरी नीतिदृष्ट्या, देशहितदृष्ट्या आणि पुरुषार्थदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची होती, असें कोणासहि वाटल्यावांचून राहणार नाहीं. यांचा स्वभाव सौम्य असल्यामुळें आपल्या ध्येयाप्रमाणें हातीं घेतलेलें काम सौम्य उपायांनीं पार पाडण्याकडे यांची प्रवृत्ति असे; आणि आमच्यासारख्या कित्येक लोकांस हे सौम्योपचार अनाठायीं आहेत असें वाटे. पण पथ्य आणि उपचार यांच्या तीव्रातीव्रतेसंबंधानें दोन वैद्यांमध्यें जरी मतभेद झाला, तरी वैद्य या नात्यानें गोपाळरावजींची जी योग्यता होती ती आम्हांसहि पूर्णपणें मान्य आहे. आपला देश हल्लीं ज्या स्थितींत आहे ती स्थिति अत्यंत निकृष्ट असून सर्व बाजूंनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देश वर येण्यास लोकांच्या ठायीं अनेक सद्गुणांचा प्रादुर्भाव झाला पाहिजे, असें: जें गोपाळरावजींनीं देशाच्या रोगाचें निदान केलें होतें, तें अगदीं

गोपाळराव गोखले

अक्षरशः खरें आहे. हें निदानच आधीं कित्येकांच्या लक्षांत येत नाहीं; आणि लक्षांत येणाऱ्या हजारों लोकांपैकीं एखादाच त्यासाठीं आपला वेळ मोडून उपचार करण्यास तयार होत असतो. गोपाळरावजी याच्याहि पुढें गेलेले होते; आणि अशा तऱ्हेचे पुरुष या देशांत सध्यां फारच थोडे आहेत; हें लक्षांत आणलें म्हणजे गोपाळरावांच्या कामगिरीचें महत्त्व पूर्ण लक्षांत आल्याखेरीज राहणार नाहीं. किंबहुना हल्लींच्या काळांतील ब्राह्मणांचें जर कांहीं कर्तव्य असेल तर तें हेंच होय, असें आम्हीं म्हणूं शकतों. डामडौलास न भुलतां, आपण एकटेच निर्धन जन्मलों तसेच एकटे जाणार हें लक्षांत आणून ऐहिक सुखाचा त्याग करणें, आणि केवळ देशहितकारक धर्म आचरणें यांतच खरें ब्राह्मणत्व आहे; आणि हा धर्म ज्यानें पाळला तो दुसरें कांहीं करो वा न करो, त्यानें योजलेले उपाय सौम्य असोत वा कडक असोत, केवळ वरील धर्म पाळल्यामुळेंच तो देशकर्त्या पुरुषांचे वर्गांत पडून सद्गति पावतो, असें आम्हांस वाटतें. या सिद्धांताची महती कमी समजणारे कांहीं लोक आहेत, नाहीं असें नाहीं. पण अशा लोकांच्या मतांमुळें वरील सिद्धांताचें महत्त्व कमी न होतां, अपवादानें सामान्य सिद्धांतास जी बळकटी येते तीच या आक्षेपामुळें वरील सिद्धांतासहि येते, असें आमचें मत आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असो; विद्यार्थिदशेंत असल्यापासूनच मनापुढें उच्च ध्येय ठेवल्यानें बुद्धिमान पुरुषास काय करितां येणें शक्य आहे, याचा धडा गोपाळरावजींच्या चरित्रावरून पुढल्या पिढीनें घ्यावा, असें त्यांस आमचें सांगणें आहे; व तो ते घेतील अशी आम्हांस उमेद आहे. या जगांत कोणीहि झाला तरी तो आपल्यासाठींच जन्मला आहे असें नाहीं. देश भरभराटींत असतां ही गोष्ट पुष्कळांच्या डोळ्यांपुढें असते, पण त्याला विपन्नावस्था आली म्हणजे विद्वान पुरुषहि या सिद्धांताकडे दुर्लक्ष करीत असतात; किंवा अशा दुर्लक्षामुळेंच विपन्नावस्था येते असें म्हटलें तरी साजण्यासारखें आहे. म्हणून ना. गोखले यांच्या चरित्रावरून जो बोध घ्यावयाचा तो तरुणांनीं होईल तितक्या लवकर घेण्यास मागें सरू नये, असें त्यांस आमचें सांगणें आहे. देशासाठीं जें काम करावयाचें आहे, तें अत्यंत महत्त्वाचेंच नव्हे तर अत्यंत कठीणहि आहे. एकाच प्रयत्नानें एकाच वेळीं किंवा एकाच पुरुषाचे हातून तें सिद्ध होण्यासारखें नाहीं, त्यासाठीं या सर्व गोष्टींची परंपरा कायम राखली पाहिजे; आणि ती राखणें सर्वस्वीं पुढील पिढीच्या हातीं आहे. गोपाळराव गोखले यांना जें कांहीं कर्तव्य वाटलें तें ते करून गेले, आणि त्यांच्या कृत्यांप्रमाणें त्यांस परलोकीं सद्गति मिळेल, याबद्दल धर्मदृष्ट्या कांहीं शंका नाहीं. पण त्यांनीं आपलें कर्तव्य केलें किंवा त्यांना सद्गति मिळाली. एवढें म्हणूनच मागें राहिलेल्या लोकांचें कर्तव्य संपत नाहीं. त्यांच्या मृत्यूनें जें नुकसान झालें आहे, तें सर्व देशाचें असून विशेषतः त्यांच्या आप्तइष्ट वर्गावर व त्यांच्या शिष्यांवर हा एक मोठा कठीण प्रसंगच गुदरला आहे, असें म्हटलें पाहिजे. पण ह्या अशा स्थितींतहि शांतता आणि समाधान राखून, “ येनास्य पितरो याता येन याताः पितामहाः । तेन यायात्सतां मार्गे तेन गच्छन्न दुष्यति ॥ ” (ज्या मार्गानें गुरु किंवा त्यांचेहि गुरु गेले तोच लोककल्याणाचा मार्ग पुढें चालवावा, त्यांतच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपलें क्षेम आहे) हें मनुवचन लक्षांत आणून व शोक विसरून पूर्वाचार्यांनीं देशाच्या अभ्युदयार्थ जो मार्ग आंखून दिला आहे तोच पुढें उत्साहानें, उमेदीनें, धैर्यानें आणि नेटानें चालविण्यास सर्वांनीं प्रवृत्त व्हावें, एवढेंच अखेर या दुःखदायक प्रसंगीं आमचें सर्वांस दुखवट्याचें सांगणें आहे. पुढचें पडलें तर मागच्यांनीं आपलें कर्तव्य बजावणें यांतच खरें समाधान आहे, रडण्यांत नाहीं.

अ भ्या स

१. मनु कोण? सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांच्या 'भारतवर्षीय प्राचीन चरित्रकोशांत' माहिती शोधा.

२. पृष्ठ १०० वरील नागमोडी रेषेनें खूण केलेल्या वाक्यांत निर्देशिलेलीं ऐहिक सुखें कोणतीं? देशहितकारक धर्म कोणता?

३. 'आम्ही,' 'आमचें' असें स्वतःबद्दल कोणकोण लिहितात?

४. लेखकाचा गोखल्यांशीं मतभेद होता हें दर्शविणारीं यांत कोणतीं वाक्यें आहेत?

५. 'आबालवृद्ध,' 'तीव्रातीव्रता' समास सोडवा.

६. परंपरा, अपवाद, कांकणभर, दुखवटा, वाहून घेणें, आमरणान्त यांचे अर्थ स्पष्ट करा.

स्वा ध्या य

१. नामदार गोखले यांनीं देशाची सेवा अखंड चालू रहावी या हेतूनें पुणें येथें जो 'भारतसेवकसमाज' (सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी) स्थापिला आहे त्यासंबंधीं त्यांच्या चरित्रांतून माहिती मिळवून ४० ओळींचा निबंध लिहा.

२. 'सार्वजनिक सभा,' 'वेल्बी कमिशन' यांची माहिती न. र. फाटककृत न्यायमूर्ती रानडेचरित्र, न. चिं. केळकरकृत टिळकचरित्र, पां स. साने-कृत गोखलेचरित्र यांतून मिळवा व आपल्या टिप्पणवहींत लिहून ठेवा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. पृष्ठ १०० वरील 'आम्हीं म्हणूं शकतों' हा अधोरेखित प्रयोग इंग्रजी भाषाप्रकार आहे; त्याला शुद्ध मराठी पर्याय सुचवा.

४. नांवांच्या मागें लावण्यांत येणाऱ्या जुन्या व नव्या अमदानींतील पांच पांच सरकारी किताबांचीं नांवें द्या.

५. पृष्ठ ९९ वरील नागमोडी रेषेनें खूण केलेल्या संयुक्त वाक्याचा तुमच्या स्वतःच्या शब्दांत खुलासेवार अर्थ करा.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कादंबरींतील वर्णन

१५. अग्नीच्या मुखांतून

हरी नारायण आपटे

हरि नारायण आपटे यांच्या 'उषःकाल' या ऐतिहासिक कादंबरींतील एका प्रकरणाचा हा उतारा आहे. या प्रकरणांत, ज्या देशमुखाच्या वाड्याचें वर्णन केलें आहे तो देशमुख शिवाजी महाराजांना फितूर असावा असा विजापूरच्या बादशहास संशय येऊन, त्यानें त्यास कैद करण्यास आपलीं माणसें पाठविलीं. त्यांनीं त्याला व त्याच्या मंडळीला कैद केलें व त्यांबरोबरच त्याच्या वाड्याला आगहि लावून दिली. या प्रसंगाचें वर्णन खालील उताऱ्यांत आलें आहे.

वाड्याला चारी बाजूंनीं आग लागल्याबरोबर थोड्याच वेळांत नुसता भडका उडाला. वाडा फार जुना. त्याच्या तुळवटांनीं व खांबांनीं किती तेल खाल्लें होतें, किती मसाला खाल्ला होता, यामुळें आग लागल्याबरोबर कांहीं वेळ ती चेतण्यास लागला असेल तेवढाच. पण एकदां आग चेतल्यानंतर सर्व खांब केवळ दिवट्यांप्रमाणें संथपणें जळूं लागले. लोणाऱ्याच्या कोळशाचा विस्तव जसा एकसारखा अगदीं रसरशित बनतो, त्याप्रमाणेंच निखारे बनत चालले. मध्येंच 'कडाड' 'कडाड' असा भयंकर शब्द होऊन एकदम एखादें दुसरें तुळवट खालीं येई आणि खालीं असणाऱ्या ज्वालाग्राही पदार्थांस आपल्या अंगाचें तेज देई. दुरून पाहणाराला तर सबंध गांवच्या गांवच पेटला आहे कीं काय असें वाटे; कारण जणूं काय त्याच्या यजमानांचे हाल झाले, तसे बिचाऱ्या वाड्याचे तरी हाल होऊं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नयेत असें वाटूनच काय, वारा सपाटून सुटला, आणि त्या वाड्यास लवकरच आत्मरक्षा करून टाकण्यास मदत करूं लागला. एकदां वारा सपाटून सुटल्यानंतर मग काय ? सर्व वाड्याच्या भोंवतालीं ज्वाळा फिरूं लागून अग्निनारायणानें जणूं काय आपल्या तेजाचें चक्रच त्या वाड्याच्या भोंवतालीं घालून यवनांच्या त्रासापासून मुक्त करण्यासाठीं तो आपल्या स्वाधीन करून घेतला आहे, असें वाटूं लागलें. वाड्याच्या कोणत्याहि बाजूनें आंत जाण्यास आतां मार्ग राहिला नाहीं. सर्व दिशांचीं दारें, खिडक्या, झरोके वगैरेंमधून धुराचे व आगीचे लोळचे लोळ बाहेर येऊन मोठ्या प्रचंड कमळासारखाच देखावा दिसूं लागला. विज़ापूरचे लोक याप्रमाणें आपलें भयंकर कृत्य करून तेथून निघून गेल्यानंतर गांवांतले लोक हळूहळू वाड्याच्या भोंवतीं जमा होऊं लागले, तेव्हां आगीची अवस्था प्रचंड झाली नव्हती. कांहीं कांहीं बाजूंनीं सडकून पेट घेतलेला होता. परंतु एक दोन बाजू तशाच होत्या. सभोंवार जमलेले लोक 'आंत कोणी असेल काय ?' 'कोणी दिसत नाहीं,' 'असतं तर कोणी ओरडलं असतं,' असले उद्गार काढीत होते. 'परंतु आंत जाऊन पाहूं' असा उद्गार एकाच्याहि तोंडून निघाला नाहीं. त्यावेळीं गांवांत असा एकहि माणूस नव्हता, कीं ज्याला तो सर्व प्रकार पाहून अत्यंत वाईट वाटलें नाहीं. प्रत्येक मनुष्य आपल्या ठिकाणीं 'अरेरे, काय दुष्टांनीं सत्यानास केला !' 'अरेरे, आज देशमुखांचा नायनाट झाला,' 'अरेरे, यांचा कोणीच शास्ता उत्पन्न व्हायचा नाहीं काय ?' असें म्हणून तळमळत होता. प्रत्येक पुरुष आपल्या ठिकाणीं दांत ओठ खाऊन चडफडत होता. गांवांत पाण्याचा पुरवठा जेमतेम. आणि वाड्याचें धूड म्हणजे कांहीं लहानसहान नव्हे. त्याला विझविण्यास एवढ्या तेवढ्या पाण्यानें काय होणार ? असा पोक्त विचार मनांत येऊनच काय, मंडळींनीं वाडा विझविण्यासाठीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फारशी खटपट केली नाहीं. वाडा चांगला पेटेपर्यंत त्या आगलाव्यांनीं कोणाला आंत येऊंच दिलें नाहीं आणि पेटल्यानंतर विझविण्यासाठीं खटाटोप करण्याचें धैर्य कोणाच्या अंगीं दिसलें नाहीं. मिळून बिचाऱ्या त्या वाड्याची होळी झाली, एवढी गोष्ट खरी.

वर सांगितलेंच आहे कीं, वाड्याचे दरवाजे, खिडक्या, दारें, झरोके, सारांश, जेथें जेथें म्हणून वारा किंवा प्रकाश जाण्यायेण्यास मार्ग होता, तेथून तेथून ज्वाळा बाहेर येताहेतसें दिसत होतें. आतां आतां तर त्या वाऱ्याच्या सोसाट्याच्या जोरानें ज्वाळा इतक्या भयंकर तऱ्हेनें रोंरावत होत्या कीं, आंत एखादा गरीब प्राणी सांपडला असून त्यानें सुटण्याकरितां जरी यदाकदाचित् आक्रोश केला असला, तरी तो कांहीं बाहेर कोणास ऐकूं आला नसता. पण असा आक्रोश करण्यास कोणी होतें काय? होय, कोणी तरी आंत असलें पाहिजे असें दिसतें. कारण त्या ज्वाळांच्या रोंरों शब्दाच्यांतून व क्षणांक्षणांनीं 'कडाड' 'कडाड' करीत खालीं येणाऱ्या तुळवटांच्याहि शब्दांतून स्पष्टपणें एक दोन तीन— अति केविलवाण्या अशा मानवी किंकाळ्या ऐकूं येत होत्या खास! या किंकाळ्या प्रथम खोल अशा जागेंतून येतां येतां आतां बऱ्याच स्पष्टपणें ऐकूं येऊं लागल्या. त्या एका खिडकींतून येणाऱ्या ज्वालांच्याबरोबर बाहेर येत होत्या. त्या किंकाळ्या कोणा तरी स्त्रीच्या असाव्यात असें स्पष्ट वाटलें. त्या किंकाळ्यांबरोबर एकाद्या लहान पोराचेंहि किंकाळणें ऐकूं येत आहे, असाहि त्या सभोंतालच्या लोकांना भास झाला. मग काय विचारतां? सर्व मंडळी त्या किंकाळ्यांच्या दिशेला जमली आणि एकसारखी हळहळूं लागली. आंत कोण असावें, किंकाळ्या कोणाच्या असाव्या, अशाविषयीं अनेकांचे अनेक तर्क-वितर्क होऊं लागले. आंत जाऊन कोण असेल तिला सोडवावें असेहि उद्गार अनेकांच्या तोंडून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निघाले. परंतु उद्गार निघणें आणखी त्याप्रमाणें छाती होऊन गोष्ट पार पाडणें, यांत किती तरी अंतर आहे! सरासरी पन्नास पाऊणशें मंडळींच्या तोंडून अनुकंपेचे उद्गार निघाले, परंतु पुढें होण्यास काय तो एकच तयार झाला. आंत शिरकाव करून त्या आंतल्या प्राण्याला सोडवून आणावेंच, असा त्यानें मनाचा निश्चय केला, व 'कांहीं होवो, कोठें तरी मार्ग काढून आंत शिरूंच, मग काय होणार असेल तें खरें,' असे उदात्त विचार त्याच्या एकट्याच्या मनांत उभे राहिले. त्यावेळीं त्याला दुसऱ्या कितींनीं तरी मागें ओढलें! परंतु त्याच्या मनानें घेतलें, देश-मुखांच्या अन्नावर वाढलेला मी, या वेळीं त्यांच्या घरांतल्या माणसांसाठीं माझा प्राण खर्चीं घालण्याचा प्रसंग आला तर त्याचा उपयोग करून घेतला पाहिजे. मघांशीं दुपारींच आपण कांहीं तरी करायला पाहिजे होतें. परंतु आपल्या हातून कांहीं झालें नाहीं, हें बरें नाहीं, असे विचार त्याच्या मनांत आले. आणि असे विचार जों जों त्याच्या मनांत संचार करूं लागले, तों तों त्याला स्फुरण चढूं लागलें. तो भराभर सर्व वाड्याच्या भोंवतीं घिरट्या घालूं लागला. 'सटवाजी नाईक, तुम्ही या भानगडींत पडूं नका. हकनाक प्राणाला मुकाल. आतां आंतून कोणी बाहेर जिवंत निघणें शक्यच नाहीं,' असले उद्गार त्याच्या कानांवर पुष्कळदां आले. परंतु ते ऐकण्याला त्याला या वेळीं कानच नव्हते. त्याचें तनमनधन सर्व कांहीं त्या किंकाळ्यांकडे लागलें होतें. ज्या खिड-कीच्या जवळून त्या किंकाळ्या येत होत्या असें त्याला वाटलें, त्या खिडकीकडे त्यानें एकसारखें दहा बारा मिनिटें पाहिलें. किंकाळ्या फोड-णारी कोणी तरी स्त्री असून तिच्या कडेवर एक मूल आहे असा त्याला भास झाला. लागलीच त्याच्या मनांत ती स्त्री कोण असावी याबद्दल तर्क उभा राहिला. तो तर्क उभा राहण्याबरोबर तर तिला सोडविण्याकरितां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याला अतोनातच स्फुरण चढलें. आतां जेथें आगीचा कल्होळ कमी असेल तेथून आंत शिरावयाचें असा त्यानें निश्चय केला. लागलीच आपल्या अंगावरलें धोतर दूर फेकून दिलें. आंत चड्डी असल्यामुळें नेसतें धोतरहि चटकन् फेकून दिलें. एक वेळां दंड ठोकले, आणि आतां जेथें ज्वाळा अंमळ कमी भयंकर असतील तेथून आंत शिरावयाचें असा निश्चय करून तो वाड्याच्या भोंवतीं फिरण्यास निघाला. मंडळींनीं पुनः त्याचा तो उत्साह पाहतांच, हा आतां आपल्या प्राणांची आहुति देणार असें मनांत येतांच त्याचें मन फिरविण्यासाठीं खटपट चालविली. तो अणुमात्र ऐकेना. कोठें तरी शिरण्यास मार्ग पाहण्यासाठीं आतुर होऊन सपाटून पुढें चाललेल्या सटवाजीनें त्यांच्या बोलण्याकडे मुळींहि लक्ष न देतां आपली प्रदक्षिणा पुरी केली. आणि आंत शिरण्यासाठीं एक द्वार त्यानें पाहिलें होतें, त्यांतून आंत शिरण्याचा त्यानें निश्चय करून तो आतां पुढें सरसावून आंत पाऊल घालणार, तोंच त्याला मंडळी जोरानें मागें ओढण्यासाठीं खटपट करूं लागली. इतक्यांत अतिशय जोरानें—अगदीं उरीं फुटेल अशा वेतानें येणाऱ्या घोड्याच्या टापा मंडळीच्या अगदीं मागेंच येऊं लागल्या. घोडा एकदम थांबला, आणि त्यावर स्वार होऊन आलेला माणूस एकदम खालीं उडी टाकून एका जवळच्या माणसास दरडावून घोडा धरून उभा राहण्यास सांगून "कायरे, काय आहे?" असें त्या मंडळीस विचारूं लागला. सटवाजीची आंत जाण्याची तयारी उघड उघड दिसत होतीच. त्याच्याकडे पाहून त्याच्या पाठीवर थाप मारून एकदम तो त्यास म्हणतो, "शाबास! शाबास! तूं न् मी बरोबर आंत जाऊं. हे सगळे लोक भ्याड, हरामखोर! आयरे हरामखोरांच्या अवलादी! स्वतः गुलामांना छाती नाहीं तर नाहीं, आणखी दुसऱ्याला मागं ओढतां का? थूः तुमचा जिनगानीवर!" तो काळाकभिन्न गृहस्थ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घोड्यावरून उतरून इतकेंच बोलला. लागलीच त्यानें जेथून त्या अत्यंत केविलवाण्या किंकाळ्या ऐकूं येत होत्या, त्या खिडकीकडे पाहिलें आणि एकदम "जय शंभु महादेव" "जय तुळजापूरची आई भवानी उदे! तुझा उदे!" असे प्रत्येक मराठ्याच्या अंगांत स्फुरण आणणारे शब्द उच्चारून मागें पुढें न पाहतां एकदम दोघेहि जवळच्या एका दारांतून आंत शिरले. इतक्यांत एक तुळवट कडाडून पडलें. तुळवट त्या दोघांच्या—निदान दोघांपैकीं कोणाच्या तरी एकाच्या अंगावर खास पडलें असावें असें बाहेरल्या सर्व लोकांस वाटलें. ते दोघे आतां जिवंत दृष्टीस पडतील किंवा त्यांचीं प्रेतें तरी दृष्टीस पडतील, असें कोणासच वाटेना. ज्याच्या त्याच्या मनाची खात्री झाली कीं, हे जिच्या सुटकेकरितां आंत गेले आहेत तिच्यासह जळून खाक होणार! असले विचार मनांत येत आहेत व लोक काळजीनें परिपूर्ण अशा नेत्रांनीं एकसारखे पहात आहेत, तों ज्या खिडकींतून त्या किंकाळ्या येत होत्या, त्या खिडकीच्या खालच्या भिंतीचीं दोनही बाजूंचीं तुळवटें एकदम कडाडून पडलीं. त्याबरोबर खालची भिंतहि पडली. त्या भिंतीखालीं एक माणूस चेंगरून गेला. खिडकीहि कोसळली आणि ती खिडकी ज्या माडीची होती ती माडीच्या माडीच कोसळली. लोक भराभर दूर झाले, पळाले. आतां बरेच भाग इतक्या जलद कोसळूं लागले कीं आसपास पंचवीस पन्नास हातांवर-सुद्धां उभें राहण्याची कोणाची छाती होईना. दूर दूर उभें राहून, आंत गेलेल्या दोघां मर्दांचें पुढें काय होतें, ते आतां बाहेर येतात कीं नाहीं, अशाबद्दलची आपली जिज्ञासा लांब लांब माना करून, व डोळे रुंदावून तृप्त करून घेण्यास पाहत होते. आंत गेलेले इसम आगीच्या लोळांत व धुराच्या गुंजाळांत सांपडले खरे, परंतु निश्चय—कधीं न ढळणारा, प्राणावर उदार झालेला निश्चय कोणच्याहि गोष्टीच्या मागें लागला म्हणजे, कोठेंहि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पडला, कोठेंहि शिरला, तरी फत्ते केल्याखेरीज अगर प्राण दिल्याखेरीज राहतो काय ? ज्या खिडकींतून आपल्याला किंकाळ्या ऐकूं आल्या, ती खिडकी ज्या बाजूला होती त्या बाजूला त्यांनीं आपलीं पावलें वळविलीं. वाटेंत कितीक निखारे, कितीक दिवटीप्रमाणें फुरफुर करीत पडलेले तुळवटांचे, खांबांचे, कडीपाटांच्या फळ्यांचे तुकडे पडले होते. सभोंवतालीं दाट पसरलेल्या धुराचे नुसते लोळच्या लोळ ! दोन हाताच्या पलीकडे कांहीं दिसायचें नाहीं ! अशी भयंकर स्थिति, धूर सगळा नाकातोंडांत जात होता, ज्वाला अंगाला चाटून जात होत्या, अंगावर एकसुद्धां केंस होरपळल्याखेरीज राहिला नसेल. परंतु ह्या सगळ्या गोष्टींकडे लक्ष्य देण्यास त्या दोघांचीं, विशेषतः त्या काळ्याकभिन्न गृहस्थाचीं, पंचेंद्रियें रिकामीं नव्हतीं. त्यांच्या नेत्रांस त्यांच्या उद्दिष्ट कार्याखेरीज कांहीं दिसत नव्हतें. त्यांच्या घ्राणेंद्रियांस धुरानें कांहीं होत नव्हतें. त्या स्त्रीच्या किंकाळ्यांखेरीज त्यांच्या कर्णेंद्रियांस कांहीं ऐकूं येत नव्हतें. त्यांच्या त्वचेस ज्वाला चाटून जात होत्या, परंतु त्याचें त्यांस भानहि नव्हतेंसें दिसलें. सर्व इंद्रियें एका अंतरिंद्रियांत जणूं काय अगदीं एकवटून गेलीं होतीं. तो काळा धिप्पाड पुरुष अगदीं पुढें होता. दुसरा तो त्याच्या मागें होता. ते हरतऱ्हा करून ज्या खोलीच्या खिडकींतून त्या किंकाळ्या ऐकूं येत होत्या त्या खिडकींत गेले. तेथें जातात तों खरोखरच एक स्त्री अगदीं बेशुद्ध होऊन पडली होती. तिच्याजवळ तिचें मूलहि त्याचप्रमाणें पडलें होतें. तिच्या किंकाळ्या केव्हांच बंद झाल्या होत्या. तिला आतां कशी उचलून घ्यावी व कशी न्यावी याचा विचार क्षणमात्र त्यांनीं केला. परंतु खालचीं बहालें हादरत आहेत, न जाणों आतां तीं कडाडतील. तिला उचलण्याला एका क्षणाचाहि आतां विलंब करतां कामा नये असें त्या काळ्या पुरुषाच्या ध्यानांत आलें. ध्यानांत येतांच त्यानें एका क्षणाचाहि विलंब न करितां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिला उचलून आपल्या रुंद अशा खांद्यावर घेतलें; दुसऱ्या हातानें मुलास उचललें आणि पुनः आपल्या त्या धीरगंभीर वाणीनें, "जय शंभु महादेव, जय तुळजापूरचे आई भवानी!" असें आपल्या देवतांचें नामस्मरण करून तो ताबडतोब त्या खोलीच्या बाहेर पडला. त्याचें पाऊल त्या खोलीच्या बाहेर पडण्यास एक पळभर उशीर लागला असता तर तोहि त्या खोलीच्याबरोबर त्या आगीच्या डोंबाळांत खास सांपडता. परंतु त्याचें पाऊल पूर्णपणें बाहेर पडल्यानंतर सुमारें दोन सेकंदानें मघाशीं सांगितल्याप्रमाणें त्या खोलीच्या खालचीं तुळवटें कडाडलीं आणि तक्तपोशी-सकट ती खोलीहि खालीं खचली. इकडे तो काळा गृहस्थ त्या खोलीच्या बाहेर पडतांच आपल्या साथीदारास म्हणतो, "सटवाजीराज, आतां दुसरें कांहीं नाहीं, पुढें होऊन बाहेर निघण्याला रस्ता काढा, मी त्या रस्त्यानें तुमच्या मागो-मागच येतों. अगदीं दाराच्या बाहेर पडण्याच्या वेळीं हिला आणखी या मुलाला तुम्ही घ्या. आणखी त्यांना दूर कुठें तरी नेऊन शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करा. तों मी पुन्हां परतून माझं आणखी एक काम राहिलं आहे तें करून येतों." हे सर्व शब्द तो जलद जलद तर खराच पण अतिशय शांतपणें बोलत होता; जणूं काय एकाद्या आरामाच्या जागेंतूनच तो चालला होता. पुढच्या सटवाजीला त्याचा तो संथपणा पाहून फारच आश्चर्य वाटलें असावें. परंतु आश्चर्य करीत बसण्याची ती वेळ नव्हे आणि तें स्थळहि नव्हे. तो लागलीच रस्ता काढीत चालला. त्याची तरी छाती जबर—फार जबर! कित्येक वेळां त्यानें आपल्या हातानें जळतीं बहालें दूर सारून रस्ता काढला. त्या स्त्रीला घेऊन येणारा तो काळा पुरुष तर विलक्षणच छातीचा समजला पाहिजे. कारण, त्यानें आसपासच्या ज्वाळा त्या स्त्रीच्या वस्त्राला किंवा तिच्या केंसाला किंवा तिच्या या बाळकाच्या केसाच्या अणूमात्र न लागण्याविषयीं जितकी काळजी घ्यावयाची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तितकी घेतली. आणि दैवयोगानें त्याच्या त्या अचाट साहसाला यशहि आलें. ती स्त्री व तें मूल त्यानें आपल्या खांद्यावर वाहून आणल्यासारखें अगदीं अग्नीनें अस्पष्ट असें बाहेर आणलें, सटवाजीच्या स्वाधीन केलें, आणि तो तडक त्याच पावलीं माघारीं वळला. आपण वांचविलेली स्त्री व मूल अग्नीपासून अस्पृष्ट असलीं, तरी तीं खरोखर कोणच्या अवस्थेंत आहेत, याबद्दल विचारसुद्धां त्यास आला नाहीं.

अभ्यास

१. या उताऱ्यावरून 'त्या काळ्या पुरुषा'च्या स्वभावाचें वर्णन करा.

२. या वर्णनांतील अत्यंत उत्कट प्रसंग कोणता ? महापुरांत गांव किंवा नाव सांपडली आहे असें कल्पून सुटकेचें असेंच वर्णन करा.

३. 'उरीं फुटणें,' 'होळी होणें,' 'अन्नावर वाढणें,' 'प्राणाची आहुती देणें,' 'तेल खाणें,' यांचे अर्थ स्पष्ट करा व प्रत्येकाचा उपयोग एकेका स्वतंत्र वाक्यांत करून दाखवा.

४. लोणारी, बहाल, रोंरावणें, उदे, अणुमात्र, धूड, हकनाक, अस्पृष्ट, आत्मरक्षा, अंतरिंद्रिय यांचे अर्थ सांगा. (कोशाचा उपयोग करा.)

५. आपव्यांच्या या पहिल्या ऐतिहासिक कादंबरींत इंग्रजी भाषासरणी ठिकठिकाणीं आढळेल. क्रमशः प्रसिद्ध होणाऱ्या व घाईनें लिहिलेल्या प्रकरणांत क्वचित् पुनुरुक्ति व भाषादोष हीं आढळतील. ते शिक्षकांच्या मदतीनें शोधून काढा.

६. 'लोणारी' यासारखे 'आरी'नें शेवट होणारे धंदेवाचक पांच शब्द सांगा.

७. पृ. १०७ वरील 'तनमनधन' यांतील धन शब्द येथें निरर्थक आहे. कां ?

८. जणूं काय, कीं काय, अशा शब्दांचा काय उपयोग होतो ? धड्यांतील वाक्यांचा अर्थ स्पष्ट करून दुसरीं पांच वाक्यें तयार करा.

पुरवणीवाचन

(१) ह. ना. आपटेकृत 'सूर्योदय,' 'गड आला पण सिंह गेला,' 'चंद्रगुप्त'; (२) सहकारीकृष्णकृत 'शापित महाराष्ट्र'; (३) नाथमाधवकृत 'सांवळ्या तांडेल.'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९

कथा

१६. अंगणांतील पोपट

दिवाकर कृष्ण

" पोपट, आंत जाऊं नको बरें; भाई रागावतील ! "

शेट नानूभाई यांच्या घरापुढील अंगणांत एक सहा वर्षांचा बालक हातांत लांकडाचा एक हिरवा पोपट घेऊन उभा होता. ऑफिसमध्यें

भाईसाहेब आपल्या दोन कारकुनांबरोबर लांबलांब कागद घेऊन कायसें करीत बसले होते. डाव्या बाजूच्या दरवाज्यांतून एक गतधवा तरुणी त्या बालकाला हा मनाई–हुकूम सोडीत होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुंबईंतील गिरगांव बॅकरोडवरील एक बंगला भाईसाहेबांनीं स्वत:करितां १९०८ सालीं विकत घेतला. या बंगल्याचा एक विशेष हा होता कीं, त्याच्यापुढें एक त्रिकोणी अंगण ठेवलें असून, त्याच्या दोन्ही बाजूंनीं तिमजली इमारत उभी होती, व तिसऱ्या बाजूस भिंतीचा सुमारें एक पुरुषभर कठडा असून, मध्यें त्याला एक फाटक होतें. त्या अंगणाला गुळगुळीत शहाबादी दगडाची फरशी केलेली असून फाटकांतच चढावयाला चार पायऱ्या होत्या.

नानूभाई हे मुंबईच्या दलालाच्या धंद्यांत एक निष्णात गृहस्थ होते. यांचा जन्म बारडोलीस झाला होता. वडिलांच्या नौकरीमुळें ते जे एकदां मुंबईला आले, ते बारडोलीचें नांव देखील विसरले. नानूभाईंचे वडील आमरण एका पेढीवर कारकून होते. त्यांनीं बरीच इस्टेट भाईसाहेबांना ठेवली होती. त्यांच्या समजुतीप्रमाणें आपल्या जातीच्या एका कुलीन वधूबरोबर त्यांचा विवाह लावून दिला होता. गिरगांवांत एक घर विकत घ्यावयाला आपल्या अंतसमयीं त्यांनीं सांगून ठेवलें होतें. त्याप्रमाणें विकत घेतलेलें हेंच वर सांगितलेलें घर होय. अशा रीतीनें १९०८ सालीं भाईसाहेबांचा संसार सुरू झाला. भाईसाहेबांची मनोवृत्ति—लोक म्हणतात, आजन्म मुंबईंत राहिल्यामुळें—एका विशेष प्रकारामुळें व्यापारी बनली होती. कांहीं वर्षांनीं त्यांना एक पुत्ररत्न झालें. पण सर्व संसारांत त्यांची वृत्ति अनासक्त होती. वैराग्यामुळें नव्हे, हें खास, पण दुसऱ्या कशामुळें तेंहि सांगतां येत नाहीं. पण बायकामुलांना घरांतल्या कर्त्या मनुष्यानें आपली ज्याप्रकारें विचारपूस करावीशी वाटते, तशी ते करीत नव्हते, एवढें मात्र खरें.

भाईसाहेबांनीं पत्नीच्या—त्यांचें नांव माझ्या लक्ष्यांत नाहीं, लोक त्यांना 'बाई' म्हणत, हें त्यांचें माहेरचें नांव होतें येवढें मला आठवतें—अंगावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सर्व जबाबदारी टाकली होती. भाईसाहेबांना त्यांचा स्वतःचा व्यवसायच पुरेसा होई. महिन्याकांठीं पत्नी मागेल ती रक्कम त्यांच्याकडे ते देत. नौकराचाकरांकरवीं 'बाई' सर्व कामें करवीत. एकदां स्नानाला, दोनदां चहाफराळाला, दोनदां जेवणाला व रात्रीं फार उशिरानें निजावयाला भाईसाहेब डाव्या बाजूच्या इमारतींत येत. पेढीचें सर्व काम ते स्वतः आपल्या नजरेखालीं कसून करीत व त्याचें फल म्हणजे त्यांची वाढती सधनता होती. घरांत कोणी आजारी पडलें तर ते डॉक्टरला बोलावण्यास सांगत. खुद्द रोग्याजवळ त्याच्या आजाराची प्रत्यक्ष चौकशी त्यांनीं कधींच केली नाहीं. स्वतःच्या मुलाला देखील त्यांनीं कधीं उचलून घेतलें नाहीं.

आपल्या लाडक्या मुलाचें लाडकें नांव बाईंनीं पोपट असें ठेवलें होतें. छोटा पोपटलाल आनंदी गडी होता. त्याला पोपटाची फार आवड असे. गॅलरींत पितळी पिंजऱ्यांत त्याचा आवडता पोपट टांगला होता. त्याच्या हातांत लांकडी हिरवा पोपट होता. घरांतल्या मंडळीचा आवडता पोपट अंगणांत खेळत होता. नर्मदामावशींनीं त्याला कशिद्याचा एक पोपट काढून दिला होता. म्युनिसिपल शाळेंतील ओळखीचीं मुलें पोपटलालला जातां येतां हांक मारीत " पोपट. "

पोपटला फाटकाच्या बाहेर जाण्याची बंदी होती. अंगणाच्या आकुंचित क्षेत्रांत पोपट स्वच्छंदपणें स्वतंत्रपणें बागडत असे.

१९१८ सालच्या इन्फ्लुएंझामध्येंच बाईंचा प्रसूतिकाल दुर्दैवानें आला. तापामुळें त्यांना अकालीं प्रसूति होऊन त्यांचें दुखणें विकोपास गेलें. मुंबईच्या सर्व डॉक्टरांच्या अगदीं समोर पण पतीचें दर्शन न घेतां बाईंनीं इहलोकचा संसार संपविला. भाईसाहेबांना दुखणाइताजवळ बसणें आवडत नसे. ते आपल्या खोलींत जाऊन बसले. त्यांना यावयाला एक मिनिट उशीर लागला. इहलोक सोडून जातांना बाईंनीं नर्मदेला पोपटला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सांभाळण्याला सांगितलें. बाई कायमच्या गेल्या. नर्मदेला रडतां घर थोडें झालें. बहिणीबहिणींचा अगदीं एकजीव असे. त्या दिवशीं पोपटला शेजारच्या घरांत खेळावयाला नेलें होतें. पोपट ऐनवेळेस धांवत आलाच, व त्यानें आपल्या जात्या मातेचें शेवटचें दर्शन घेतलें. मातेला मात्र मुलाचें दर्शन झालें नाहीं. पोपटची समजूत होती, आईला चौघांनीं उचलून दवाखान्यांत नेलें. अनेक वेळां तो नर्मदेला विचारी "आई केव्हां ग दवाखान्यांतून परत येणार ?" बिचाऱ्या नर्मदेला रडूं कोसळे !

नर्मदा त्यानंतर लौकरच आपल्या घरीं गेली. तीन महिन्यांनीं नर्मदा परत आली; तिच्या कपाळीं कुंकूं नव्हतें. आल्याबरोबर पोपटनें विचारलें "नर्मदा मावशी, कुंकूं लावायला विसरलीस होय ?" नर्मदेच्या नेत्रांसमोर सूर्य फिरूं लागले. नर्मदेच्या सासरचीं सर्व माणसें सांथींत संपलीं. निराधार नर्मदेला भाईसाहेबांनीं आपल्या घरीं आणून ठेवलें. दोन वर्षांत भाई-साहेबांच्या वृत्तींत कांहींहि फरक पडला नाहीं. त्यांची पोपटशीं, नर्मदेशीं, इतरांशीं वागणूक अगदीं पूर्वीसारखी होती. नर्मदेला एकच आश्रय होता. एकच करमणूक होती. ती पोपटला जीवाभावानें जपत असे. म्हणच आहे, "माय मरो, पण मावशी जगो."

पोपटला भाईसाहेबांच्या ऑफिसांत जाण्याची इच्छा होती. त्यांना तो आपला हिरवा लांकडी पोपट दाखविणार होता. भाईसाहेब कामांत गुंतले होते. महत्त्वाचे कसलेसे कागद चाळून कारकुनांना ते कांहीं सांगत होते. अशा वेळीं त्याला कसचा वाव मिळतो ? अर्ध्या तासापासून पोपट ऑफि-सच्या दरवाज्यासमोर उभा होता. त्याला वाटत होतें आतां नाहीं मग भाईसाहेब आपल्याला आंत बोलावतील. मग आपण त्यांना लांकडी पोपट दाखवूं. भाईंनीं त्याला आंत बोलावलें नाहीं. नर्मदा इतक्यांत कशालाशी बाहेर आली. आरंभीं सांगितलेली प्रेमाची मनाई तिची होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" नको जाऊं? भाई कामांत आहेत होय? त्यांचें काम केव्हां संपेल? त्यांना मी बाजारांतून पोपटाला डाळिंबें आणायला सांगणार आहें !"

" संध्याकाळीं भाई जेवायला आले म्हणजे सांग बरं त्यांना !" फडफड असा आवाज झाला. पितळेच्या पिंजऱ्यांतल्या पोपटानें पंख झाडले.

" मावशी, आज पोपटाला डाळ कां नाहीं दिली ग" पोपट पिंजऱ्यांतल्या वाटींत पाहून म्हणाला.

" स्वतःला पाहिजे असेल म्हणून पोपटाची इतकी काळजी चालली आहे."

नर्मदेला १९१८ च्या चैत्रांतली आठवण झाली. हळदीकुंकवाकरितां भिजवलेली डाळ पिंजऱ्यांतल्या पोपटाला देण्याच्या मिषानें अंगणांतला पोपटच खात असे. कितीदां तरी नर्मदेनें पोपटाला आपल्या चिमुकल्या हातानें सर्वांची नजर चुकवून डाळीचा बोकणा भरतांना पकडलें होतें. पोपटाला आज दुपारची बाळवाटी भिजलेल्या डाळीची मिळाली. पिंजऱ्याच्या पोपटाचाहि त्यांत वांटा होता. शेजारचा बनशी पोपटशीं खेळावयाला आला. पिंजऱ्यांतल्या पोपटाचें पोपटनें आवडतें नांव 'लाल' असें ठेवलें होतें. संध्याकाळ झाली होती, रस्त्यांतून मोटारगाड्यांची जा ये चालली होती. म्युनिसिपल शाळेंतील मुलांनीं फाटकासमोर उभें राहून हांक मारिली "पोपट !"

त्या दिवशीं भाईसाहेब काम संपवून घरीं येईपर्यंत पोपटची मध्यरात्र झाली. नर्मदा मधल्या घरांत विचार करीत बसली होती. तिला ब्रम्हांड आठवत होतें. पोपट आपल्या बिछान्यावर निश्चिंतपणें घोरत होता. दुसऱ्या दिवशीं पाडवा. नर्मदेनें पोपटकरितां नवी पाटी आणली. नवी पाटी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घेऊन पोपट घरभर हिंडत होता. पोपटला आज नव्या वर्षाचा नवा आनंद झाला होता. भाईंना पाटी दाखविण्याकरितां पोपट ऑफिसच्या दारांत गेला. "भाई नाहींत!" भाई आकस्मिक कारणामुळें अहमदाबादला गेले होते. त्यानें कारकुनाला विचारलें, "भाई केव्हां हो परत येतील?"

"उद्यां संध्याकाळीं!"

दुसऱ्या दिवशीं पोपट नर्मदेला म्हणाला, "रात्रीं भाई उशीरानें आले तरी मला उठीव हं; मी त्यांना माझी नवी पाटी दाखवणार आहें!"

नर्मदेकडून रुकार मिळाल्यावर तो आपल्या आवडत्या लालची विचारपूस करण्याकरितां बाहेर गेला. त्या रात्रीं भाई परत आले नाहींत. दुसऱ्या दिवशींहि आले नाहींत. तिसऱ्या दिवशीं सकाळीं दहा वाजतां भाईसाहेब आपल्या फाटकांत उतरले. पोपट धावतच त्यांच्याकडे गेला. "भाई, आधीं घरांत या. मला एक शानदार हिरवा पोपट आणला आहे."

भाई पोपटशीं बोलले नाहींत, एक अक्षरहि न बोलतां ते तडक आपल्या ऑफिसमध्यें गेले, आणि बरोबर आलेल्या गृहस्थाशीं दोन तास खलबत करीत बसले. बऱ्याच मोठ्या रकमेचें एक प्रकरण अंगावर आल्यामुळें नानुभाई अगदीं अस्वस्थ झाले होते. त्यांना पुढें चार दिवस एका क्षणाचीहि फुरसद मिळाली नाहीं. सारखे मोटारींतून खेटे घालीत होते. पांचव्या दिवशीं पोपटच्या लांकडी पोपटाची त्यांना आठवणहि झाली नाहीं. पोपटला राग आला होता. त्यानें भाईंशीं आपण होऊन बोलावयाचें नाहीं असा निश्चय केला होता.

एका रात्रीं पोपटला ताप भरला. नर्मदेला कसेंसेंच वाटूं लागलें. आजपर्यंत त्याला अनेकदां ताप आला होता, पण आज नर्मदेला विनाकारण हुरहुर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाटूं लागली. पोपटाला दुसऱ्या मजल्यावरच्या रस्त्याकडल्या खोलींत निजविलें होतें. त्याला आज फोनोग्राफचें गाणें ऐकावयाची इच्छा झाली. नर्मदा त्याच्याकरितां रेकॉर्ड लावीत होती. मध्येंच पोपटनें विचारलें, "भाई माझ्यावर रागावले आहेत का ग?"

"नाहीं बाळ, रागवायला काय झालं?"

"होय. आणि तूं पण माझ्यावर रागावली आहेस. सगळे लोक माझ्यावर रागावले आहेत!"

"कुणीं सांगितलं तुला?"

"मला आपलें वाटतें उगीच!"

नर्मदा आंत गेली. पोपट खिडकींतून बाहेर पाहूं लागला. बनशी इतर मुलांबरोबर शाळेला जात होता. "बनशी, बनशी!" पोपटनें हांक मारली, बनशीला हांक ऐकूं गेली नाहीं. तो तसाच पुढें गेला. "सगळे लोक माझ्यावर रागावले आहेत!" पोपट स्वतःशींच म्हणाला. त्याला आज आईची आठवण झाली. नर्मदा खोलींत आली. तिला त्यानें विचारलें, "मला आई केव्हां ग भेटेल?"

"भेटेल अं बाळ!"

नर्मदा दुसरें काय उत्तर देणार? त्याची आई परत येण्याकरितां गेली नव्हती. पोपट उठून बाहेर जाऊं लागला.

"कुठें जातोस?"

"भाईकडे!"

"थांब, भाईनाच इथें बोलावतें अं!" नर्मदा बाहेर गेली. तिनें नौकराबरोबर निरोप पाठविला 'पोपट बोलावतो आहे.' भाई ऑफिसांत नव्हते. भाई परत आल्यावर नौकरानें निरोप कळविला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"कशाला बोलवतो? त्याला म्हणावें सध्यां काम आहे, थोड्या वेळानें येईन."

थोड्या वेळानें भाईसाहेब यावयाला विसरले. पोपटचा ताप वाढतच होता. कांहीं केल्या ताप उतरत नाहीं, असें पाहून डॉक्टरांच्या सल्ल्यानें नर्मदा त्याला घेऊन माथेरानला गेली. तिथें मोटारगाड्यांची सतत जा ये नव्हती. तिथें म्युनिसिपल शाळेंतील मुलें फाटकासमोर उभे राहून पोपट म्हणून हांक देत नव्हतीं. पोपटच्या प्रकृतीला सुधार म्हणून पडला नाहीं. तिसऱ्या दिवशीं त्याला भ्रम झाला. बेशुद्धींत तो बडबडत असे, "भाई!—सगळे लोक माझ्यावर रागावले आहेत."

नर्मदेनें भाईसाहेबांना लिहून कळवलें "बाळ आपली फार आठवण काढतो आहे, एकदां येऊन जा!"

आई अंतरली; बाप परका झाला, पोरानें धास्ती खाल्ली. तो म्हणूं लागला, "माई! तूं नाहीं ना माझ्यावर रागावलीस?"

भाईसाहेबांनीं जाण्याची दिरंगाई केली. दुसऱ्या दिवशीं तार आली. "Come over at once" (एकदम निघून या.) भाईसाहेब गेले. पोपटनें त्यांना ओळखलें नाहीं. "सगळे लोक माझ्यावर रागावले आहेत" हा त्याचा एकच महामंत्र होता. पांचव्या दिवशीं घरांतल्या पितळी पिंजऱ्याचा दरवाजा नौकरांनीं निष्काळजीपणानें उघडा टाकला. त्यांतला पोपट जो एकदां उडाला तो पुनः सांपडला नाहीं! जवळजवळ त्याच वेळीं पोपट आपल्या कुडीचा पिंजरा फोडून उडून गेला! तो पुनः परत आला नाहीं.

भाईसाहेब नर्मदेला घेऊन परत मुंबईला आले. लांकडाचा हिरवा पोपट झोपाळ्यावर पडला होता. पितळेचा रिकामा पिंजरा गॅलरींत टांगला होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सगळ्या घरांत उदास होतें. नर्मदा रडत होती. भाईसाहेब हातावर डोकें ठेवून बसले होते. त्यांना आपल्या पत्नीची आठवण झाली. ‘ पोपटला सांभाळा ’ अशी तिची विनंति होती. पोपट कोठें आहे ? पोपट उडून गेला ! !



संध्याकाळ झाली होती. रस्त्यांतून मोटारींची जा ये सतत चालली होती. म्युनिसिपल शाळेंतील मुलांनीं फाटकासमोर उभें राहून हांक दिली “ पोपट ! ”

अ भ्या स

१. या गोष्टीला लेखकानें ‘ अंगणांतील पोपट ’ असें नांव कां दिलें आहे ?
२. पोपटांत व पोपटलालांत सारखेपणा कोणता आहे ?
३. ‘ सगळे लोक माझ्यावर रागावले आहेत ’ असा भ्रम पोपटलालला होण्यास कोणतीं कारणें झालीं ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. 'नेत्रासमोर सूर्य फिरूं लागले', 'बाळवाटी', 'महामंत्र', 'जात्या मातेचें', 'ब्रह्मांड' यांचे अर्थ सांगा.

५. या गोष्टीचा शेवट दुःखकारक झाला आहे. तो आनंदकारक करून दाखवा. त्यासाठीं जरूर तो मजकूर गाळून, नवीन मजकूर तयार करून घाला.

६. 'इस्टेट' या शब्दाप्रमाणें इंग्रजी भाषेंतून मराठींत रूढ झालेले दहा शब्द सांगा व त्यांस शुद्ध मराठी पर्याय सुचवा.

७. पृ. ११५ वरील अधोरेखीत वाक्य गोष्टींत तीन ठिकाणीं सहेतुक घातलें आहे. तो हेतू कोणता असावा? तें वाक्य वाचून मनावर काय परिणाम होतो?

स्वाध्याय

१. ही गोष्ट पोपटलालच्या मावशीला आपल्या एका मैत्रिणीला सांगावयाची आहे. तर कशी सांगेल? त्याचप्रमाणें गोष्ट लिहून काढा.

---

१७. कोवळी कळी

न. रा. पारसनीस

एप्रिल महिन्यांतले ते दिवस. ऊन म्हणजे मी म्हणत होतें! त्यांतून भर दुपारची वेळ. उकाडा म्हणजे कोण होत होता! झोंप घ्यावी म्हणून जरासा पडलों होतों; पण झोंप म्हणून येईना. येईल कशी? बाहेर रस्त्यावर मुलांचा केवढा गोंगाट चालला होता!

मला राग आला त्यांचा. मी ताडकन् उठलों व गच्चींत येऊन उभा राहिलों.

त्यांचा चेंडूफळीचा खेळ अगदीं ऐन रंगांत आला होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माझ्या मनांत आलें कीं, त्यांना खूप शिव्या हांसडाव्या, म्हणजे तरी गप्प बसतील कांटीं ! पण—

मी त्यांना बोलणार कोण ? बोलून चालून मी तिथें परका. कारण त्या घरचा पाहुणा होतों मी.

गच्चीच्या लोखंडी कठड्यावर कोंपर टेकलें व त्या हाताच्या तळव्यावर हनुवटी अलगज ठेविली.

मीहि तो खेळ पहावयास लागलों.

तोंच वाळूंत खेळत असलेली एक लहान बालिका पाहिली. वाळूचा ढीग शेजारच्या घरभिंतीला लागून होता, व त्यापुढेंच मुलांचा—उनाड कार्ट्यांचा—खेळ चालला होता.

त्या ओलसर वाळूंत लहान लहान बोगदे करण्यांत ती बालिका गुंगून गेली होती.

तिच्याकडे अगदीं निरखून पाहूं लागलों मीं. समाधान कसें तें होईनाच !

त्या सुंदर बालिकेनें माझें मन तेव्हांच वेधलें.

मनाला प्रश्न केला मी, "ही सुरेख मुलगी कोणाची बरें असावी ? आणि अशा भर उन्हांत खेळून ती काळवंडून नाहीं का जाणार ?"

किती नाजुक ती दिसत होती ! तिची ती गौरकान्ति पाहून भारी कौतुक वाटलें मला. नाक तरी किती सरळ ! जशी कांहीं सोनचाफ्याची कळीच ! तिच्या त्या चंचल मोहक डोळ्यांनीं तर मी अगदीं वेडावून गेलों. तिचा तो मार्दवयुक्त निरागस मुखचंद्रमा पाहून तर वाटलें कीं, खालीं जाऊन तिला जवळ घ्यावें. तिचे लालबुंद गाल खरोखरीच दोन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उमलते गुलाब भासले. आधींच गोरी गोरी पान, अन् शिवाय भर उन्हांत खेळ्त होती ती !

इतक्यांत त्या कार्ट्यांचा चेंडू मला लागला व मजजवळ गच्चींत येऊन पडला. रबराचाच चेंडू तो मला कितीसा लागणार ?

सगळीं मुलें जमलीं गच्चीखालीं चेंडूसाठीं. आणि अगदीं केविलवाण्या स्वरांत चेंडू मागूं लागलीं.

माझ्या तोंडावर मी उसना राग आणिला, आणि जरा कांहीं बोलणार तोंच, त्या वाळूच्या ढिगाकडून गोडसा आवाज आला.

" नका हो देऊं चेंडू, मला नाहीं घेतलें हो त्यांनीं खेळायला ! "

ती त्या ढिगावर उभी होती. तिचीं दोन्हीं पाउलें वाळूंत बुडून गेलीं होतीं. तिचे दोन्ही हात कंबरेवर होते. व तिची चंचल आणि मोहक दृष्टि मजकडे होती.

कां कुणास ठाऊक ! तिचें म्हणणें मला न पटून कीं काय मी तो चेंडू पोरांना देऊन टाकला !

तोंच साऱ्या पोरांनीं 'कशी झाली एका मुलीची फ....' म्हणून एकच गोंगाट केला.

अरेरे ! तिचें दुर्मुखलेलें मुख माझ्यानें पहावेना.

मनांत आलें कीं, एक क्रिकेटचा अगदीं नवा सेट घेऊन द्यावा त्या बालिकेला. तसा मी श्रीमंत होतों.

पण दुसऱ्या क्षणींच पाहतों तों ती बालिका पुन्हा वाळूंत बोगदे करण्यांत गढून गेली. किती सुखी तें बालमन !

माझ्या डोक्यांत मात्र विचारांचें काहूर उठलें. माझी ही धाकटी बहीण असती तर किती मी तिचे लाड पुरविले असते ! तिला कपडे तरी कसे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुरेख आणि छानदार घातले असते ! आणि अगदीं मोजक्याच पण नमुनेदार अलंकारांनीं अशी कांहीं तिला सजविली असती म्हणतां....मग तिला असें उन्हांत, रस्त्यावर, मातींत खेळूं दिलें असतें काय ? छे, तिच्यासाठीं लताकुंजांचा छोटासा बगिचा तयार केलेला असता मी आणि सांगितलें असतें तिला कीं, तूं आपली कारंजाजवळील कमळाशींच खेळत जा. शिवाय नानातऱ्हेचें खेळाचें सामान आणून दिलें असतें एवढेंच काय पण मीहि तिच्याशीं तासन् तास खेळत बसलों असतों. तिच्यासाठीं एखादें हरणसुद्धां पाळलें असतें मी.

पण काय—?

तिच्या त्या दरिद्री वेषाकडे पाहून मला तिच्या आईबापांचा मोठा राग आला. किती कोवळी, किती नाजुक पोर ! राजकन्याच जशी कांहीं !

जाड्याभरड्या खादीचें मळकट पोलकें होतें तिच्या अंगांत, अन् काळसर चिटाचा पांढऱ्या ठिपक्या ठिपक्यांचा विटलेला परकर दिला होता घालायला. हातांत पारव्या रंगाच्या दोन रेशमी बांगड्या होत्या. नाहीं म्हणायला कानांत लाल लोलक डुलत होते. केंस तर किती मळकट दिसत होते ! तरी पण तिच्या प्रफुल्ल गालावर विश्रब्धपणें विहार करणारे व कर्णाग्रांना झांकून टाकणारे ते मोकळे केस किती मनोहर दिसत होते म्हणून सांगूं ?

तिला पाहून मला एका कवितेची मात्र आठवण झाली.

'ताजी कळी तूं कोवळी
राही कुठेंही मोकळी.'

पण म्हटलें, कविमहाशयाला काय होतें असें म्हणायला ? आबाळ झालेली अशी कोवळी कळी कोमेजून गेली म्हणजे मग....

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्या सौंदर्यकमलानें मी मोहित होऊन गेलों. त्या लावण्याच्या शीतल तेजामुळें मला प्रखर उन्हाची विस्मृति झाली. आणि 'सरसिजमनुविद्धं शैवलेनापि रम्यम्' हें कविवचन पटलें.

इतक्यांत एका आडदांड कार्ट्यानें जो म्हणताय् टोला लगावला, तो त्या बालिकेजवळ रप्दिशीं जाऊन पडला. बरें तर बरें, तो तिच्याजवळच पडला. नाहींतर तिला खास लागला असता व....

तिला तो लागला असता तर,—या एकाच विचारानें माझें हृदय धडधडूं लागलें.

बिचारीचे वाळूचे बोगदे मात्र सर्व मोडून गेले. तिनें एकदम रडावयास सुरुवात केली. व चिडून तो चेंडू आपल्या परकराच्या ओच्यांत लपवून ठेवला.

पोरांनीं एकच गिल्ला केला.

रडक्या आवाजांत पण निश्चयानें ती म्हणत होती, "मला खेळायला घेतलं नाहीं, आतां देतच नाहीं जा चेंडू.

घोळक्यांतला एक समंजस मुलगा तिला म्हणाला, वा ग वा, बायका का कुठें क्रिकेट खेळतात ?"

"हो, हो, खेळतात जा." चिडक्या आवाजांत तिनें उत्तर दिलें. "अन् माझे बोगदे मोडले ते ! द्या आतां भरून."

दुसरा वात्रट मुलगा म्हणाला, "तुला भरून पाहिजेत काय ? तर मग हे घे." असें म्हणून त्या निर्लज्जानें तिच्यावर एक वाळूची मूठ उधळून दिली. त्याचें अनुकरण व्हावयास काय उशीर ? तीनचार मुठी वाळू तिच्यावर उधळिली गेली.

तिचे कपडे मात्र जास्त मळले व केंसांत वाळूचे कण जाऊन बसले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सामोपचारानें चेंडू परत मिळत नाहीं असें पाहून 'घ्या हिसकून' असें एकजण ओरडला.



दोन तीन मुलें तिच्याशीं झोंबूं लागलीं.

त्याबरोबर "आई ऽ अ ऽ" अशी तिनें जोरानें हांक मारली.

माझ्या मनांत आलें कीं, मोठ्यांदा ओरडून मुलांना गप्प बसवावें. पण,—मी परका. त्यांनीं माझें जर का ऐकलें नाहीं, तर शोभा मात्र माझी व्हावयाची.

काय होतें तें पहावें म्हणून मी क्षणभर स्तब्धच राहिलों.

त्या हिसकाहिसकींत मुलांनीं चेंडू परत मिळविला. आणि मोठ्या दिमाखानें पुन्हां खेळूं लागले.

पण ती बालिका मात्र मुळूमुळू रडूं लागली. कारण त्या झोंबाझोंबींत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिचें पोलकें खांद्यावर फाटलें गेलें. त्याबद्दल मार बसणार,—हो, अशीच शंका तिच्या मनांत आली असावी.

तें पाहून माझें हृदय द्रवलें. डोळ्यास हात लावून पाहतों, तों पाणी लागलें. काय वात्रट कार्टी ! त्या गरीब मुलीचें पोलकें फाडलं !

तोंच वाळूच्या ढिगाजवळच्या घरांतून एक स्त्री बाहेर आली. हात राखेनें भरले होते तिचे. भांडीं घाशीत असावी कदाचित्. तिच्या तोंडांतून कितीतरी जळजळीत शब्द बाहेर पडले.

" कमळे, हें ग काय ? कार्टे, अंग किती मळवलंस. तासन् तास उन्हांत खेळतीस, कांहीं लाज तरी आहे का तुला ?—आणि हें काय ? केंसांत माती—"

" मी नाहीं ग, त्या मधूनेंच—" डोळे पुशीत ती मुलगी म्हणाली.

" अन् हें काय ? पोलकें फाडलंस ? थांब सटवे, तुला घरांत कोंडूनच ठेवतें. मग पाहतें कशी खेळतीस पोरांत ती ! " असें म्हणून तिनें राखेनें भरलेल्या हाताचा एक जोराचा रपाटा तिच्या–कमलच्या–पाठीवर मारला, व फरफर ओढीत तिला घरांत नेलें.

कमलच्या किंकाळीनें माझ्या हृदयांत चर्रर झालें.

हें मी काय पहात आहें ? ती तिची आई म्हणावयाची कीं क्रूर राक्षसीण. मला पुढें विचारच करवेना. डोळ्यांपुढें अंधेरी आल्यासारखें झालें.

माझ्या मनांतल्या मनांत उद्गार निघाला, " कमल, तूं म्हणजे लावण्यलतिका ! किती सुंदर ! किती सुकुमार ! पण कोण तुझी ही केविलवाणी स्थिति ! ! "

............खरेंच, दारिद्र्याच्या प्रखर उन्हांत अशा कित्येक कोवळ्या कळ्या कोमेजून जात असतील !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. यापूर्वी वाचलेल्या धड्यांतील परिच्छेद व या गोष्टींतील परिच्छेद यांतील फरक पहा. थोड्या व लहान वाक्यांच्या परिच्छेदामुळें तुमच्या मनावर काय परिणाम होतो ?

२. एकाद्यानें आपल्या मनाशींच बोलावें अशी भाषा व क्वचित् ठिकाणीं व्यवहारांतील अशुद्ध बोली या गोष्टींत वापरली आहे. कुठें कुठें वाक्यांतील शब्दांचा नेहमींचा अनुक्रम बदललेला आढळेल अशीं वाक्यें शोधून काढा.

३. ही कोवळी कळी "**दारिद्र्याच्या** प्रखर उन्हांत कोमेजली" असें लेखक म्हणतो हें कारण तुम्हांला पटतें का ? मुलीची जी स्थिति वर्णन केली आहे तिला दारिद्र्यच मुख्यत: कारण आहे काय ? मागील गोष्टींतील पोपटलाल कशानें मेला ? दारिद्र्यानें ? दोन्ही गोष्टींची या बाबतींत तुलना करा.

स्वाध्याय

१. अलगज, निरागस, विश्रब्ध, गिल्ला या शब्दांच्या विरुद्ध अर्थाचे शब्द कोशांतून शोधून काढून वाक्यांत योजा.

१८. चुरगाळलेला पतंग

प्र. के. अत्रे

सहा वाजून गेले असतील. भिंतीवर सावल्या उतरूं लागल्या होत्या. कौलारावर सोनेरी उन्हें अजून रेंगाळत होतीं. बोळाच्या तोंडाशीं छोटा रामू उभा होता. पतंग उडवीत होता तो. पतंग कसला ? कागदाचा एक लहानसा तुकडा. कसातरी वेडा-वांकडा फाडलेला. एका कोंपऱ्याला त्याच्या चिंधी बांधलेली; आणि दुसऱ्या कोंपऱ्याला एक दोरा. साखरेच्या पुड्याचा सोडलेला. आईनेंच पतंग करून दिला होता त्याला तो.

प्रल्हाद केशव अत्रे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चिमुकला त्याचा हात. कर्दळीच्या कोंबासारखा. निमूळता व नाजुक. पतंगाला हिसके देतांना वरखालीं नाचे. आणि तोंडही किंचित् वर उचललेलें. अर्ध्या उमलत्या फुलांच्या गेंदाप्रमाणें. गालावर लालभडक ठिपके. जशा कांहीं जास्वंदीच्या कळ्या चिरडलेल्या त्याजवर. पतंग वर उडाला कीं गालावर हंसूं उमले. खालीं आला कीं हंसूं मावळे. पतंग गिरक्या खाई, तशी त्याची चिमुकली मानहि ऐटींत हले. कमळाच्या देठासारखी मागेंपुढें.

इतक्यांत वाऱ्याची झुळूक आली. पतंग भरकन् वर उडाला, आणि

शेजारीं माडी होती एक बैठी, तिच्या कठड्यांत जाऊन अडकला. रामूचा हात वरच्या वरच राहिला. आणि दोरा थोडासा सैल पडला.

पतंग खालीं कसा काढायचा ? रामूच्या इवल्याशा भुंवया उंचावल्या. चिमण्या ओंठांना मुरड पडली. गालाच्या खळग्यांतलें हंसूं ओघळलें.

माडीच्या सज्जांत कोणसें बसलें होतें. कोण कोणास ठाऊक ! कठड्याच्या गजांतून मोठमोठ्या मिशा दिसत होत्या. रामूनें कलत्या मानेनें वर पाहिलें. त्याला भीतीच वाटली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"अहो—अहो—तो पतंग टाकतां का?" शेवटीं रामूनें धीर केला आणि अगदीं भीत भीत विचारलें. फांदीवर चिमणी किलबिलते ना? तसा त्याचा आवाज.

माडीवरच्या मिशा हलल्यासारख्या वाटल्या. रामूचा थरकांप झाला अगदीं! त्याचीं बुबुळें थरकलीं. पापण्या उघडझांप करूं लागल्या.

"अहो, टाका ना माझा पतंग खालीं!" थोडें थांबून फिरून रामूनें विचारलें. केविलवाण्या सुरानें विचारलें अगदीं. त्यानें कठड्याकडे पाहिलें नाहीं. त्याचा धीरच झाला नाहीं. त्याची नजर माडीच्या आढ्याकडे होती.

फिरून मिशा जोरानें हलल्या. वटारलेले लाल डोळे कठड्याच्या गजांतून डोकावले. ढग गडगडावा तसें कोणीसें गरजलें, आणि कागदाचा एक चुरगाळलेला गोळा खालीं पडला. तसा रामूच्या हातांतला दोराहि मागें आला.

रामूच्या पोटांत गलबललें. त्याचें चिमणें काळीजच कुणीं चुरडलें. त्याला रडतांदेखील येईना. रडूं गळ्यांतच कोंदलें जसें. त्यानें मान खालीं घातली, आणि मिटल्या मुठीनें डोळे पुशीत तो हळुहळू मागें फिरला. त्याच्या दुसऱ्या हातांत दोरा होता, आणि दोऱ्याच्या टोंकाला चुरगाळलेला गोळा! तोहि तसाच फरफटत जात होता रामूच्या मागून!

रामूचा पतंग होता तो!

अभ्यास

१. या गोष्टींत लहान मुलाच्या आनंदाचें व दुःखाचें चित्र थोड्या शब्दांत रेखाटलें आहे. 'कोवळी कळी' या गोष्टींतील मुलगी व 'रामू' यांत तुम्हांला कोणता सारखेपणा वाटतो?

२. गोष्टीची सुरवात व शेवट यांत तुम्हांला काय फरक दिसतो तो शोधा व त्यामुळें तुमच्या मनावर गोष्ट वाचतांना कसकसा परिणाम होतो तो सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. गच्चीवर मनुष्य होता असें लेखकानें स्पष्टपणें कां सांगितलें नाहीं ?
४. या व पहिल्या गोष्टीचा शेवट वाईट केला आहे याबद्दल तुम्हांला काय वाटतें ? तुम्ही या गोष्टीचा शेवट कसा कराल ?

स्वाध्याय

१. रामूची हालचाल किंवा त्याचें चित्र मनांत नीट ठसावें म्हणून लेखकानें कोणत्या उपमा वापरल्या आहेत ? हात, तोंड, ओंठ व केस यांना अशा तऱ्हेच्या उपमा सुचवा.

२. रेंगाळणें, थरकणें, ओघळणें, फरफटणें या क्रियापदांऐवजीं दुसरे शब्द घालून तितका चांगला अर्थ मनांत उतरतो कीं काय तें ठरवा.

३. रामू घरीं आल्यावर आईच्या कुशींत शिरून तिला झालेली हकीकत सांगतो आहे असें कल्पून भाषण लिहा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१९. अप्पांची बैलांची जोडी

कुमार रघुवीर



जवळजवळ ऐशींच्या घरांत वय गेलेलें; पण अप्पांचें शरीर म्हणजे नुसती उभी काठी ! अन् चालणें तरी किती भरभर ? उत्साहाचें वारें अंगीं पुरेपुर जणूं काय भरलेलें !

म्हातारा उद्योगीही तितकाच जबरा ! कामांत काम करण्याची मोठी हातोटी त्याची; पुन्हा सारें होतां होईतों स्वतः करायचें ! सूनबाई न् मुलगा न् गडी....कोणाची मग मिजास नको चालायला मागून !

थंडी असो का महा थंडी असो, अप्पा दुसऱ्या कोंबड्यानंतर कधींच पडून नाहीं राहायचे अंथरुणांत. प्रातर्विधी आटोपले कीं तोंडानें भूपाळ्या गुणगुणत खराट्यानें मागच्या पुढच्या अंगणांतील किंवा माजघरांतील केर काढायला सुरवात व्हायची ! नातवांचे किंवा स्वतःचे लहानमोठे कपडे धूत बस, घराभोंवतालचें गवतच काढायला घे....त्यांना एकंदरींत पुष्कळ उद्योग सांपडत ! स्वावलंबन ही अप्पांच्या आयुष्यक्रमाचीच गुरुकिल्ली, तर नित्याच्या कामांचा कसला प्रश्न राहिला ?

कोल्ह्याचोरांच्या भीतीनें कुठें वाड्याच्या वईला झालेलीं 'गोपटीं'च नीट करून घे, टोणग्याला ओढतांना जड पडूं नये म्हणून रहाटांतच वंगण घाल, पाण्याची कुंडी नाहींतर 'चोप'च खराट्यानें धूत बस;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विहिरींत सोडलेली 'बांड्यांची' माळ नीट करून घे, आवारांतले बांध भरून काढ, कुठें आंब्यांच्या कलमांनाच कुटाखत घालावयाला लाव, असें त्यांचें कांहींना कांहीं तरी सारखें चाललेलें असायचें काम! अगदीं कांहींच नाहीं तर वेळ आल्यास चिंचेची शिपटी घेऊन, 'या ऽऽऽ पप्प ऽऽ !' करीत पाणरहाटाचा टोगणाहि हांकायला त्यांना लाज वाटत नसे!

'डोक्रा'च स्वतः काम करीत असला म्हणजे गडीहि मोठ्या उत्साहानें सारें करीत असत.

मात्र सणावाराला पक्वान्नें किंवा आंब्याच्या दिवसांत आंबे खातांनाहि अप्पा आपल्या गड्यांना विसरत नसत! गड्यांना, 'वावली'साठीं 'तमाख'हि ते रोज नियमानें वांटीत!

शहरांत श्रीमंती–सुख–पैशावर मानतात! पण खेडेगांवांत, मिळणाऱ्या वस्तूंवर व आनंदावर!

वेळच्या वेळीं काम होण्यावरच फक्त 'वाडगो'चा कटाक्ष असल्यामुळें गडी वचकून असले तरी अप्पांबद्दल त्यांना फार प्रेम वाटे!

पण अप्पांना जनावरांची भारी हौस! त्यांचा गोठा नेहमीं दुभत्या गायीम्हशींनीं अन् बैलांनीं भरलेला असे आणि त्यांची निगाहि त्यांनीं तितकीच आस्तेनें राखावी. "त्यांना धू रे, चरायला ने रे, पाणी दाखव रे, गोठा साफ कर रे........" त्यांचे दोन गडी सारखे जनावरांमागेंच असत!

आपल्या सारवटगाडीच्या बैलजोडीची मात्र ते स्वतःच विशेष काळजी घेत. "माझी हिऱ्यासोन्यांची जोडी म्हणजे सारी हिऱ्यासोन्याची संपत्ति आहे माझी संपत्ति!" अप्पा त्यांना थोपटीत मोठ्या अभिमानानें म्हणत; आणि तें अगदीं स्वाभाविक होतें!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सहज त्यांना कोणीं प्रश्न विचारावा, "कुठून पैदा केली ही जोडी तुम्हीं अप्पा ? फार त्रास घेतां बुवा तुम्ही त्यांच्यापायीं, अशा म्हातारपणींसुद्धां !"

"हंऽ चाललंय्....अरे आईविना पोरं आहेत हीं, बाबा !" ते एखाद्या माणसाविषयीं बोलणें चालल्याप्रमाणें सुरवात करून बोलूं लागत, अन् पुढेंहि ते अगदीं सबंध इतिहास सांगत एकेकाचा ! "घरचाच हा 'खोंड' बरं !....माझ्या डोळ्यांदेखत लहानाचा मोठा झाला ! ह्या, हिऱ्याची आई....त्या शिवा पाटलाच्या गोठ्याला आग लागली होती, त्यांतून कशीबशी जळलीपोळलेलीच बाहेर काढली होती ! आमच्या मंगळ्या गड्यानं कसलेंसें औषधमंतर करून तिला बरी केल्यावर दोन वर्षांनीं हा हिऱ्या झाला तिला....हो ! याच गोठ्यांत, इथं !....त्यांतच मेली बिचारी मग ! हल्लीं आमच्या सूनबाईचा तान्हा दूध पितो ना, ती तांबू गाय या हिऱ्याच्या मोठ्या बहिणीची दुसरी मुलगी...."

त्यांना कंटाळून 'अन् हा सोन्या ?' म्हणून उगाच कोठें प्रश्न टाकावा कीं तसाच एखादा इतिहास बाहेर पडून तोहि 'घरगुती खोंड' ठरायचा !

मग ते आपण होऊनच त्यांच्या त्या जोडीविषयीं वर्णन करूं लागत. "प्रथम गाडीला काढतांना फारच त्रास दिला हो शिंच्यांनीं ! मस्त लेकाचे ! धावतां धावतां गाडी कुठं तरी नेत रस्त्याच्या कडेला ! पण मग थोड्या संवयीनं गुलाम असे छानदार चालींत धांवूं लागले म्हणतां, कीं तो सातपाटीचा करीमसाहेब....हं, तोच लागला माझ्या मागं....म्हणाला, 'वाटेल ती रक्कम घे,' पण...."

ते लांबूं लागले कीं त्यांना पुन्हां आठवण करून द्यावी लागे; अप्पांचे हिऱ्यासोन्यांवर प्रेमच तसें अतोनात ! त्यांच्याविषयींची एखादी लहानसानशी आठवणहि त्यांना मोलाची वाटे !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अप्पांच्या चिरंजीवांनीं आपण एक घोड्याचा टांगा ठेवूं म्हणून सहज त्यांच्याकडे मागें एकदां गोष्ट काढली, तेव्हां ते किती मोठ्यानें त्याच्यावर खेंकसले !

त्यांच्या एका सावकारमित्रानें स्वतः मोटार घेतली त्या वेळीं अप्पांनाहि त्यानें घ्यावयाचा आग्रह केला; अप्पा आपल्या हिऱ्या—सोन्यांच्या पाठीवर थोपटीत म्हणाले, "या सजीव जोडीची गाडी सोडून मला तुमच्यासारखी निर्जीव मोटार नको !"

अप्पांनीं रोज आंघोळीपूर्वीं स्वतः हिऱ्या—सोन्यांना धुवावें, दाणावैरण चारावी अन् पाणी दाखवावें. गवताच्या पेंढ्या तेवढ्या, गडी आणून सोडीत असे त्यांच्यापुढें.

कुठेंहि काम असलें कीं, हिऱ्या—सोन्याला जुंपून ते आपल्या सारवट गाडींतून बाहेर निघत ! जोडी जोडायची आपण स्वतः, शिवळजोतं देखील सैल, घट्ट काय तें आपणच बांधायचें त्यांचें !

पागा हातांत घेऊन अप्पांनीं हांक मारली कीं, ते चालूं लागत. शेपट्या पिळायला नकोत, कीं पराणी मारायला नको ! एकदां खोकून अप्पांनीं इषारा दिला कीं जोडी चौखुर धांवूं लागे !

पाऊसपाणी चांगलें व्हावें. दसऱ्याला भरघोस कणसें दारावरल्या तोरणांत लटकावींत ! कापणीमळणी संपल्याचे निरोप आले कीं, चालले अप्पा हिऱ्या—सोन्यांच्या सारवट गाडींतून, मोठ्या पहांटेस, खंडाच्या मापणीला, दहादहा मैलांवरच्या आपल्या शेतावर ! म्हाताऱ्याला अजूनहि या गोष्टीचा कंटाळा येत नसे.

पूर्वेकडे फटफटीत झालें आहे, काबाडी गाड्यांच्या चाकांचा खडखड आवाज ऐकूं येत आहे ! रस्त्याला लागूनच पण जरा आंत असलेल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शेतांतील झोंपड्यांजवळ धनगरी कुत्रीं भुंकत आहेत व कोंबडे आरवत आहेत! दळणाला मांडलेल्या जात्यांचा घरघर आवाज ऐकूं येत आहे व पक्ष्यांचा किलबिलाट सुरू झाला आहे!....

अशा वेळीं अप्पांची गाडी खडीच्या खडबडीत रस्त्यावरून खेड्याकडे जाणाऱ्या, एखाद्या मऊ मातीच्या गराडींत उतरत असे! सूर्यबिंब नुकतेंच वर येत असलें तर अप्पांनीं पागांसकट हात वर करून सूर्यनारायणाला भक्तिभावानें नमस्कार करावा! त्या मऊ मातींतून गाडीचीं चाकें शांतपणें घसरत असल्यामुळें, हिऱ्या–सोन्यांच्या गळ्यांतील घुंगरांचा मंजुळ ध्वनि तेवढाच सारखा ऐकूं येई!

गराडीजवळ बाभळीचीं झुडपें, गाडीच्या तट्ट्याला ओरबडून मागें जात आहेत! गराडीच्या मधल्या उंचवट्यावर वाढलेल्या करवंदीच्या जाळ्या मधून मधून गाडीच्या धुरांडाखालून मागें निसटत आहेत! कमरेला बांडीं–कोयता लटकावून, काथ्याच्या दोराच्या साह्यानें ताडांच्या झाडांवर चढणारे उतरणारे भंडारी किंवा लांबर गवती नंबरांतून गवताच्या मोठमोठ्या राशींच्या जवळपास कामास सुरुवात करणारे काथोडी दिसत आहेत!....

अप्पा असे इकडेतिकडे पाहत असतां, हिऱ्या–सोन्यांनीं, आपल्या गळ्यांतल्या घुंगुरांच्या तालावर, गराडीच्या चाकोरींतील तांबसर मऊ मातींतून गाडी जोरांत पुढें न्यावी!

अप्पांनाहि त्यांची काळजी असे! अर्धी चाल झाली कीं विसांव्याकरितां एखादी छायेची जागा पाहून त्यांनीं गाडी थोडा वेळ उभी करावी, हिऱ्या–सोन्यांना थोपटावें, त्यांच्या शिंगाजवळ खाजवावें, दोनचार खुरासणीच्या पेंडीचे तुकडे चारावेत, जोतींशिवळ सैल करून पुन्हां बांधावीं कीं, नुसत्या हातांतल्या पागांच्या इषाऱ्यावर दौड करावयास हिऱ्या–सोन्या पुन्हां आपले आनंदानें तयार!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मापाचें वगैरे काम झालें कीं, संध्याकाळीं सूर्य थोडा खालीं कलल्यावर थंड वेळीं परत फिरावें; घरच्या ओढीनें हिऱ्या–सोन्या सारख्या चालीनें धावूं लागत ! गराडा सोडून रस्त्याला लागेपर्यंत सांज होऊन बराच काळोख पसरलेला असे !

नुकत्याच घराकडे परतलेल्या गुरांच्या पावलांनीं उडालेला धुरळा सर्व बाजूस हवेंत पसरला आहे ! जवळपासच्या झोंपड्यांतून एखाददुसरा दिवा मिणमिणत आहे; दमल्याभागल्या पुरुषांचें स्नान चाललें आहे; पोरांच्या खेळाचा आरडाओरड सुरू आहे !....चुलींत घातलेल्या बोंबलांचा किंवा रस्त्याच्या कडेला असलेल्या एकप्रकारच्या झुडपांचा 'भुताटकीनें उकडलेल्या बटाट्यां'सारखा उग्र वास येत आहे !....

अशा समयीं चंद्रप्रकाशामुळें पडलेल्या वडांच्या सावलींतून हिऱ्या-सोन्यांच्या जोडीनें अप्पा बसलेली सारवट गाडी घरीं घेऊन यावी !

अशीं अठरा वर्षें गेलीं होतीं !

जिथें जिथें अप्पांनीं जावें तिथें तिथें हिऱ्या–सोन्यांची जोडी !!

* * * *

हिऱ्या सोन्याकडे बघे !....सोन्या हिऱ्याकडे बघे !!....

आज दोन दिवस अप्पा त्यांना दिसले नव्हते. त्यांना त्यांनीं दाणा-वैरण चारली नव्हती; पाणी दाखवून अंजारलेंगोंजारलें नव्हतें कीं 'हिऱ्याऽ' 'सोन्या' म्हणून नुसती हांकहि मारली नव्हती !

सुरुवातीस थंडीवाऱ्याचें निमित्त होऊन दोनतीन दिवसांत म्हातारा तापानें बिछान्याला खिळून पडला होता, हें बिचाऱ्यांना कसें समजावें ? गडी येऊन त्यांच्यापुढें वैरण ठेवीत....ते खात नसत ! पाणी दाखवीत ....ते पीत नसत ! गवताच्या पेंढ्या सोडीत....त्याला ते शिवतहि नसत !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांना वाटे कीं आतां आपला मालक येईल; आपल्याला प्रेमानें हांक मारील; आपल्याला थरथरत्या हातानें आपल्या थोपटील; व पेंडीचे तुकडे तोंडांत घालून कांहीं तरी बोलत आपल्या मानेला विळखा घालील !

पण त्या सर्व हिऱ्या–सोन्यांच्या कल्पनाच होत्या !

अप्पा तापानें बिछान्यावर तळमळत होते !....आळशीच्या पोटिसाच्या सारख्या शेकानेंहि त्यांचा कफ सैल होत नव्हता !....

वैद्यबुवा म्हणूं लागले होते, "म्हातारं माणूस केव्हांतरी जायचंच !"

पण अप्पांना हिऱ्या–सोन्यांची आठवण झाल्यावांचून रहात नसे! "ते 'डोबे' झाले म्हणून त्यांना विकून टाकाल रे !"–ते मधून मधून ओरडत व त्यांच्या डोळ्यांतून अश्रु टपकूं लागत !

चार दिवसांत हिऱ्या–सोन्यांनीं गवताची काडीहि खाल्ली नव्हती ! पाणी नुसतें हुंगून पाहात ! गोठ्यांतून, पुढल्या अंगणांतील अप्पांच्या नेहमींच्या बसावयाच्या खुर्चीकडे किंवा दाराच्या उंबरठ्याकडे 'ते आतां येतील, मग येतील' अशा दीन उत्कंठेनें पाहून निराशा झाली किंवा घरांतून त्यांच्या कण्हण्याचा क्षीण, पण ओळखीचा आवाज ऐकूं आला कीं, हिऱ्या-सोन्या दोघेहि मोठमोठ्यानें हंबरत !

....आणि तें हंबरणें अप्पांच्या कानीं गेलें कीं तेहि बिछान्यावर पडल्या पडल्या ओरडत; "अरे; त्यांचं दाणा–वैरण झालं का ?....पाणी दाखवायचं राहिलं असेल...."

नाहींतर त्यांनीं चिडखोरपणें ओरडून म्हणावें, "अरे, मी नसलों तर तुम्ही त्यांना उपाशीं मारून टाकाल, मारून !"

पण त्या चालत्या धडधाकट बैलजोडीला मारण्याचा कोणाचाच विचार झाला नाहीं व नसता !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांच्यापुढें सारें येत होतें; पण हिऱ्या–सोन्यांना अप्पा निसत नव्हते ! त्यांचा प्रेमळ हात त्यांच्या पाठीवरून फिरत नव्हता ! त्यांच्या हातचे पेंडीचे तुकडे चघळण्याचा किंवा ते बसलेली स्वारीची गाडी ओढून नेण्याचा आनंद अनुभविण्याची संधीहि त्यांना येत नव्हती !

* * *



शेवटीं एके दिवशीं सकाळीं, लोकांनीं त्यांच्या अप्पांना उचलून अंगणांत आणिलेलें हिऱ्या-सोन्यांना दिसलें ! त्यांच्या जिवाची कोण धडपड !.... मोठ्यामोठ्यानें हंबरून त्यांनीं दावीं तोडण्याचा प्रयत्न केला ! हिऱ्या मोकळा होऊन अंगणाकडे येऊं लागला तोंच त्याला एका गड्यानें पुन्हां दोरानें भक्कम बांधलें !

ते मोठमोठ्यानें हंबरतच होते ! पण अप्पा कांहीं बोलले नाहींत कीं त्यांच्याजवळहि आले नाहींत !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिऱ्या–सोन्यांच्या देखतच, लोकांनीं आप्पांना उचलून, फाटकाबाहेर लांब, अगदीं लांब नेलें !

आश्चर्यमिश्रित दु:खानें ते सतत मोठ्यानें हंबरून जणूं बोलूं लागले, " अप्पा, या हो या ! तुम्हीं भेटलां नाहींत म्हणून आम्ही उपाशीं आहोंत ! पाठीवरून नुसता हात फिरवून आम्हांला प्रेमानें थोपटा तरी ! "

पण अप्पा आले नाहींतच ! दोन दोन रपाटे मात्र बसले त्यांच्या पाठींत काठीचे ! ' वाघ खाययेन्....बुगाच वरडायां रोग आलाया का आं ?...." गोवाऱ्याकडे दीनपणें टक लावून पाहत माराच्या भीतीनें हिऱ्या–सोन्या स्तब्ध राहिले !

मुक्या हृदयाच्या भावना हृदयांतल्या हृदयांत धुमसूं लागल्या ! आधीं वाचा नव्हतीच; पण आतां भाव प्रकट करणेंहि अशक्य झालें !

पशुहृदयालाहि प्रेमाचा ओलावा व भावभावना असतात हें मानवी हृदयाला समजलेंच नाहीं !

* * *

दुसऱ्या दिवशीं सकाळीं हिऱ्या–सोन्याची जोडी एकमेकांच्या मानेजवळ मान टाकून मरून पडली होती !

हा असा चमत्कार घडला तरी कसा हें शेजाऱ्यापाजाऱ्यांना कोडेंच पडलें !

शोक आवरून आप्पांचे चिरंजीव बाहेर येऊन पाहतात तों त्यांनाहि आश्चर्य वाटलें !....

त्यांत गाडीला चांगली चालणारी सुदृढ जोडी एकदम अनपेक्षित मेली याबद्दलचें दु:खच जास्त डोकावत होतें !

शेवटीं सर्वांनुमतें ठरलें कीं, कोणतें तरी विषारी किरडूं रात्रीं चावून हिऱ्यासोन्या मेले !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिऱ्या–सोन्यांचा अंत विषामुळें झाला होता, कीं अमृतामुळें हें मात्र खुद्द त्यांचें त्यांनाच ठाऊक !

* * *

महारांनीं त्यांना उलटें करून कातडें काढण्यासाठीं वांशावर घालून नेईपर्यंत शेजारच्या बंडूनानांचा अरूण त्यांच्याकडे कुतूहलपूर्ण दृष्टीनें पाहत होता !

बंडूनानांनीं हांक मारली तरी तो हिऱ्या–सोन्यांच्या अश्रूंनीं डबडबलेल्या डोळ्यांकडेच पाहत राहिला !

त्यानें जरा आणखी खालीं वांकून पाहिलें असतें तर त्यांत त्याला स्वतःचेंच प्रतिबिंब दिसलें असतें !

महार उचलूं लागतांच अरुणचे बालिश कोमल डोळेहि आंसवांनीं भरूं लागले !

तोंच बंडूनाना त्याच्यावर ओरडले, "अरेऽ....मी काय म्हणतोंय् मघांपासून, तें तुला ऐकूं येतंय् कीं नाहीं, एऽ बैलोबा ? !"

अ भ्या स

१. या गोष्टींत अद्भुत वर्णन नसूनहि ही गोष्ट शेवटपर्यंत वाचावीशी वाटते याचें कारण हें 'रसाळ शब्दचित्र' आहे. यांत कोणता रस आहे व कोणतीं चित्रें आहेत तें शोधून काढा.

२. अप्पांचें बैलांवर अत्यंत प्रेम असून त्यांच्याबद्दल अभिमान होता असें दाखविणारीं वाक्यें निवडा.

३. माहीम तालुक्यांतील एका खेडेगांवांतील ही हकीकत आहे असें भासविण्यासाठीं मुद्दाम कांहीं 'स्थानिक' शब्द वापरले आहेत. [वई=कुंपण; गोपटे=कुंपणांतलें भगदाड; चोप=माडाच्या बुंध्याची पन्हळ; बांडी=पाणरहाटाचें मडकें; वाडगो, डोका=म्हातारा; खोंड=गोऱ्हा; शिवळ जोतं=जुवाची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खुंटी व पट्टा; पागा = दोर; कावाडी = खटारा; गराड = चाकोऱ्यामध्यें उंचवटा असलेली कच्ची गाडीवाट; धुराण = जूं जोडावयाचीं दोन लांकडें; काथोडी = गवत कापणारी एक फिरत्या लोकांची जात; भुताटकीचे वटाटे = रानटी कंद; वावली = विडी.]

४. 'शेजाऱ्या-पाजाऱ्यांना कोडें पडलें' या वाक्यापुढील मजकुराचा गोष्टीच्या मुख्य संविधानकास उपयोग आहे किंवा नाहीं? तुमच्या उत्तराचीं कारणें सांगा.

स्वाध्याय

१. गोष्टींतील, 'स्थानिक' शब्दाऐवजीं तुमच्या प्रांतांतील खेडवळ शब्द योजा.

२. अप्पांच्या स्वभावाचें व दिनचर्येचें स्वतःच्या शब्दांत २० ओळींत वर्णन करा.

३. या गोष्टींतून केवळ खेड्यांतच आढळणारे देखावे, व्यवसाय, चालीरीती निवडून नंतर तुमच्या माहितीच्या खेडेगांवांतील रहाणीचें वर्णन करा.

४. तुम्हांला गोष्टीचा शेवट दुःखांत झालेला आवडतो कीं आनंदांत? ह्या गोष्टीचा शेवट बदलणें शक्य नाहीं असें तुम्हांला वाटत असल्यास त्याला गोष्टींतच काय कारणें सांपडतील?

५. जनावरांचें व मालकांचें एकमेकांवर असलेल्या प्रेमाच्या दोन ऐतिहासिक गोष्टी किंवा दंतकथा (कुत्रा, घोडा याविषयीं) सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विनोद

.२०. आमचे बैठे खेळ

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

वाचतांना किंवा ऐकतांना गुदगुदल्या होतील, गम्मतच गम्मत वाटेल व खुसु खुसु हंसू येईल असें लिहिणें फारच थोड्यांना साधतें. त्यामुळें असले लेख इतर लेखांच्या मानानें कमीच वाचावयास सांपडतात. अशा तऱ्हेचे लेख लिहिण्याची पहिली सुरवात कोल्हटकरांनीं केली आणि मग का. न. पटवर्धन, गडकरी, चिं. वि. जोशी, कॅप्टन लिमये वगैरे लेखक त्यांचें अनुकरण करून लिहूं लागले. कोल्हटकरांनीं (जन्म १८७१–मृत्यू १९३४) नाटकें, कविता, कादंबऱ्या, गोष्टी, निबंध वगैरे कितीतरी लिहिलें आहे. पण मराठी वाङ्मयांत त्यांचें नांव जर कोणत्या एका गोष्टीमुळें अजरामर झालें असेल, तर या गमतीच्या विनोदी लेखांमुळेंच होय. आणि याकरितांच त्यांस 'मराठी विनोदाचे जनक' म्हणून विद्वानांकडून बहुमानपूर्वक संबोधिलें जातें. तेथें घेतलेला उतारा त्यांच्या 'सुदाम्याचे पोहे' या विनोदी लेखसंग्रहांतून घेतला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कधीं कधीं एकाद्या क्षुल्लक गोष्टीमुळेंहि आयुष्यक्रमाला निराळेंच

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

वळण मिळाल्याचे अनेक दाखले इतिहासांत सांपडतात. मिसर देशाच्या एका राणीचें नाक सरळ होतें म्हणून जगाच्या इतिहासांत मोठमोठाल्या घडामोडी झाल्या असें म्हणतात. तसाच कांहींसा प्रकार " तुम्हीं आजपर्यंत बुदबळांतले घोडे दिसत होतां, पण टेनिसचा खेळ पाहून पाहून आतां थेट उंटासारखे दिसायला लागलांत. " या माझ्या एका स्नेह्यानें माझ्या मानेबद्दल काढलेल्या उद्गारांनीं घडवून आणिला. त्यामुळें बुदबळाचा डाव असतो तरी कसा याबद्दल मला उत्कंठा उत्पन्न झाली. लागलींच मीं बाजारांत जाऊन हत्ती, घोडे, उंट, प्यादे, वजीर, राजा आदिकरून सर्व चतुरंग सेना तिच्या रणक्षेत्रासह १-१॥ रुपयांत खरेदी केली, आणि बंडूनानांबरोबर रोज नेमानें बुदबळें खेळण्यास सुरवात केली. या चतुरंग सेनेस रहाण्याचा व खाण्याचा खर्च तर मुळींच लागत नव्हता. खेळणें आटपलें म्हणजे हत्तीची सोंड वजिराच्या कमरेभोंवतीं व उंटाची मान राजाच्या गळ्यांत, अशा थाटानें मी त्या सर्व सैन्यास रणक्षेत्रांत कोंडून ठेवीत असें. पण त्यांपैकीं एकानें तरी हूं कीं चूं केलें असेल तर शपथ ! एकदां तर उदबत्त्यांच्या सोंगट्या कमीं पडल्या असें पाहून मीं प्रत्येकाच्या डोक्यास एक छिद्र पाडून त्यांत एक एक उदबत्ती ठेवून दिली, तरी एकानेंही कुरकुर केली नाहीं; व आमचें जेवण चाललें असतां हत्तीनें सोंड किंवा उंटानें मान लांबवून एक पक्वान्नहि पळविलें नाहीं. खेळ चालू असतांना तांबडीं आणि हिरवीं मोहरीं एकमेकांस वैऱ्यांसारखीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लेखीत खरीं, पण खेळ आटपल्यावर भारती योद्धयांनींहि त्यांच्यापासून धडा घ्यावा असें त्यांचें परस्परांशीं साळसूदपणाचें वर्तन असे.

हत्ती समोर व तिरकस गतीनें वाटेल तितका दूर एका झांपेसरसा जातो, घोडा अडीच घरें चालतो, इत्यादि गतींचे नियम प्रथम मला ग्रह-गतींच्या किंवा दैवगतीच्या नियमापेक्षांहि विलक्षण वाटले; पण लवकरच ते परिचयानें पूर्णपणें अंगवळणीं पडून गेले. इतके कीं, खऱ्या हाडा-मांसाचा उंट रस्त्यानें सरळ चालूं लागला कीं त्याच्या बुद्धिमांद्याबद्दल मला विलक्षण तिरस्कार वाटूं लागला, व चालताबोलता हत्ती वांकड्या रस्त्यानें जाऊं लागला कीं, त्याच्या वाममार्गी वर्तनाचा मी जोरानें निषेध करूं लागलों. एकदां मी एका गल्लीनें जात असतां समोरून एक उंट येतांना पाहिला; परंतु तो वांकड्या रस्त्यानें जाईल अशी मला खात्री वाटत असल्यामुळें मीं आपली सरळ वाट सोडिली नाहीं. या माझ्या गफलतीबद्दल मला देहदंडरूप प्रायश्चित्तहि मिळालें असतें. पण इतक्यांत मागें आवाज झाल्यावरून वळून पाहिलें, तों एक धिप्पाड हत्ती त्याच गल्लीनें माझ्या मागून येत आहे असें दिसलें. आतां आपली मुळींच धडगत नाहीं असें वाटून मी चटकन् जवळच्या एका बोळांत शिरलों. त्यामुळें माझी हत्तीच्या तावडींतून तर मुक्तता झालीच, पण तिजपेक्षांहि शर्थीचा बचाव उंटाच्या लाथेपासून झाला. कारण मी एकीकडे झालों तेव्हां उंटाचा पाय माझ्या अंगावर पडण्याच्या बेतांतच होता. उंटाची मान वर असल्यामुळें त्याला मात्र याची वार्ताहि नव्हति ! जो मी हत्तीउंटांस खड्यांप्रमाणें बोटांनीं खेळवीत होतों, त्यासच त्यांनीं राक्षसांप्रमाणें पायांच्या बोटांखालीं लाथाडण्याचा प्रसंग यावा ना ? ईश्वरेच्छा बलीयसी ! दुसरें काय ?

हळूहळू बुदबळाच्या खेळानें मला इतकें वेड लाविलें कीं, नित्यकर्म करितांनाहि समोर एकादें मोहरें नसलें म्हणजे मला करमत नसे. जेवतांना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समोर मोहरीं दिसावीं म्हणून मी रोज उदबत्त्या लावून जेवावयास बसूं लागलों. कचेरींत जातांना कागदांवर ठेवावयास वजनें पाहिजेत हें निमित्त पुढें करून एकेक खिशांत एकएक हत्ती घेऊन जाऊं लागलों. इतकेंच नाहीं, तर निजतांनाहि हत्तीच्या सोंडेवर किंवा उंटाच्या मानेवर मान टाकून मी पडूं लागलों. 'अंद्रोक्लीज आणि सिंह' ही गोष्ट ज्यांनीं वाचिली असेल, त्यांना या गोष्टीचें आश्चर्य वाटणार नाहीं. उशाशीं उंट व हत्ती घेण्याचा हा क्रम मीं चालू ठेविला नाहीं याचें कारण इतकेंच कीं एका रात्रीं एका उंदरानें एक उंट व एक हत्ती आपल्या बिळामध्यें लांबविले; आणि मीं जर त्याच्या अंगावर घोडा फेंकला नसता तर त्यानें दुसऱ्याहि हत्तीची तीच वाट लाविली असती.

हळूहळू मला जेवणाचाहि विसर पडूं लागला. संध्याकाळचें जेवण होण्यास रात्रीचे बारा बारा दोन दोन वाजूं लागले; इतकेंच नाहीं, तर आधल्या दिवशींचें संध्याकाळचें जेवण दुसऱ्या दिवशीं सकाळीं नऊ दहा वाजतांहि होऊं लागलें. पण तें त्याच दिवशींचें आहे असें वाटून मीं बायकोस जरा टोंचून म्हणावें, 'मी रोज उशिरानें जेवतों अशी तुझी नेहमीं टुरटुर असते. आज पहा बरें किती वाजले आहेत ते?' याप्रमाणें सकाळचे दहा वाजण्याचें जेवण संध्याकाळीं आठ वाजतां व संध्याकाळचें आठ वाजण्याचें जेवण सकाळीं दहा वाजतां होऊं लागलेलें पाहून बिचाऱ्या बायकोलाहि मनांतून समाधान वाटूं लागलें.

खेळाकडे एकदां तंद्री लागली कीं, भोंवतालचें जग बुडालें म्हणून समजावें. एकदां मी खेळतां खेळतां कुटलेली सुपारी तपकीर म्हणून ओढल्याचें व तपकीर सुपारी म्हणून तोंडांत टाकिल्याचें आठवतें; दुसऱ्यांदा तर मी विडी म्हणून उंटच तोंडांत धरून पेटवूं लागलों होतों. पांडूतात्यांनीं एकदां सबंध हत्ती सुपारी म्हणून तोंडांत टाकिला, आणि तो दातांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फुटेना म्हणून दुसरा हत्ती अडकित्यानें कातरून गट्ट केला. या गजानन-महाराजांस प्रायश्चित्त म्हणून लवकरच हस्तिरोग (elephantiasis) जडला, हें येथें सांगणें अवश्य आहे. पण या सर्वांपेक्षांहि गमतीचें वर्तन बंडूनानांकडून घडलें. त्यांनीं पिण्याकरितां म्हणून पाण्याचा एक पेला जवळ ठेविला होता व एक निकडीची चिठी पाठविण्याचें कारण पडल्या-मुळें दौतहि जवळ घेतली होती; परंतु सारें लक्ष्य खेळाकडे लागलें असल्यामुळें त्यांनीं चिट्ठी पाण्यानें लिहून व घाईघाईनें बंद करून पाठवून दिली, आणि नंतर दौत तोंडास लावून तिच्यांतील शाई घटाघट पिऊन टाकिली. शाई प्यायल्यामुळें त्यांच्या शरीरावर असा विलक्षण परिणाम झाला कीं, त्यानंतर लवकरच त्यांचे सर्व सफेत केंस काळे कुळकुळीत झाले; आणि कांहीं दिवस त्यांच्या अंगांतून जो घाम जात असे तोहि शाईसारखाच असे; इतका, कीं कचेरींत जातांना घातलेला पांढरा कोट परत येईपर्यंत काळ्या परमाळ्याच्या कोटासारखा दिसूं लागे.

आमचें व्यसन याप्रमाणें अमर्याद वाढलेलें पाहून आमच्या सर्व स्नेह्यांस मोठी चिंता पडली. शेवटीं सर्वांनुमतें असें ठरलें कीं, एक व्यसन सोडविण्याकरितां दुसरें व्यसन जडविलें पाहिजे, त्याशिवाय गत्यंतर नाहीं. पांडूतात्यांसंबंधानें या नियमाचा खरेपणाहि त्यांच्या नजरेस आला होता. त्यांना एका काळीं विडी पिण्याचें मनस्वी व्यसन होतें; परंतु त्यांना दारू पिण्याचें व्यसन जडविल्यापासून विडीचें व्यसन पार नाहींसें झालें होतें. शेवटीं मला सोंगट्यांच्या पटाचें व्यसन लावण्याचा त्यांनीं निश्चय केला. परंतु फाशांच्या खेळांत पोबारा व वांकडे तेरा, छ तीन नऊ व पांच चार नऊ, छ दोन आठ व पांच तीन आठ, इत्यादि दुकलांतील बारकाया लक्ष्यांत ठेवण्याची यातायात आम्हांकडून होण्याचें दूरच, उलट फाशांतील हस्तिदंतामुळें बुदबळांतील हत्तीची आम्हांला आठवण मात्र व्हावयाची;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणून कवड्यांचा खेळच आम्हांला शिकविण्याचें त्यांनीं ठरविलें. 'हातांत कवडी, विद्या दवडी' या म्हणीच्या बागुलबुवाची भीति आम्हांपैकीं कोणालाच कधीं वाटली नाहीं. कारण आमच्या ठिकाणीं जिचें अस्तित्व शपथेला मोकळें रहाण्यापुरतेंच होतें, त्या विद्येवर कवड्यांचा फुटक्या कवडीइतकाहि परिणाम होणें शक्य नव्हतें !

अ भ्या स

१. बुद्धिबळाच्या खेळाचे नियम समजावून घेऊन, खेळतांना खेळाडू व प्रेक्षक यांच्या हालचाली गुपचुपपणें पहा. म्हणजे लेखकाला विनोद व कोट्या करण्याजोगीं स्थळें कशीं सांपडलीं तें तुम्हांला समजेल.

२. या लेखांत एका प्रसिद्ध म्हणीचा उपहास केलेला सांपडेल. त्या म्हणीच्या खरेपणाचें स्पष्टीकरण करा.

३. या वर्णनांत तुम्हांला हंसू कोठें येतें तें पाहून तें कां येतें याचें कारण शोधा.

स्वा ध्या य

१. तुम्ही स्वतः पूर्वीं पाहिलेल्या एकाद्या गमतीदार प्रसंगाचें वर्णन करा.

२. असंबद्ध व असंभवनीय कल्पनांनीं खचलेलीं पांच वाक्यें तयार करा.

३. 'भारती योद्धे' व बुद्धिबळाचा खेळ यांत काय सारखेपणा आहे ?

४. या लेखांतील अतिशयोक्तीच्या कल्पना व शब्दांवरील कोट्या निवडा.

५. व्यसन या शब्दाचे अर्थ सांगा. दोन किंवा अनेक अर्थ असलेले चार शब्द अर्थासह सांगा.

पुरवणीवाचन

१. 'सुदाम्याचे पोहे' या पुस्तकांतून 'आमचे बैठे खेळ' हा लेख सबंध वाचा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

११

नाट्यसंवाद व नाट्यछटा

२१. वसंतबागेंतील मसलत

कृ. प्र. खाडिलकर

कृ. प्र. खाडिलकर यांच्या 'कीचकवध' या नाटकांतील हा एक प्रवेश आहे. कीचकाच्या त्रासाला कंटाळून, त्याचा आपल्या मागचा भुंगा नाहींसा करण्याच्या हेतूनें सैरंध्री धर्मराजाकडे तक्रार करीत आहे, भीमहि संतापानें लाल होऊन तिला दुजोरा देत आहे, आणि धर्मराज अगदीं शांतपणें ऐकूण घेऊन योग्य प्रकारें सल्ला देऊन त्यांचें सांत्वन करीत आहे असा हा प्रसंग आहे.

खाडिलकरांच्या ओजस्वी भाषेचा व मार्मिक संवादलेखनाचा प्रस्तुत उतारा हा एक उत्कृष्ट नमुना आहे.

[**स्थळ:** वसंतबाग. कंकभट व वल्लभ शिळेवर बसले आहेत; सैरंध्री उभी आहे.]

सैरंध्री: महाराज, माझ्या जन्मकाळचे ग्रहच असे कांहीं विचित्र पडले आहेत कीं, कोणचीच गोष्ट सरळ होत नाहीं. स्वयंवराचा समारंभ ठरला तर बाबांनीं पणच विचित्र लाविला; आणि सर्व क्षत्रियांना खालीं मान घालण्याची वेळ येऊन, द्रौपदी आजन्म अविवाहित राहते कीं काय अशी दादाला भीति पडली. त्यावेळीं सारथीपुत्र कर्ण मत्स्यभेद करतो कीं काय अशी मला भीति वाटून मी हलकट कुळांत जन्मलेल्याशीं लग्न करणार नाहीं असें साफ सांगितलें. तेव्हां तो मानी कर्ण मनांतल्या मनांत विरघळून जाग्यावरून उठलाच नाहीं. आमच्या देशांतील त्या सारथीपुत्राच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्रासांतून त्यावेळीं मी तशी सुटलें. पण हा मेला कीचक—मत्स्यदेशाचा हा सारथीपुत्र—ह्याच्या त्रासांतून सुटण्याचा मार्गच मला दिसत नाहीं.—ह्याची बायको रत्नप्रभा महासाध्वी, तिनें त्याची चांगली कानउघाडणी केली; मी त्याला चांडाळ, राजस, लांडगा म्हणून पाहिजे तशा शिव्या दिल्या; सुदेष्णा महाराणीसाहेबांनीं चार गोष्टी समजून सांगितल्या, पण कांहीं उपयोग नाहीं. म्हणून एक त्याला तरी जगांतून नाहींसा केला पाहिजे, नाहींतर मी तरी नाहींशी झालें पाहिजे; एरव्हीं हा तंटा मिटणार नाहीं.

कंकभट : हे दोनहि मार्ग मला पसंत नाहींत. कीचकाला जगांतून नाहींसा करा, हें म्हणणें सोपें आहे, पण कृति फार कठीण आहे.

कृ. प्र. खाडिलकर

बल्लभ : ह्यांत कसलें कठीण आहे? दादा, आपली आज्ञा होऊं द्या—जरासंधाला जसा मीं मारला, बकासुराला बगलेंत मारून त्याचा नैवेद्य खाऊन त्याला यमपुरीची जशी वाट दाखविली, काम्यकवनामध्यें किर्मीर राक्षसाला ज्याप्रमाणें एका क्षणांत होता कीं नव्हता केला, त्याप्रमाणें आपली आज्ञा होण्याचा अवकाश,—सांगाल त्या ठिकाणीं, सांगाल त्या वेळीं व सांगाल त्या प्रकारानें,—कीचकाच्या शरीराचे हजारों तुकडे करून प्रत्येक अनुकीचकाच्या मंदिरांत एक एक भाग टाकून सर्व अनुकीचकांना आमच्या भीतीनें कांपावयास लावीन.

सैरंध्री : असें झालें, तरच आजच्यासारखे प्रसंग वारंवार येण्याचें बंद होईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कंकभट : उगीच संतापून जाऊन एका संकटांत दुसऱ्या संकटाची भर घालण्यांत काय हांशिल आहे !—भीमा, तुझी शक्ति अमर्याद असून प्रत्येक अनुकीचक जरी कीचकाप्रमाणें उन्मत्त झाला तरी सर्वांचा मद उतरविण्याचें सामर्थ्य तुझ्या अंगीं आहे; पण—

सैरंध्री : पण काय ? जेव्हां तेव्हां असें करून हा वनवास आणि अज्ञातवास सर्वांच्या मागें लाविला.—शत्रूंना जर जेथल्या तेथें ठेंचीत आलां



असतां तर असल्या हलकट सारथीपुत्रानें डोळे उघडून मजकडे पहाण्याची काय प्राज्ञा होती ! जे सांगून सवरून शत्रू, त्यांच्याशीं कशाला इतकें नीतीनें आणि दयेनें वागायला पाहिजे ! महाराज, सापाशीं जर आम्हीं दयेनें वागलों आणि त्याची गय केली तर पुढें त्या सापाच्या दंशानें मरणारांची हत्या आपल्या माथीं बसणार नाहीं काय ? ह्या भावी हत्येचें पातक चुकविण्याकरितां आज निष्ठुर व निर्दय होणें हाच सत्य मार्ग आहे असें मला वाटतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कंकभट : न्यायबुद्धीला केव्हां केव्हां बाहेरून निर्दयतेचें सोंग आणावें लागतें, हें खरें; पण द्रौपदी, असला निष्ठुरपणा जर केवळ स्वहिताकरितांच असेल तर कितीहि शांतपणानें, सावकाशीनें, पक्का विचार करून व अंत:करण दयाळू ठेवून, हा निष्ठुरपणा दाखविला असला, तरी परमेश्वर त्यावर पापाचाच छाप मारल्यावांचून राहाणार नाहीं. स्वत:च्या भावी सुखाच्या लालचीनें आज क्रूर होणें म्हणजे लोभाच्या जाळ्यांत सांपडून फसण्यासारखें आहे. ज्याला आज दु:ख द्यायचें त्याचें त्या दु:खापासून अधिक कल्याण होणार आहे, अशी दयाळू न्यायदेवतेची पूर्ण श्रद्धा असल्याशिवाय क्रूरपणाचें प्रत्येक कृत्य पापमय आहे असें समजावें.

सैरंध्री : मग शत्रूचें शासन केव्हांच करूं नये एकूण? महाराज, आपण क्षत्रियकुलांत कसे जन्मास आलां, ह्याचें मला राहून राहून आश्चर्य वाटतें!

बल्लभ : दुष्टशिरोमणि दु:शासनानें जेव्हां द्रौपदीच्या निरीला हात घातला, तेव्हां रागानें लाल झालेल्या माझ्या डोळ्यांनीं आपणाला शांतपणानें समाधिस्थ असल्याचें पाहिलें; त्या वेळीं कुंतीच्या उदरांतून आपण व मी दोघेहि कसे निर्माण झालों, ह्याबद्दल मला संशय आला; व तो संशय आज पुन: दुणावत आहे.—महाराज, आपणाला जर कोणाशींहि व केव्हांहि निष्ठुरपणानें वागावयाचें नाहीं, व परक्यांच्याच सुखाची जेव्हां तेव्हां काळजी वाहायची, तर वनवास संपवून हा अज्ञातवास कां स्वीकारला? आपलें अजातशत्रुत्वाचें व्रत आजन्म वनवासांत राहून पूर्ण झालें असतें.

सैरंध्री : आणि ज्या आपल्या बंधूंनीं तुमच्या एकट्याच्या सत्यप्रियतेकरितां राज्यसुखावर लाथ मारिली, ते आपले बंधु, तुमचा तसा हट्ट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असता तर आपणाबरोबर आजन्म वनवासांतहि राहण्यास कबूल झाले असते.

वल्लभ : महाराज, क्रूरपणाशिवाय व निष्ठुरपणाशिवाय युद्धच होणार नाहीं. बाण सोडला कीं शत्रूंनीं आपखुषीनें मरण्याला तयार व्हावें, असली युद्धकला मानवी क्षत्रियांना कधींकाळीं साधेल काय ?

सैरंध्री : आपले पुरुष लढाईत पडले म्हणून कोणच्या शत्रूंचीं बायका-मुलें रडल्यावांचून राहातील ?—मला वाटतें ह्या अज्ञातवासाचे दिवस कसे तरी आम्ही कंठले, आणि नंतर दुर्योधनानें आपल्या राज्याचा हिस्सा आपल्याला दिला नाहीं, तर कौरवांच्या बायका अनाथ होतील, एवढ्या कारणावरूनच इकडून पुन्हां अरण्याचा रस्ता धरला जाईल !

कंकभट : द्रौपदी, भीमा, मी पुन्हां निक्षून सांगतों कीं, आजचा हा कीचकवधाचा प्रश्न तर बाजूलाच राहूं दे, पण उद्यां अज्ञातवास संपल्यावर कौरवांचें पापाचरण अत्युत्कट झालेलें मी पाहिल्याशिवाय, व त्यांचा संहार न करतां दुसऱ्या कोणत्याहि मार्गानें कौरवांचा उद्धार होणें शक्य नाहीं असें मला वाटल्याशिवाय, सुयोधनाचा वध समरांगणावरहि करावयाला मी संमति देणार नाहीं.

सैरंध्री : महाराज, त्या दुरात्म्या कीचकाचें मी शरीरानें, मनानें, किंवा बुद्धीनें, कोणचेंच नुकसान केलें नाहीं. असें असतां जर माझ्याविषयीं त्याच्या मनांत पापबुद्धि प्रबल झाली व त्याला सन्मार्गावर आणण्याचे कामीं त्याची बहीण सुदेष्णा व त्याची बायको रत्नप्रभा ह्यांनींहि जर हात टेकले, तर त्याच्या ह्या उत्कट पापाबद्दल त्याचा वध करून त्या कीचकावर व अनुकीचकांवर उपकार करून—त्यांचा उद्धार करण्याची वेळ जवळ आली नाहीं काय ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वल्लभ : कीचक किंवा अनुकीचक ह्यांच्या सुतळीच्या तुकड्याचाहि लोभ पांडवांनीं कधींकाळीं केला नाहीं. कीचक किंवा अनुकीचक ह्यांच्या योग्य सुखाच्या व चैनीच्या आड क्षणभरहि जाण्याची पांडवांची इच्छा नाहीं. अशा रीतीनें आम्ही पांडव वागत असतां, पांडवांच्या सुखाचें साधन—पांडवांची धनदौलत—ही महासाध्वी द्रौपदी—हिचें बलात्कारानें हा कीचक हरण करूं पाहात आहे. देव आणि धर्म ह्यांना न जुमानतां आपली. पापी चैन लहर लागेल त्याप्रमाणें चालविण्याची ह्याला घमेंड आहे. निरपराधी साधुतुल्य पांडवांना पिढ्यान्‌पिढ्या कष्टमय स्थितींत लोटून देण्याचें अतर्क्य पाप करायला हे कीचक व अनुकीचक तयार झाले आहेत. तर अशा स्थितींत अजातशत्रु धर्ममहाराज, कीचकाचा वध करावयाला ह्या भीमाला आपली संमति मिळणार नाहीं काय ?

कंकभट : मी कधींच परवानगी देणार नाहीं असें नाहीं; पण अद्याप वधापूर्वीचे सगळे उपाय संपले नाहींत. सुदेष्णा व रत्नप्रभा ह्यांच्या कानउघाडणीला जरी कीचक जुमानीत नसला, तरी विराट महाराजांनीं मनावर घेतल्यावर कीचकाला ह्या पापापासून परावृत्त करण्याची शक्ति त्यांच्या आंगीं आहे. (पडद्यांत—महाराजाधिराज विराट महाराज वसंतमहालांत विराजमान झालें असून द्यूतकारांनीं तेथें जमावें, असा महाराजांचा हुकूम आहे हो.) द्रौपदी, ह्या बागेंतच आज द्यूत व्हावयाचें ठरलें असून मला तेथें हजर झालें पाहिजे; मी महाराजांपाशीं आतां हा प्रश्न काढतों, तोंपर्यंत कोणचीहि अविचाराची गोष्ट करायला प्रवृत्त होऊं नका.

[जातो.]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. यांतील भाषणांवरून धर्म, भीम, द्रौपदी व कीचक यांच्या स्वभावाची तुम्हांला काय माहिती होते ?

२. भीम महापराक्रमी होता हें या प्रवेशांतील कोणत्या उल्लेखांवरून माहीत होतें ?

३. भीम व सैरंध्री यांच्या भाषणांत धर्माला टोंचून बोललेलीं वाक्यें कोणतीं ?

४. कीचकाचा त्यावेळेस वध करूं नये, असें धर्म कां म्हणत होता ?

स्वाध्याय

१. या धड्यांतला हा संवादरूपानें मांडलेला प्रसंग गोष्टीच्या रूपानें मांडा.

२. हा प्रसंग वाचून तुमच्या मनावर काय परिणाम झाला ?

---

२८. एका हलवायाचें दुकान

दिवाकर

नाटकाप्रमाणें पुष्कळ पात्रांचे संवाद नसून एकच पात्र बोलत असतें, पण इतर पात्रांचें अस्तित्व, बोलणें व वागणें, ज्या भाषणांत सुचविलें जातें; एकच रस, एकच प्रसंग किंवा भावना यांचा परिपोष केला जातो अशा एकमुखी, एकपात्री, नाट्यप्रकारास नाट्यछटा म्हणतात. शंकर काशिनाथ गर्गे (जन्म १८८९; मृत्यु १९३१,) यांनीं हा प्रकार प्रथम मराठींत सुरू केला.

"....काय कारट्यांची कटकट आहे पहा! मरत नाहींत एकदांचीं!— हं, काय म्हटलेंत रावसाहेब! आपल्याला पुष्कळशीं साखरेचीं चित्रें पाहिजे आहेत ? घ्या; आपल्याला लागतील तितकीं घ्या—छे! छे! भावामध्यें आपल्याशीं बिलकूल लबाडी होणार नाहीं ! अगदीं देवाची शपथ घेऊन सांगतों

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कीं, माझ्याजवळ फसवाफसवीचा असा व्यवहारच नाहीं !—अग ए ! कोठें मरायला गेली आहे कोणाला ठाऊक ! गप बसारे ! काय, काय म्हणालांत आतां आपण ! हीं साखरेचीं चित्रें फार चांगलीं साधलीं आहेत ? अहो, आपणच काय—पण या दुकानावरून जाणारा प्रत्येकजण असेंच म्हणतों कीं, हीं साखरेचीं केलेलीं पांखरें—झालेंच तर हीं माणसेंसुद्धां !—अगदीं



हुबेहुब साधलीं आहेत म्हणून !—काय ? मी दिलेले हे पांखरांवरचे रंग कदाचित् विषारी असतील ? छे, हो ! भलतेंच एखादें ! हा घ्या. कावळ्याच्या पंखाचा एक तुकडा आहे, खाऊन पहा ! अहो निव्वळ साखर आहे साखर ! फार कशाला ? हीं सगळीं चित्रें जरी आपल्याच-सारखीं जिवंत होऊन नाचायला उडायला लागलीं—तरी देखील यांच्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असलेल्या साखरेचा कण—एक कणसुद्धां कमी होणार नाहीं ! रावसाहेब, माझें कामच असें गोड आहे ! अरेच्या ! काय त्रास आहे पहा ! अरे पोरट्यांनो, तुम्ही गप्प बसतां कीं नाहीं ? कां या चुलींत घालून तुम्हा सगळ्यांना भाजून काढूं ? तुमची आई कोठें जळाली वाटतें ?—कांहो रावसाहेब असे गप्प कां बसलांत ! बोला कीं मग किती चित्रें घ्यायचें ठरलें तें ?...."

अ भ्या स

१. या नाट्यछटेंत एकट्या हलवायाच्या तोंडचे शब्द असून इतर कोण कोण मंडळी आहेत असें ओघांत दाखविलें आहे, तें शोधून काढा.
२. कावळ्याचे पंख आणि माणसांचीं चित्रें यांची शिसारी हलवायास येत नाहीं, असें लेखकानें कां दाखविलें ?
३. हलवायास आपल्या कुटुंबापेक्षां निर्जीव चित्रें आवडतात असें दाखविणारीं वाक्यें एकत्र करा.
४. खऱ्या कारागिरास स्वतःची कलाकृति जास्त आवडते हें ह्या नाट्यछटेचें मर्म असल्यास तें तुम्ही कोणत्या वाक्यावरून ओळखाल ?

स्वा ध्या य

१. संवादरूपानें ही नाट्यछटा लिहा.
२. हलवायाच्या भाषणांतील कोणते शब्द तुम्हांला आवडत नाहींत आणि ते कां आवडत नाहींत तें सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१२

सौंदर्य-पूजा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



सौंदर्य-पूजा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२३. सौंदर्य-पूजा

श्री. बा. रानडे

भोंवतालच्या सृष्टींत दिसणाऱ्या व मनुष्यानें निर्माण केलेल्या वस्तूंतील सौंदर्य पाहून आनंद पावणें यासारखें समाधानाचें व सुसंस्कृतपणाचें दुसरें साधन नाहीं असें या लेखांत सांगितलें आहे; व एका उत्तम चित्रांतील सौंदर्य समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. वाङ्मयप्रकारावरील 'रसोद्ग्राही' टीके-प्रमाणेंच ही कलाप्रकारावरील टीका आहे.

'A thing of Beauty is a joy for ever.' —*Keats.*

'सुंदर वस्तु हें चिरंतन आनंदाचें निधान आहे.'

जगांत जें जें कांहीं अंतर्बाह्य सुंदर आहे, तें तें मिळविण्याची, अनुभवण्याची, जाणण्याची ज्ञात्याप्रमाणेंच सामान्य जनांची धडपड चालू आहे. 'सत्यं, शिवं, सुंदरं' असें केलेलें परमेश्वराचें वर्णण, 'सत्य, कल्याणकारक, पवित्र व सुंदर' हे गुण एकाच योग्यतेचे आहेच असेंहि दाखवितें. जगांतील सौंदर्यांत भर टाकणें, व सौंदर्याची प्राप्ति करून घेणें हें सर्व कलांचें अंतिम ध्येय असतें. 'आहार, निद्रा' यांची विवंचना पशूप्रमाणें मनुष्याच्या मागें लागलेलीच आहे. पण यानंतर उरलेल्या कालाचा व शक्तीचा सदुपयोग कलेच्या उपासनेनें व सौंदर्य-पूजनानेंच होतो. जगांत शांतता नांदविण्याचा सोपा मार्ग सौंदर्य-पूजा होय.

पण हें सत्य व पवित्र सौंदर्य समजण्यास आपलें अंतरंगच सुंदर झालें पाहिजे. समरस झाल्यावांचून कविता कळत नाहीं. कान तयार झाल्याशिवाय संगीताची लज्जत लागत नाहीं. नुसत्या लिहिण्यावाचण्यानें मनुष्य एकवेळ सुशिक्षित होईल, पण सौंदर्यदृष्टि आल्याशिवाय, मन पवित्र झाल्याशिवाय तो सुसंस्कृत होणार नाहीं. सुसंस्कृत मनाला जगांतील अपवित्रता शिवत नाहीं. मनुष्य सुसंस्कृत झाल्यावर त्याची मनोवृत्ति

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आशावादी बनते व मग त्याला सुखाचा शोध करीत रानोमाळ हिंडण्याची पाळी न येतां त्याच्या मनाला शांति मिळते.

हें तत्त्व सांगण्यास इतके शब्द खर्चीं घालावे लागूनहि फिरून वाचकांच्या मनांत तें उतरलें असेल कीं नाहीं याची शंकाच! शब्दांचा हा दुबळेपणा चित्रांत सांपडावयाचा नाहीं. ही कल्पना लेखणीच्या दोन चार फटकाऱ्यांनीं कलावंत चिताऱ्यानें सहज स्पष्ट केली असती. योग्य रंगांचें मिश्रण, यथातथ्य चित्रदर्शन (perspective), प्रकाश–छायांचें समतोल प्रमाण, विचार व विकार दाखविणारी शरीराची ठेवण, स्थिति व मुद्राभिनय यांचा कुशलतेनें उपयोग करून, एकाद्या चित्रकारानें हें तत्त्व अजरामर केलें असतें, आणि तें कोणालाहि सहज पटलें असतें. जाड किंवा बारीक रेखांच्या साहाय्यानें काढलेल्या 'सौंदर्य-पूजा' ह्या रेखाचित्रांत ही अवघड कल्पना किती उत्तम रीतीनें व्यक्त केली आहे पहा. चित्र पाहतां पाहतां आपणास एकेक गोष्ट कळूं लागते, चित्रकाराचें कौशल्य पटतें, सौंदर्य-पूजेचें महत्त्व कळून चुकतें, आणि ज्या गोष्टी चितारी कागदावर उठविण्यास असमर्थ झाला त्यांचींहि रम्य चित्रें मनांत उभीं राहून अवर्णनीय आनंद होतो.

चित्रांतील या भक्तगणाच्या घोळक्यांत प्रथम आपलें लक्ष सुंदर कमलासनावर बसलेल्या चतुर्भुजा सौंदर्यदेवतेकडे एकदम जातें. शरीर किती बांधेसूद आणि मुद्रा किती प्रसन्न व मोहक आहे तिची! सृष्टींतील सजीव निर्जीव वस्तूंचें सौंदर्य म्हणजेच ही देवी. तिच्या मुखासभोंवतीं तेजःपुंज प्रभा पसरली आहे. निसर्ग व ज्ञान या दोन वस्तू दाखविणारें तिचें स्वरूप आहे. लक्ष्मी व सरस्वती या देवतांच्या एकस्वरूपाचें हें पूजन आहे.

तिच्या दर्शनानें आनंदित होऊन आपल्या अल्पमतीस कळलेलें रूप व्यक्त करण्याचा प्रत्येक जण प्रयत्न करीत तिच्या सभोंवतीं गोळा झाला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. जणूं काय हें सौंदर्य व्यक्त करण्यासाठींच ह्याचा जन्म, व यांतच याच्या जीविताचें सार्थक. एकटा चित्रकारच उभा न करतां निरनिराळे कारागीर तिच्याभोंवतीं दाखविण्यांत, सौंदर्याच्या अनेक बाजू असतात हें नाहीं का स्पष्ट होत ?

तिच्या पायांशीं बसून, कागद लेखणी सज्ज करून तत्त्वज्ञानी, मंत्रद्रष्टा लेखक शब्दांत तिचें रूप सांठविण्यासाठीं सज्ज झाला आहे. त्याची तेजस्वी व तपस्वी मूर्ति दाखविण्यांत किती औचित्य साधलें आहे ? सौंदर्याच्या बदलत्या रंगच्छटा चिरस्थायी करण्यासाठीं चित्रकारानें कुंचला सज्ज केला आहे. वेळेवर विलंब लागूं नये म्हणून रंगानें तयार असलेला दुसरा कुंचला अधीरपणानें, दोन्ही हात गुंतल्यामुळें त्यानें तोंडांतच धरला आहे ! त्याच्या मागें पहा, शिल्पशास्त्री उभा आहे. प्रमाणबद्धता व रचनेंतील सौंदर्य कळून दगडामातींतून रम्यता उत्पन्न करण्याची याची हिंमत. गवंडी-सुतार हे हुकुमाप्रमाणें काम करणारे कसबी. पण आपल्या कल्पकतेनें संपूर्ण नकाशा तयार करून, नंतर उभी रहाणारी इमारत मनापुढें आणीत डोळे मिटून निश्चल उभ्या राहिलेल्या या कारागिरास पाहून ताजमहाल कल्पनेनेंच निर्माण करणाऱ्या कारागिराची नाहीं का आठवण होत ?

आणि तो पहा मागें एकटा उभा असलेला, हातोडा व छिन्नी असल्या हत्यारांनीं पाषाणांतून मूर्तिमंत सौंदर्यसृष्टि उत्पन्न करणारा, मूर्तिकार ! पाषाणहृदयांतून सौंदर्य उभविण्यास टाकीचे घावच लागतात आणि निढळाचा घाम अश्रूंत मिळविण्याइतके श्रम करावे लागतात. मूर्तिकार पाहतां पाहतां मंदिराच्या बाहेर आपली अंतर्दृष्टि जाते आणि चित्रांत दाखवितां आलें नाहीं तें चित्तापुढें उभें राहतें. कोरींव लेणीं कोरणारे प्राचीन कारागीर दूरवर दिसतातच, पण जमिनींतून पिकें काढणारे शेतकरी, कच्च्या मालांतून पक्क्या मालाची पैदास करणारे कामकरीहि चित्तापुढें दिसूं लागतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चित्रांतील मूर्तिकार हा श्रमांतून निष्पन्न होणाऱ्या सौंदर्याची आपणांस आठवण करून देतो.

कवीनें अगदीं जवळची जागा पकडली आहे. त्याला प्रत्यक्ष डोळ्यांनीं पुन्हां पुन्हां देवतेकडे निरखण्याची जरूरी वाटत नसून तो आपल्याच कवित्वांत—गज्जलकवालींत, श्लोक-पदांत व सुनीतांत—गुंग आहे. या सौंदर्योपासकांत उच्चनीच भाव, स्वधर्मी, परधर्मी, देशीपरदेशी हे क्षुद्र भेद मुळींच दिसणार नाहींत.

या सर्व कलावंतांनीं सौंदर्यपूजेला इतर बाह्य साधनांचीं उपकरणें घेतलीं. पण हे दुसरे उपासक पहा. ईश्वरानें दिलेलें सुदृढ शरीर, कुशल इंद्रियें व संस्कारक्षम मन यांतच ज्यांना आपली कला व्यक्त करून सौंदर्याची उपासना करावयाची आहे ते उपासक मागें उभे आहेत. शरीराबरोबरच यांची कृति नष्ट होणार इतकी अल्पायुषी, पण त्यांची भक्ति किती उत्कट आहे! देश, समाज व व्यक्ति यांच्या सौंदर्याचें रक्षण करण्यास प्रसंगीं आत्मदान करण्यास मागें पुढें न पाहणारा वीर तलवार उपसून उभा आहे.

लतेप्रमाणें लवचिक देहयष्टि, तालबद्ध, गति, कमावलेल्या सुंस्वर कंठांतील गानमाधुरी, विजेप्रमाणें लवणाऱ्या बोटांतील वादनकौशल्य देवीच्या पार्श्वभागीं उभें राहिलें आहे. संगीताचा जन्मच सौंदर्यपूजेसाठीं.

देवीला डाव्या बाजूनें प्रदक्षिणा करीत असतां आपण पुन्हां समोर शेवटचा प्रणिपात करण्यासाठीं आलों. भक्तगणांच्या दाटींतून सर्व बाजूंनीं निरखून पाहूनहि आपल्या मनाची तृप्ति होत नाहीं. पायांशीं बसून या पवित्र सौंदर्याचें नेत्रांनीं आकंठ पान करावें अशी इच्छा मनांत येते. चित्रकारानेंहि मोठ्या कुशलतेनें, तुमच्या आमच्यासारखा, सौंदर्यनिर्मिति न

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करणारा पण रसिक भोक्ता जवळ बसवला आहे! समयांचा मंद प्रकाश पडला आहे आणि बाहेर रात्रीचें शांत साम्राज्य पसरलें आहे!

सृष्टींतील सौंदर्यास स्तुतिनिंदेची पर्वा नसते. त्याचें अस्तित्व स्वतः-साठींच; तसेंच या भक्तगणांचें अस्तित्व देवतेच्या ध्यानीं-मनीं नसून ती त्यांच्या उपासनेविषयीं उदासीन आहे. आणि—आणि खरें कौशल्य तें पुढेंच आहे! ती आपल्याच वीणावादनांत मग्न असून तिची तंद्री लागली आहे!

अभ्यास

वर्तमानपत्रांतील चित्रप्रदर्शनासंबंधीं माहिती देणारे लेख वाचा. तुम्हांला या पुस्तकांतील एखादें चित्र किंवा दुसरें कोणतेंहि आवडतें चित्र कां आवडतें त्याचा विचार करा, व तें कां आवडतें तें समजावून सांगण्यासाठीं आपलें म्हणणें लिहून काढा. उत्तम नामांकित चित्रकारांचीं चित्रें काळजीपूर्वक पहा. संधी सांपडेल तेव्हां मुंबई, बडोदें येथील संग्रहालयांतील चित्रें पहा. शाळेंत उत्तम चित्रांचा संग्रह तयार करण्यास शिक्षकांस मदत करा, व आपल्या कलाशिक्षकाकडून (ड्रॉइंग मास्तर) चित्रकलेची सर्वसाधारण माहिती मिळवा.

66 म/5

LIBRARY,
GURUKULA KANGRI



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

LIBRARY,
GURUKULA KANGRI.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्रीमन् महाभारतार्थ

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक या थोर ग्रंथाबद्दल म्हणतात :—
राष्ट्रांतील लोकांच्या व्यवहारांत नित्यशः जे अनेक प्रसंग उद्भवतात, ज्या ज्या संकटांतून त्यांस पार पडावें लागतें, किंवा जीं सुखदुःखें त्यांस अनुभवावीं लागतात त्या सर्वांचें यथार्थ वर्णन महाभारतांत आहे. इतकेंच नव्हे तर अनेक अडचणींच्या प्रसंगीं मनुष्यमात्रानें आपलें वर्तन कोणत्या रीतीनें ठेविलें असतां इहलोकीं व परलोकीं त्याचें कल्याण होतें; अशा आणीबाणीच्या प्रसंगीं आपलें वर्तन आपले पूर्वज कोणत्या रीतीनें ठेवीत आले; आपला धर्म कोणता, नीति कोणती, आणि या दोहोंचा व्यवहारांत तारतम्यानें उपयोग कसा करावा; इत्यादि अनेक महत्त्वाचे प्रश्न सोप्या व सरळ भाषेत, प्रासादिक वाणीनें आणि लहान मुलांस देखील समजेल अशा मनोरंजक उदाहरणांच्या रूपानें या ग्रंथांत वेदव्यासांनीं मार्मिक रीतीनें सोडवलेले आहेत.

अशा या अमोलिक ग्रंथाचा आपण संग्रह करणार नाहीं काय?

यांत 'महाभारता'चें मराठींत मुळाबरहुकुम सुबोध भाषांतर आलें आहे. प्रत्येक खण्डांत मनोवेधक अशीं प्रासंगिक चित्रें दिलीं आहेत. सर्व ग्रंथ बारा खंडांत पूर्ण झालेला आहे. यांपैकीं प्रत्येकीं ५०० पृष्ठांचा एक असे ११ खंड असून त्यांची किंमत प्रत्येकीं ४ रु. आहे. बारावा खंड मात्र ७०० पृष्ठांचा आहे व त्याची किंमत ६ रु. आहे. सर्व खंड मजबूत कापडी बांधणीचे आहेत.

स्वामी विवेकानंद यांचे समग्र ग्रंथ

अत्यंत तीव्र अशा विवेचक बुद्धीच्या साहाय्यानें ज्यांना धर्मशास्त्राचा अभ्यास करावयाचा असेल, त्यांना स्वामी विवेकानंदांचे ग्रंथ अत्यंत मार्गदर्शक होतील.

विवेकानंदांनीं शास्त्रें, सद्गुरु आणि प्रवास यांच्यायोगें ज्ञान प्राप्त करून घेतलें, व तेंच त्यांनीं लेखन, भाषणद्वारा जगास परत दिलें. या त्रिविध ज्ञानापासून सर्व जगाचा ताप हरण करणारी दिव्य औषधी त्यांनीं निर्माण केली. या औषधीचें जो सेवन करील त्याचें जीवन दिव्य व भव्य होईल. ही औषधी स्वामीजींच्या तेराहि खण्डांत ओतप्रोत भरलेली आहे. एकंदर खंड तेरा. या तेरा खंडांचा संपूर्ण सेट, साधी बांधणी रु. १९-४-० व कापडी बांधणी रु. २२-८-०.

'महाभारतार्थ' व **'विवेकानंद'** यांचे संपूर्ण सेट्स घेणारांसाठीं आम्हीं खास सवलतीचे दर ठेविले आहेत. सेट्स विकत घेऊं इच्छिणारांनीं पत्रव्यवहार करावा.

कर्नाटक पब्लिशिंग हाउस, चिराबाजार, मुंबई

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar